म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चरित्र
दा. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
लेखक गोगटे चिं० ग
सन १८९९
ग्रंथालय क्रमांक १८८०
पुस्तकाचें नांव औरंगजेब बादशहाचें चरित्र ३६०

१६८

चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

चना : – खाली ... गावे,

# राजपुत्र औरंगजेब.



राज्यारोहण.

जन्म. [ २१ जुलै इ.स. १६५८. ] मृत्यु.

इ.स.१६१८. इ.स.१७०७.

शहाजहान बादशहाचे मुलांत गादीविषयीं लागलेल्या लढाईचा इतिहास.

अथवा

# औरंगजेब बादशाहाचें चरित्र.

## पूर्वभाग.

हा ग्रंथ


चिंतामण गंगाधर गोगटे,

'छत्रपति थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र' व 'बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें चरित्र' या पुस्तकांचें कर्ते,


यांनीं लिहिला.


तो

पुणें येथें

सदाशिव पेठेंत 'इंदिरा' छापखान्यांत छापिला.

शके १८२१.—सन १८९९

आवृत्ति दुसरी.

किंमत ८ आणे.



(हा ग्रंथासंबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.)

श्रीमंत राजराजेश्वर

सयाजीराव महाराज गायकवाड,

जी. सी. एस्. आय., सेनाखासखेल समशेरबहादर,

बडोदें राज्याचे अधिपति,

यांचे,

परम थोर औदार्य, असामान्य गुणग्राहकत्व आणि
विशेषेंकरून आपल्या प्रजेच्या कल्याणाविषयीं
व शिक्षणाविषयीं अश्रांत परिश्रम, व देश-
भाषेच्या उन्नतीकरितां पराकाष्ठेची कळ-
कळ, इत्यादि अनेक सद्गुण मनांत
आणून त्यांच्या परवानगीनें
हा ग्रंथ,

त्यांचे सेवेशीं परमादरपूर्वक
अर्पण केला असे.

महाराजांचा नम्र सेवक

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

ह्या ग्रंथास 'बरनीर साहेबांचा मोगलांचे राज्यांतील प्रवास' नांवाच्या इंग्रजी ग्रंथाचा मुख्य आधार घेतला आहे. बरनीर साहेब यांचा धंदा वैद्यकीचा असून शहाजहान बादशाहाचे मुलांत गादीविषयीं जेव्हां लढाई सुरू झाली, तेव्हां ते दिल्लीच्या दरबारीं होते. वरील लढाईतील पुष्कळ गोष्टी त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या आहेत. यामुळें सदर्हू लढाईचा कापीखान, डून्हरनियर, काटू वगैरे इतिहासकर्त्यांनीं जो वृत्तांत दिला आहे, त्याच्यापेक्षां बरनीर साहेबांचा वृत्तांत ज्यास्त विश्वसनीय मानला पाहिजे. ज्या इतर ग्रंथांतून ज्यास्त माहिती मिळाली, त्यांचाही ठिकठिकाणीं निर्देश केला आहे.

ह्या पुस्तकांत फक्त शहाजहान याच्या मुलांच्या आपसांतील लढाईचाच वृत्तांत दिला आहे, व त्यांत प्रधान पात्र औरंगजेब असल्यामुळें त्याला 'औरंगजेब बादशाहाचें चरित्र, पूर्वभाग' असें नांव दिलें आहे. ग्रंथांत मधून मधून औरंगजेबाच्या कृत्यांवर जी टीका केली आहे, ती बरीच कडक आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु हा ग्रंथ लक्ष्यपूर्वक वाचून साधारण मानवी कृत्यांशीं त्याच्या कृत्यांची तुलना केली, तर वरील आक्षेप बहुतेक दूर होईल असें वाटतें.

या ग्रंथाचे आरंभीं औरंगजेबाची जी तसबीर दिली आहे, ती त्याच्या सुमारें पसतीस वर्षांच्या वयाच्या वेळची आहे.

हा ग्रंथ छापण्याचे वेळीं माझे मित्र रा० रा० हरि कृष्ण दामले यांनीं वेळोवेळीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

ग्रंथकर्ता.

---

## आवृत्ति दुसरी.

पहिल्या आवृत्तींत ज्या चुक्या आढळून आल्या त्या दुरुस्त करून ही दुसरी आवृत्ति छापिली आहे.

# अनुक्रमणिका.

पृष्ठें.

शहाजहान बादशहाचीं मुलें व त्यांचे स्वभाव. ... ... १– ९
तो आपल्या पुत्रांस निरनिराळ्या सुभ्यांवर पाठवितो. ... ९–११
औरंगजेब दक्षिणच्या सुभेदारीवर येतो, व त्याचें गोंवळकोंड्याच्या राजाचा प्रधान मीर जुमला याच्याशीं कारस्थान. ... ... ... ... ११–१८
मीर जुमला औरंगजेबास येऊन मिळतो. ... ... १९
त्याची व शहाजहान याची भेट, तो बादशाहास दक्षिणेंतील राज्यें जिंकण्याची मसलत देतो, व दारा त्यास आडकाठी घालतो... ... ... ... २०–२२
शहाजहान अजारी पडतो, व त्यामुळें राज्यांत गोंधळ होतो. २३–२४
सुजा बंगल्यांतून दिल्लीवर चालून येतो. ... ... २५
औरंगजेब मुराद यास राज्याची आशा दाखवून कपटानें आपल्या पक्षाकडे ओढतो. ... ... ... २६–२९
तो मीर जुमला यास वश करितो. ... ... ... ३०–३३
तो दिल्लीस जाण्याकरितां निघतो, व मुराद शाहा अचास याचा हितोपदेश न ऐकतां त्यास जाऊन मिळतो. ३४–३७
औरंगजेबाचा कावा. ... ... ... ... ... ३८
शहाजहान बादशाहाची दुःखद स्थिति. ... ... ३९
दारा आपला ज्येष्टपुत्र सुलेमान व जयसिंग यांस सुजावर पाठवून देतो, उभयपक्षीं झालेली लढाई, व सुजाचा पराभव. ... ... ... ... ... ... ४०–४३
तो कासमखान व यशवंतसिंग यांस औरंगजेब व मुराद यांजवर पाठवून देतो, औरंगजेब त्यांचा पराभव करितो, व आग्र्यावर चाल करून येतो. ... ४३–४८
शहाजहान याची परतंत्रता, दाराचा हेकेखोर स्वभाव, सामूगडची लढाई, दाराचा पराभव, व तो आग्र्यास पळून जातो. ... ... ... ... ४९–६२
औरंगजेबाचें मुराद याजबरोबरचें कपटाचरण. ... ६३–६४

पृष्ठें.

दारा आग्रयाहून पळून जातो. ... ... ... ... ६५
औरंगजेब जयसिंगास फितूर करितो, व त्यामुळें सुलेमान यास श्रीनगरचे राज्यांत पळून जावें लागतें. ६६-६९
औरंगजेब आग्र्यास येतो, त्याचा पुत्र महंमद आग्र्याचा किल्ला घेतो, व तो शहाजहान यास कैदेंत ठेवितो. ६९-७४
औरंगजेबानें बादशाहास पाठविलेलें पत्र. ... ... ७५
तो दाराचा पाठलाग करण्याचे मिषानें मुराद यास बरोबर घेतो, व मार्गांत दगाबाजीनें त्यास कैद करितो. ७७-८१
तो दाराचा पाठलाग करितो, व त्यास सिंध देशांत घालविल्यावर लाहोरास परत येतो. ... ... ... ८१-८४
त्याची व जयसिंगाची भेट. ... ... ... ... ८४-८५
दारा सिंध देशांतून गुजराथेंत येऊन अमदाबाद शहर घेतो. खजवाची लढाई. ... ... ... ... ८६-९२
औरंगजेब मीर जुमला व महमद यांस सुजावर पाठवून देतो. महंमद सुजा यास जाऊन मिळतो, व त्याचा शेवट. ... ... ... ... ... ९३-९८
जयसिंगाचे मध्यस्थीनें यशवंतसिंग दाराचा पक्ष सोडून औरंगजेबास मिळतो. ... ... ... ... ९९-१००
मुलतानची लढाई, दाराचा पराभव, व त्याची शोचनीय स्थिति. ... ... ... ... ... ... १०१-१०६
दारा प्रथमतः कच्छचे राज्यांत जातो, व तेथून मालिक जीवनखान अयूब नांवाचे लुटारू सरदाराचे आश्रयास जातो, तो त्यास औरंगजेबाचे स्वाधीन करितो, व औरंगजेब त्याची धिंड काढून त्याचा खून करितो. ... ... ... ... ... १०७-११९
दाराचे कुटुंबाची वाताहत. ... . . ... ... १२०-१२२
औरंगजेब मुराद याचा खून करितो. ... ... १२२-१२३
सुजा व त्याच्या कुटुंबाचा शेवट. ... ... ... १२३-१२८

# औरंगजेब बादशाहाचें चरित्र.

## पूर्व भाग.

इराणचा प्रख्यात बादशाहा तैमुरलंग याचा दहावा वंशज दिल्लीचा पराक्रमी बादशाहा शहाजहान यास दारा, सुलतान सुजा, औरंगजेब व मुराद बक्षी असे चार पुत्र व बेगम साहेब व रोषनार बेगम अशा दोन कन्या मिळून सहा अपत्यें होतीं. वर सांगितलेल्या चार राजपुत्रांचे स्वभाव अगदीं भिन्न भिन्न असल्यामुळें त्यांचें एकमेकांशीं अगदीं जुळत नसे व ते नेहमीं एकमेकांस पाण्यांत पहात असत. पुढें त्यांच्यांमध्यें गादीविषयीं कसे तंटे लागले, आपल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेकरितां त्यांनीं काय काय केलें, ह्या तंटयांत पुढें प्रत्येकावर काय काय प्रसंग गुजरले, औरंगजेबानें कोणकोणतीं भयंकर कारस्थानें केलीं, त्यानें आपल्या बंधूंची व पित्याची कशी वाट लाविली व त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांची कशी दुर्दशा करून टाकिली, व शेवटीं सर्वांच्या तोंडास पानें पुसून पादशाहीपद कसें छिनाऊन घेतलें इत्यादि गोष्टींचा साग्र इतिहास या भागांत दिला आहे.

वडील राजपुत्र दारा याचें जन्म इ० स० १६१५ त झालें. त्याचे अंगीं पुष्कळ चांगले गुण वास करित होते. त्याची बोलण्याची पद्धत मोठी अदबीची असून चटकदार असे. त्याचप्रमाणें तो मोठा सभ्य व उदार होता. परंतु त्याच्या अंगीं बरेच दुर्गुण असल्यामुळें वर सांगितलेल्या

चांगल्या गुणांचा अगदीं लोप होऊन गेला होता. तो अविचारी असून त्याला स्वपराक्रमाची मोठी घमेंड होती, व आपल्याप्रमाणें शहाणा त्रैलोक्यांतही मिळणार नाहीं असा त्यास मोठा गर्व होता. त्याचप्रमाणें स्वतःच्या कल्पनेनें आपण काय पाहिजे तें करूं असें त्यास वाटत असे. तसेंच ज्याच्या उपदेशापासून आपणास यत्किंचित्हि फायदा करून घेतां येईल असा प्राणी भूतलावर उत्पन्न झाला नाहीं अशी त्याची कल्पना झाली होती. त्याला कोणीं कांहीं उपदेश करूं लागलें तर तो त्याची निर्भर्त्सना व तिरस्कार करित असे. त्यामुळें औरंगजेब आदिकरून त्याच्या तीन बंधूंचीं त्याच्या विरुद्ध जीं निरनिराळीं कारस्थानें चाललेलीं असत तीं त्याच्या मित्रांपैकीं कोणास कळल्यास त्यांची बातमी त्याच्या कानावर घालण्यास कोणासहि धीर होत नसे. त्याचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, त्याच्या जिवलग मित्रांपैकीं पुष्कळ इसम पुढें त्याचे शत्रु झाले. तो मोठा तामशी असून त्याचें बोलणें नेहमीं धमकीचें असे; परंतु त्याचा राग अगदीं क्षणिक असे. भर दरबारांत नीच शब्दांनीं एखाद्या उमरावाची किंवा भल्या मनुष्याची इज्जत कशी घ्यावी याची त्यास बिलकुल शंका वाटत नसे. त्याचें धर्मसंबंधी बाह्य आचरण एखाद्या मोठ्या कडकडीत इमामाप्रमाणें असे; परंतु अंतर्यामीं त्याची मुसलमानी धर्मावर कमी श्रद्धा होती असें म्हटलें तरी चालेल. त्याची व ज्या अन्य धर्माच्या मनुष्याची गांठ पडे त्याच्याशीं तो त्याच्या धर्माप्रमाणें वागे. त्याच्याजवळ नेहमीं हिंदु राजवैद्य असून त्यांना त्यानें मोठमोठीं वर्षासनें करून दिलीं होतीं. हिंदु किंवा मूर्तिपूजक यांच्या धर्माचीं कांहीं तत्त्वें त्यास

मान्य होतीं असा कांहीं मुसलमान लोकांचा त्याच्यावर आरोप होता व अजूनही आहे. तसेंच बुसी नांवाचा एक जेसूईट[1] धर्मोपदेशक त्याच्या पदरीं होता त्याचा उपदेश त्यानें कांहीं दिवसपर्यंत मनापासून ऐकिला होता, त्यामुळें त्याची ख्रिस्ती धर्मावरही श्रद्धा बसत चालली होती असाही कित्येकांचा त्याच्यावर आरोप होता. कोणी असेंही ह्मणतात कीं, दारा मोठा धर्मलंड होता, व सर्व धर्मांच्या लोकांशीं सारख्या रीतीनें वागण्यांत व त्यांचीं धर्मसंबंधी मतें ऐकण्यांत त्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, प्रत्येक धर्माचीं तत्त्वें त्यास कळावीं व तेणेंकरून त्याचें मनरंजनही व्हावें. बरें, कांहीं असेंही ह्मणणारे आहेत कीं, तसें वागण्यांत त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, कोणत्याही प्रसंगीं कोणत्याही धर्माच्या लोकांची त्याला मदत घेणें जरूर पडल्यास ती त्यास सहज मिळून त्यायोगानें त्याचा कार्यभाग व्हावा. परंतु अशा प्रकारच्या धरसोडीच्या वर्तनापासून दाराचा काडीइतकाही फायदा झाला नाहीं इतकेंच नव्हे, तर औरंगजेबानें पुढें तख्तनशीन झाल्यावर ज्या आरोपावर त्या बिचाऱ्याला ठार मारिलें, तो आरोप, "दारा विधर्मी किंवा काफर आहे," हाच होय!

दुसरा राजपुत्र सुलतान सुजा याचें जन्म इ० स० १६१६ त झालें. त्याचा स्वभाव पुष्कळ अंशीं दाराच्या स्वभावाशीं मिळत असे. तथापि तो दारापेक्षां अधिक शहाणा असून अधिक दृढ निश्चयाचा होता. तसेंच त्याची चालचालणूक व आचारविचार दारापेक्षां अधिक चांगले होते. तो मोठा राजकार्यधुरंधर असून

---

१ जेसूईट हा ख्रिस्तधर्मी लोकांचा एक पंथ आहे.

दीर्घसूत्री होता व यशवंतसिंग आदिकरून दरबारांतील रजपूत राजांस व दुसऱ्या मुत्सद्दी मंडळीस आंतून मोठमोठ्या देणग्या देऊन त्यानें अनुकूल करून घेतलें होतें. परंतु त्याच्या अंगीं एक दुर्गुण होता, त्याच्यायोगानें त्याच्या वर निर्दिष्ट केलेल्या उत्तम गुणांची माती झाली होती. तो मोठा चैनी होता व त्याचा जनानखानाही फार मोठा होता. तो एकदां आपल्या जनानखान्यांत शिरला म्हणजे नाच, गाणें व दारू यांत त्याचे दिवसांचे दिवस जात असत. तो एखादे वेळीं रंगांत आला म्हणजे आपल्या नाटकशाळांना मोठमोठ्या नेमणुका करून देत असे व एखादे वेळीं त्याची मर्जी खपा झाली म्हणजे त्या एकदम बंद करूनही टाकीत असे. तो अशा प्रकारच्या रंगांत दंग झालेला असला म्हणजे त्या वेळीं त्याच्या जिवलग मित्रालाही त्याच्या विरुद्ध बोलण्याची सक्त मनाई असे. यामुळें सरकारी कामांत त्याच्या हातून पुष्कळ कसूर होत असे, व याच गोष्टीमुळें त्याच्याविषयीं त्याच्या हाताखालच्या लोकांचीं मनें बिघडून गेलीं होतीं, व त्यांची त्याच्याविषयींची पूज्यबुद्धि शिथिल झाली होती. जरी त्याचे वाडवडील तुर्की किंवा सुनी पंथाचे होते

---

१ हा जोधपूरचा राजा. शहाजहानाचे व औरंगजेबाचे कारकीर्दींत त्याच्याकडे ७००० लोकांची सरदारी होती. तो सन १६७८ त काबुलाजवळ मरण पावला.

२ मुसलमान लोकांत सुनी व शिया असे दोन मुख्य पंथ आहेत. सुनी हे कुराण व पुढें निघालेले संप्रदाय या दोहोंना प्रमाण मानतात व पैगंबरानंतर झालेले चार खलीफ ह्यांना पूज्य मानतात. अफगाण, तुर्क व रोहिले हे या पंथाचे आहेत. शिया हे कुराण प्रमाण मानतात परंतु पुढें जे संप्रदाय निघाले त्यांवर त्यांची श्रद्धा नाहीं. पैगंबरानंतर जे तीन खलीफ झाले त्यांना हे पूज्य मा

तरी त्यानें इराणी किंवा शिया पंथाचा स्वीकार केला होता. हा पंथ स्वीकारण्यांत त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, त्या वेळीं दरबारांत शिया पंथाच्या लोकांचें फार वजन असल्यामुळें त्या लोकांची प्रसंगीं आपणांस चांगली मदत मिळेल.

तिसरा राजपुत्र **औरंगजेब** याचें जन्म इ० स० १६१९ त झालें. तो मोठ्या आंतल्या गांठीचा असून त्याच्या अंगीं सौजन्य किंवा माणुसकी अगदीं वसत नव्हती, व तो मोकळ्या मनानें कधीं कोणाशीं वागला नाहीं. परंतु त्याची बुद्धि विशाल व तीव्र असून त्याला मनुष्याची पारख फार चांगली होती. प्रसंगीं आपल्या उपयोगी कोण कसा पडेल हें तो चांगलें जाणत असे, व अशाच लोकांस त्यानें आपले जिवलग स्नेही करून ठेविलें होतें; तसेंच राज्यांतील कोणत्या लोकांस संतुष्ट ठेविलें तर आपला कार्यभाग साधेल हें त्यास माहीत होतें, व त्या लोकांस मोठमोठ्या देणग्या देऊन त्यानें आपल्या पक्षास सामील करून ठेविलें होतें. तो मोठा कावेबाज, पाताळयंत्री, कपटी, महाकारस्थानी, क्रूर व आपमतलबी होता. त्याच्या मनांत **दिल्लीची** गादी बळकाविण्याचे विचार पूर्वीपासूनच घोळत होते. परंतु ते त्यानें इतक्या गुप्त रीतीनें चालविले होते कीं, बादशाहास किंवा इतर लोकांस आपला संशय येऊं नये म्हणून, तो **आग्रा** येथें होता त्या वेळीं संसार असार आहे, वैभव शाश्वत नाहीं, इत्यादि पोकळ वेदांताच्या लांब लांब गप्पा ठोकून आपणास ही राज्याची दगदग

---

नांत नाहींत. हे लोक फार करून मक्केची यात्रा न करितां हुसेनाचें मृत्युस्थान करवाला येथें जातात. ते मोहोरमाचा उत्सव करितात. सुनी हे त्यांना पाखंडी म्हणतात. इराणी व वोहोरी हे या पंथाचे आहेत.

अगदीं नको म्हणून सांगत असे. त्याला शहाजहान यानें दक्षिणेच्या सुभेदारीवर नेमिलें, त्या वेळीं त्यानें बादशाहास असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, " आपण मला ही जोखिमेची कामगिरी दिली ती न देतां मला जर आपण फकीर होण्यास अनुमोदन द्याल तर मी आपला फार आभारी होईन. कोठें तरी एकांतवासांत राहून ईश्वरचिंतनांत काळ घालवावा व या नाशवंत देहाचें सार्थक करून घ्यावें, अशी माझी उत्कट इच्छा आहे." परंतु अंतर्यामीं त्याचे विचार फार निराळे होते. ह्या एवढ्या मोठ्या मोंगल राज्यशकटाचे आपण कसे धुरीण होऊं, आपले खरे शत्रु कोण आहेत, त्यांना फसवून आपल्या वाटेंतून दूर करण्याकरितां काय केलें पाहिजे, आपल्या तिवां बंधूंचे राज्यावरून हक्क उडवून टाकण्याकरितां त्यांचा नाश कोणत्या युक्तीनें करावा, इत्यादि विचारांची त्याचे मनांत एकसारखी लढाई सुरू होती. परतु ही त्याची अंतर्यामीं चाललेली कृष्णकारस्थानें दाराशिवाय दुसऱ्या कोणासही कळत नसल्यामुळें, औरंगजेब हा एक कित्ता घेण्यासारखा थोर राजपुत्र आहे अशी सर्व उम लोकांची समजूत झाली होती. हा त्यांचा भ्रम पुढें लौकरच कसा नाहींसा झाला याचा इतिहास पुढें येईलच. प्रत्यक्ष बादशाहास सुद्धां त्यानें भुरळ पाडलें होतें, यामुळें तो औरंगजेबाच्या गुणांची वारंवार तारिफ करित असे. दारानें ती स्तुति ऐकिली म्हणजे त्याच्या अंगाचा तिळपापड होऊन जाई. कारण औरंगजेबाच्या कपटजालाचे अगदीं सूक्ष्म तंतु देखील त्यास माहीत होते, व त्यामुळें तो औरंगजेबाविषयीं मनांत एकसारखा जळत असे. तो आपल्या स्नेही मंडळींत वारंवार बोलून दाखवी कीं, "ज्याच्या

कारस्थानांची मला फार भीति वाटते असा फकिरी बहाणा करणारा कपटी औरंगजेब आहे, दुसरें कोणीं नाहीं!"

चौथा राजपुत्र मुराद बक्षी याचें जन्म इ० स० १६२४ त झालें. तो आपल्या इतर तिघां बंधूंप्रमाणें शहाणा नसून दुसऱ्याशीं कसें वागावें हेंही त्यास माहीत नव्हतें. "खाना, पीना, और लढना" याशिवाय इतर व्यवसाय त्याला तुच्छ वाटत असत. तथापि तो मोठा उदार व सभ्य होता. "माझ्यापाशीं गुप्त ह्मणून कांहीं नाहीं; दरबारी कारस्थानें व पाचपेंच यांचा मला फार तिरस्कार आहे;" व "स्वतःच्या शौर्यावर व मणगटाच्या जोरावर मी काय पाहिजे तें करीन," असा तो बाणा मिरवीत असे. वास्तविक रीतीनें पाहूं गेलें तर तो मोठा धाडशी होता, व त्या त्याच्या धाडसाला जर शहाणपणाचा जोड मिळाला असता, तर तो एक अद्वितीय योद्धा झाला असता; व आपल्या इतर तिघां बंधूंच्या तोंडास पानें पुसून मोंगलपद्पादशाहीवर तोच आरूढ झाला असता.

वडील राजकन्या बेगम साहेब ही फार सुस्वरूप असून तिची वृत्ति नेहमीं आनंदी असे. शहाजहान बादशहाची तिच्यावर फार प्रीति असून त्याचा तिच्यावर पूर्ण भरंवसा होता. तिचीही आपल्या पित्यावर खरी प्रीति असून त्याच्या जिवाला ती फारच जपत असे. फार काय सांगावें? बादशाहास कदाचित् कोणी विषप्रयोग करील या भीतीनें ती त्याच्या भोजनाचे पदार्थ आपल्या देखरेखीखालीं तयार करवीत असे. ती फार हुशार असल्यामुळें व निरंतर बादशाहाच्या मर्जीप्रमाणें वागत असल्यामुळें दरबारांतील प्रत्येक उलाढालींत तो तिचें मत घेत असे. शिवाय कधीं

कधीं आपल्या मताप्रमाणें कांहीं कांहीं गोष्टी ती बादशाहाकडून करवीत असे. त्यामुळें दरबारांत तिचें महत्त्व फार वाढलें होतें. बादशाहानें तिला फार मोठी नेमणूक करून दिली होती; शिवाय सर्व सरदार, मानकरी व मुत्सद्दी मंडळीकडून तिला वारंवार मोठमोठ्या देणग्या येत असत; त्यामुळें तिच्याजवळ अतिशय संपत्ति जमली होती. दाराची सर्व भिस्त या आपल्या भगिनीवर होती व तिचेंही त्याच्या पक्षास पूर्ण पाठबळ होतें. त्याची बादशाहावर खरी प्रीति नव्हती, परंतु केवळ या थोर राजकन्येची मर्जी संपादन करण्याकरितां तो बाह्यात्कारी त्याच्यावर फार ममत्व दाखवीत असे. अशा रीतीनें बेगम साहेब हिला निरंतर खूश ठेवण्याकरितां तो तिला आवडेल तसेंच वागत असे. दाराचा पक्ष जो त्या वेळीं अतिशय जोरांत होता त्याचें मुख्य कारण ही राजकन्या होय. तिची मर्जी आपणावर निरंतर सुप्रसन्न रहावी ह्मणून "आपण गादीवर बसल्यावर तुझें लग्न करून देऊं" असेंही त्यानें तिला वचन दिलें होतें. ही गोष्ट फार लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. कारण मोंगल बादशाही घराण्याचा पूर्वींपासून असा निर्बंध ठरून गेला होता कीं, त्या घराण्यांत उत्पन्न झालेल्या मुलींचीं लग्नें करावयाचीं नाहींत. याचें कारण असें होतें कीं, आपणांशीं शरीरसंबंध ठेवण्याइतकें उच्च घराणें दुसरें नाहींच, असें त्यांचें मत होतें. शिवाय दुसऱ्या कोणास आपल्या कन्या दिल्या तर त्यांचा पादशाही पदावर हक्क उत्पन्न होऊन विनाकारण राज्यांत बखेडे माजतील असेंही त्यांस वाटत असे.

दुसरी राजकन्या रोषनार बेगम ही आपल्या बहिणीप्रमाणें सुस्वरूप नसून तितकी शहाणीही नव्हती. तथापि

ती मोठी उलाढाली बायको होती. तिचा सर्व ओढा औरंगजेबाकडे होता. दारा व बेगम साहेब यांच्याविषयीं आपलें मन शुद्ध नाहीं असें ती स्पष्टपणें बोलून दाखवीत असे. बादशाहाचीही तिच्यावर प्रीति नसल्यामुळें दरबारांत तिला मुळींच मान नव्हता व तिच्याजवळ पैशाचेंही बळ नव्हतें. परंतु ती जनानखान्यांतच असल्यामुळें तिला बेगमेकडे काय काय कारस्थानें चाललीं आहेत त्यांची बातमी गुप्त हेरांकडून कळत असे; व त्यांविषयींची सर्व माहिती ती आंतून औरंगजेबास देत असे.

आपलीं मुलें कोणत्या गुणांचीं आहेत ही गोष्ट बादशाहा पूर्णपणें ओळखून होता. आपले चौघे मुलगे एकमेकांवर उठून एकमेकांचे खूनही करण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत अशी त्याची खातरी असल्यामुळें, पुढें होणारे अनर्थ टाळण्याकरतां काय उपाय योजावा तें त्यांस कांहींच सुचेना. त्यांचीं लग्नकार्यें होऊन व त्यांना मुलेंबाळें होऊन ते पूर्ण संसारी बनले होते. ते आंतून एकमेकांचा फार हेवा करीत व अतितम राज्यतृष्णेमुळें त्यांचा एकमेकांविषयींचा प्रेमभाव नाहींसा होऊन त्या ठिकाणीं शत्रुत्वानें आपला पूर्ण पगडा बसविला होता, व त्यामुळें बादशाहाच्या दरबारांतही फाटाफूट होऊन गेली होती. अशा वेळीं बादशाहास स्वतःच्या जीविताचीही मोठी काळजी पडली. आपल्या उच्छृंखल व शिरजोर मुलांस एकदम कैद करून ग्वालेरच्या[1] किल्ल्यांत नेऊन ठेवावें असेंही त्यास वाटलें; परंतु पोक्त विचाराच्या

---

१ ग्वालेरचा किल्ला माळवा प्रांतांत आहे. तो एका उंच सुळक्यावर असून चढण्यास फारच चिकट आहे. तेथें मोंगलांचे अंमलांत राजकीय कैदी ठेवीत असत.

अंतीं त्यानें तो बेत रहित केला. त्याला असें वाटलें कीं, 'ते कांहीं आतां लहान नाहींत. चांगले पोक्तदशेस आले आहेत व आपलें खरें सुखदुःख त्यांना कळूं लागलें आहे. तेव्हां त्यांना कैद करण्याचा आपण प्रयत्न करूं लागलों तर ते आपणावरच उलटून पडण्यास अगदीं मागेंपुढें पाहणार नाहींत, व आपसांत बखेडे माजवून स्वतःची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याकरतां प्रसंगविशेषीं माझा स्वतःचा बळी घेण्यास ते कधींही कमी करणार नाहींत.' त्यामुळें बादशाहानें तो बेत रहित केला. पुढें पुढें तर त्याच्यांतील तंटे इतके माजले कीं, प्रसंगीं भरदरबारांत सुद्धां ते एकमेकांचे खून करतील कीं काय अशी बादशाहास मोठी भीति पडली. शेवटीं आजचें मरण उद्यांवर तरी ढकलावें असा बेत करून बादशाहानें आपल्या राज्याचे चार विभाग करून त्यांच्यावर त्यांच्या नेमणुका केल्या, व अशा युक्तीनें त्यांना दरबारांतून बाहेर काढिलें. **सुजा** यास **बंगालचा** सुभेदार नेमून तिकडे पाठवून दिलें; **औरंगजेबास** दक्षिणेची सुभेदारी सांगितली; **मुराद** यास गुजराथचा सुभा सांगितला व **दारा** यास **मुलतान** व **काबूल** या प्रांतांवर सुभेदार नेमिलें. पुढें थोडक्याच दिवसांत **दारा** शिवायकरून बाकीचे तिघे आपापल्या सुभेदारीवर निघून गेले, व प्रत्येकजण बादशाहाचे मागें दिल्लीची गादी कशी बळकवावी याचा आपापल्या रीतीनें विचार व तयारी करूं लागला. ते आपापल्या सुभ्यांत वस्तुतः स्वतंत्र रीतीनें अम्मल करूं लागले, व सुभ्याचा सर्व वसूल आपणच खर्च करूं लागले. तसेंच सुभ्याच्या बंदोबस्ताकरितां ज्यास्त फौज ठेवणें जरूर आहे असा बहाणा करून त्यांनीं आपली

फौजही वाढविली. दारा सर्वांत वडील असून शहाजहान याचेमागें गादीचा खरा मालक असल्यामुळें आपल्या सुभेदारीवर न जातां बादशाहापाशींच राहिला. बादशाहासही ती गोष्ट अनुमत होती असें दिसतें; कारण त्यानें आपल्या मयूरासनाच्या खालच्या बाजूस अमीरउमराव बसण्याचे ठिकाणीं दाराकरितां एक छोटें सिंहासन तयार केलें व त्यास लहानसान कामें चालविण्याचा अधिकार दिला. अशा प्रकारची राज्यकारभाराची पद्धत फार अपायकारक असते ही गोष्ट शहाजहानासारख्या अनुभवी बादशाहाच्या लक्ष्यांत येऊं नये ही फार आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे! शेख सादीनें गुलिस्तान नामक ग्रंथांत एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "दहा दरवेशी एका घोंगडीवर निजूं शकतील, परंतु एका राज्याचे दोन अधिकारी किंवा एका मेणांत दोन सुऱ्या कधींही नांदणार नाहींत!" मोंगल घराण्यापैकीं कोणत्याहि बादशाहानें यापूर्वीं अशा प्रकारचा अधिकार आपल्या कोणाहि मुलास दिला नव्हता. शहाजहान यानें इतकें केलें तरी त्याची खरी प्रीति दारावर नव्हती. दारा आपणास विषप्रयोग करील कीं काय अशी त्यास निरंतर भीति असे. आपल्या सर्व मुलांत आपलें येवढें मोठें विस्तीर्ण राज्य चालविण्यास खरा हुशार असा एक औरंगजेब आहे अशी त्याची पूर्ण खातरी होती, त्यामुळें त्याचा खरा ओढा त्याच्याकडे होता व आंतून त्याच्याशीं त्याचा गुप्त पत्रव्यवहारहि सुरू होता. पुढें औरंगजेबानें या पितृप्रेमाची कशी फेड केली तो वृत्तांत येईलच.

औरंगजेबानें किंवा प्रस्तुत चाललेल्या कथानकाच्या नायकानें पुढें राज्यप्राप्तीस्तव जो व्यूह रचिला त्याचा

पाया रचण्याचे कामीं त्याच्या विशेष उपयोगीं कोण मनुष्य पडला त्याचा इतिहास येथें देणें जरूर आहे. त्या मनुष्याचें नांव मीर[१] जुमला असें होतें. ह्याच मनुष्याच्या मदतीनें औरंगजेबानें पादशाही पद मिळविलें यांत कांहीं संशय नाहीं. औरंगजेब दक्षिणेच्या सुभेदारीवर आला त्या वेळीं मीर जुमला गोवळकोंड्याच्या राजाच्या[२] पदरीं वजिरीचें व सेनापतीचें अशीं दोन कामें पहात होता. त्याच्या शौर्याबद्दल सर्व हिंदुस्थानभर त्याची ख्याति पसरली होती. जरी तो उच्च कुलांतला नव्हता, तरी त्याची बुद्धि फार तीव्र होती. तो मोठा योद्धा असून राज्यकारभारांत फार निपुण होता. त्याच्याजवळ अपार संपत्ति होती. ती त्यानें केवळ गोवळकोंड्याच्या वजिरीवर मिळविली होती असें नाहीं, तर सर्व देशांशीं त्याचा व्यापार मोठ्या जारीनें सुरू होता त्यामुळें, व गोंवळकोंडें येथें त्यानें हिऱ्याच्या खाणी शोधून काढिल्या होत्या त्यांमुळें त्याला मिळाली होती. त्याला ह्या खाणींपासून फार पैसा मिळाला. असें सांगतात

१ याचें मूळचें नांव मीर महंमद सय्यद अरदास्तनी असें होतें. तो इराणांत इस्पाहानच्या नजीक अरदिस्तान येथें जन्मला. प्रथमतः तो गोवळकोंड्याच्या राजाच्या पदरीं वजिरीच्या कामावर होता. नंतर इ० स० १६५६ त तो शहाजहान बादशाहाचे आश्रयास येऊन राहिला. औरंगजेब तख्तनशीन झाल्यावर त्यानें त्यास बंगालचा सुभेदार नेमिलें. यालाच पुढें मोअज्जीमखान, खानखानान अशीं दुसरीं नामाभिधानें मिळालीं. आसामच्या स्वारीवरून परत आल्यावर तो कुचबहार प्रांतांत खिजरपूर येथें इ० स० १६६३ त मरण पावला.

२ या वेळीं अबदुल्ला कुतुबशाहा नांवाचा राजा गोवळकोंड्याच्या राज्यावर होता. तो कुतुबशाही घराण्याचा सहावा पुरुष. तो इ० स० १६७४ त मरण पावला.

कीं, तो आपले हिरे पोत्यांनीं मोजीत असे.[1] गोवळकोंडयाच्या राजाच्या फौजेवर त्याचा मोठा दरारा असून शिवाय त्यानें आपल्या पदरींहि पुष्कळ फौज ठेविली होती. तसेंच त्याज-पाशीं मोठा तोफखाना असून त्यावर त्यानें ख्रिस्ती अंमलदार नेमिले होते. वरील संपत्तीशिवाय त्यानें करनाटकावर स्वारी करून हिंदु लोकांचीं असंख्य देवालयें लुटून अतिशय संपत्ति मिळविली होती; व अशा रीतीनें मृत्युलोकीं तो एक कुबेरच होऊन बसला होता. जसजसा त्याचा भरभराट होत चालला तसतसा गोवळकोंड्याच्या राजाच्या मनांत त्याच्याविषयीं ज्यास्त मत्सर उत्पन्न होऊं लागला, व आपल्या ह्या जबरदस्त शत्रूचा नाश करण्याविषयीं त्या राजाच्या गुप्त मसलती सुरू झाल्या. त्याच्या सभोंवतालचे बहुतेक लोक मीर जुमला याचे नातेवाईक असल्यामुळें त्यानें आपला बेत फार सावधगिरीनें चालविला होता. पुढें कांहीं दिवसांनीं त्या राजाची मातुश्री व मीर जुमला यांच्यामध्यें कांहीं घोंटाळा आहे अशी कुणकुण जेव्हां राजाचे कानावर आली, तेव्हां तर त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्या वेळीं त्यानें आपला त्याच्यावरचा राग व्यक्त करून दाख-विला व त्याचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा निश्चय केला.

मीर जुमला त्या वेळीं करनाटकांत होता. परंतु राजाच्या पदरीं मोठमोठ्या अधिकारावर बहुतेक त्याच्याच वतीचे लोक असल्यामुळें, त्यांनीं त्याच्यावर गुदरणाऱ्या भावी संकटाची अगोदरच त्यास वर्दी दिली होती. तेव्हां

---

१ थीवेनाट नांवाचा ग्रंथकार असें म्हणतो कीं त्याच्याजवळ २० मण किंवा १ खंडी हिरे नेहमीं असत.

प्रथमतः त्यानें, त्याचा एकुलता एक मुलगा मीर महंमद अमीन हा त्या वेळीं राजापाशीं होता त्याला "कांहीं तरी बहाणा करून तूं मुलांमाणसांसह एकदम करनाटकांत निघून ये" म्हणून गुप्त पत्र पाठविलें. परंतु राजाची त्याच्या कुटुंबावर सक्त देखरेख असल्यामुळें त्याला तसें करतां येईना. आपली युक्ति अशा रीतीनें फसली असें पाहून त्या कावेबाज वजिरानें स्वतःच्या कल्पनेनें एक निराळीच तोड काढली; व त्यामुळें गोवळकोंड्याच्या राजावर पुढें भयंकर प्रसंग येऊन तो केवळ काळाच्या जबड्यांतच पडला होता; परंतु तो मोठ्या शर्तीनें बचावला हें त्याचें महद्भाग्यच समजलें पाहिजे. वास्तविक रीतीनें पाहूं जातां ज्या राजाला आपले गुप्त विचार राखतां येत नाहींत तो राज्य चालविण्यास अगदीं नालायक आहे असें समजलें पाहिजे. कारण त्या राजानें पूर्वीं रागाच्या सपाट्यांत मीर जुमला याच्या विरुद्ध चालविलेल्या आपल्या गुप्त कारस्थानांची परिस्फुटता केली नसती तर त्याच्या केंसासही धक्का न लागतां, त्याला मीर जुमला याचा सूड घेतां आला असता. असो. वर सांगितलेली मीर जुमला यानें जी तोड काढिली ती ऐकण्याविषयीं वाचक फार उत्कंठित झाले असतील. तो प्रकार येणेंप्रमाणें:--

औरंगजेब त्या वेळीं दक्षिणेची मोंगलांची राजधानी दौलताबाद येथें होता. त्यास मीर जुमला यानें मोठ्या गौरवानें असें पत्र पाठविलें कीं, "परम थोर व उदार

१ यास महंमद अमीरखान असेंही म्हणत असत.

२ दौलताबादेला पूर्वीं देवगड असें म्हणत असत. हें शहर फार प्राचीन काळापासून मुसलमानी राजांचें राजधानीचें शहर होतें.

हजरत साहेब! मीं गोवळकोंड्याच्या राज्याच्या उन्नतीकरितां काय काय परिश्रम केले, व त्या संबंधानें हल्लींच्या तेथील राजावर माझे किती उपकार आहेत, ह्या गोष्टीचा मीं स्वमुखानें उच्चार केला पाहिजे असें नाहीं. ती सर्व जगाला महशूर आहेच. इतकें असून तो कृतघ्न राजा माझा व माझ्या कुटुंबाचा नाश करण्यास प्रवृत्त झाला आहे. आतां प्राणत्राणार्थ आपल्या चरणीं लीन झालों आहे, तर आपण मला उदार आश्रय द्याल अशी पूर्ण उमेद बाळगून ही विनंति करित आहे. आपण मला आश्रय दिल्यास गोवळकोंड्याचें राज्य व राजा अल्पायासानें आपल्या हस्तगत होण्याची युक्ति मीं योजून ठेविली आहे. आपला माझ्यावर पूर्ण विश्वास असेल तर हें काम आपणांस काडी इतकें जड जाणार नाहीं. पादशाहा शहाजहान याचा वकील लवाजम्यानिशीं कांहीं महत्त्वाच्या कामाची तडजोड करण्याकरितां भागानगरच्या[1] ( गोवळकोंड्याच्या ) राजाकडे जात आहे, अशी कंडी पिकवून आपणच पांच हजार निवडक घोडेस्वारांनिशीं मोठमोठे मुक्काम करीत एकदम गोंवळकोंड्याकडे निघून यावें. आपणांस इकडे येण्यास सुमारें १६ दिवस लागतील. राजाची गांठ ज्या डबिराचे[2] मार्फत घेतली

१ हें शहर कुतुबशाहा महंमद कुली यानें इ० स० १५८९ त वसविलें व त्याची भागामती नांवाची एक आवडती नाटकशाला होती, तिच्या नांवावरून त्यानें त्याला भागानगर असें नांव दिलें. पुढें गोवळकोंड्याचें हवापाणी फार वाईट असल्यामुळें त्यानें तेथून आपली गादी काढून भागानगर येथें नेली. भागामती वारल्यावर पुढें कांहीं वर्षांनीं त्याला हैदराबाद असें नांव पडलें. हल्लींच्या निजामाच्या राज्याचें हें राजधानीचें शहर आहे. गोवळकोंडें व भागानगर यांच्यामध्यें ७ मैलांचें अंतर आहे.

२ डबीर म्हणजे परराष्ट्रसंबंधी वकील.

पाहिजे, तो मनुष्य माझ्या पूर्ण विश्वासाचा असून माझा नातलग आहे. त्याचप्रमाणें त्याला त्या योग्यतेस मींच चढविलें आहे. आपण भागानगरच्या वेशीपाशीं आलां तरी शहाजहान बादशाहाकडून येणारा वकील तो हाच असें लोकांस वाटेल व आपणांविषयीं कोणासही शंका येणार नाहीं अशी व्यवस्था मी पूर्वींच करून ठेवितों. नंतर भेटीच्या वेळीं आपण त्यास कैद करा व पुढें आपण त्याची इच्छेस येईल त्याप्रमाणें व्यवस्था करा. राजा नेहमीं भागानगर येथें राहतो. राजवाड्यास तट किंवा खंदक वगैरे कांहीं नाहीं. ह्या स्वारीखर्चाबद्दल जितके दिवस आपलें लष्कर कामगिरीवर गुंतलें असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल मी आपणास पन्नास हजार रुपये देत जाईन."

आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास! औरंगजेब म्हणजे महत्त्वाकांक्षेचा प्रत्यक्ष मानवी पुतळा व त्याला स्वभावतःच असल्या भानगडीच्या कामाची फार हौस; त्यांतून हें अयाचित पुढें वाढून आलेलें बडें कारस्थान म्हणजे फायद्याचें केवळ आगर; मग काय विचारतां? त्यानें मीर जुमला याची विनंति तत्काळ मान्य केली व त्यानें लिहिल्याप्रमाणें बरोबर पांच हजार स्वार घेऊन तो गोवळकोंड्याच्या राज्यांत शिरला. मीर जुमला याचें पाठबळ असल्यामुळें त्यानें आपला सर्व बेत अशा युक्तीनें व गुप्त रीतीनें चालविला होता कीं, भागानगराच्या वेशीपर्यंत तो येऊन पोहोंचला तरी त्याच्याविषयीं कोणाला संशय आला नाहीं, व आलेला इसम शहाजहान बादशाहाकडून येणारा वकीलच आहे असें सर्वांस वाटत होतें. पुढें गोवळकोंड्याचा राजा या वेषधारी वकिलाचें आगतस्वागत करण्याकरतां म्हणून

शहरानजीकच्या बागेंत त्याला भेटण्याकरितां निघाला. औरंगजेबास ती बातमी कळतांच त्यानें आपले दहा बारा गुलाम त्याला कैद करण्याकरितां तयार करून ठेविले. त्या राजाला वरील कृष्णकारस्थानाचा कांहींच माग-मूस नसल्यामुळें तो त्या मानभावी वकिलास ह्मणजे कपटी औरंगजेबास भेटण्याकरतां अगदीं नजीक आला. तो औरंगजेबाच्या पाशांत सांपडलाच होता. परंतु त्याच वेळीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडून आली कीं, तेणेंकरून त्या राजावरचा तो भयंकर प्रसंग टळला. त्या वेळीं मीर जुमला याचे कारस्थानामधील एक उमराव राजाबरोबर होता, त्याला आतां आपल्या राजास औरंगजेब कैद करणार व राजद्रोहासारखें भयंकर पाप आपले माथीं येणार, व आपण आजपर्यंत अशा निंद्य मसलतींत मीर जुमला यास विनाकारण साह्य केलें, इत्यादि गोष्टींचा मोठा पश्चात्ताप होऊन तो मोठ्यानें ओरडून म्हणाला, "हां, महाराज! सावध रहा, पुढें जाऊं नका. आपण याच पा-वलीं येथून पळ काढून आपला प्राण वांचवा, नाहीं तर आपला घात होईल. आपण ज्याचे भेटीस जात आहां तो शहाजहान बादशाहाचा वकील नसून वकिलाचें ढोंग करून येणारा कपटी औरंगजेब आहे." त्या वेळीं त्या राजाचे मनाची काय स्थिति झाली असेल ती त्याची त्यालाच माहीत! तिची कल्पना देखील करणें फार कठीण आहे! त्यानें आपला लवाजमा टाकून देऊन तेथून एकदम धूम ठोकली व प्रथमतः जो घोडा हातीं लागला त्यावर ताडकर उडी मारून तेथून २ मैलांवर गोवळकोंड्याचा किल्ला होता तेथें तो पळून गेला. अशा दगाबाजीनें

आपला बेत फसला व हातची शिकार पळून गेली तथापि औरंगजेबाला मीर जुमला याचें पूर्ण पाठबळ असल्यामुळें तो मुळींच निराश झाला नाहीं. त्यानें प्रथमतः राजवाडा लुटून फस्त केला; परंतु राजाचे मुलांमाणसांस राजाकडे पाठवून दिलें. मोंगलांचे अमलांत, एखादे राजास जरी कैद केलें किंवा लढाईंत जिंकलें, तरी त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांस कोणताही उपद्रव द्यावयाचा नाहीं अशी पद्धत होती. संभाजीस ठार मारल्यावर त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांस औरंगजेबानें फार चांगल्या रीतीनें वागविलें याचें कारण पुष्कळ अंशीं वरील पद्धतच होय. असो. नंतर औरंगजेबानें गोवळकोंडयाच्या किल्ल्यास वेढा दिला. परंतु त्याचेजवळ युद्धोपयोगी सामानाचा पुरवठा नसल्यामुळें दोन महिनेपर्यंत तो किल्ला त्याचे हातीं आला नाहीं. तितक्या मुदतींत किल्ल्यांतील धान्यसामग्री व युद्धसामग्री संपल्यामुळें आंतील लोकांची अन्नान्नदशा आली होती. इतक्यांत "तुम्हीं गोवळकोंडयाचे किल्ल्याचा वेढा उठवून एकदम दक्षिणेंत निघून यावें" असा शहाजहान बादशाहाचा सक्तीचा हुकूम औरंगजेबास येऊन पोहोंचला. त्यामुळें नाइलाज होऊन त्याला वेढा उठवून दक्षिणेंत परत यावें लागलें; व अशा रीतीनें गोवळकोंडयाच्या राजाची त्या संकटांतून मुक्तता झाली (इ० स० १६५६.).

आपणास परत बोलाविण्याचे कामीं बादशाहानें येवढा जो सक्तीचा हुकूम पाठविला तो केवळ दारा व बेगमसाहेब यांचे सांगण्यावरून पाठविला असावा असा औरंगजेबानें तर्क बांधला व तो त्याचा तर्क खरा होता. कारण ज्या वेळीं औरंगजेब गोवळकोंडयाचे किल्ल्यास

वेढा घालून बसला आहे ही बातमी दारा व बेगम यांस कळली, तेव्हां त्या दोघांस असें वाटलें कीं, जर या वेळीं गोवळकोंड्याचें राज्य औरंगजेबानें खालसा केलें, तर तो फार प्रबळ होईल व बादशाहाचे मागें कदाचित् लढाईचा प्रसंग आलाच तर त्याला जिंकणें फार कठीण जाईल; तेव्हां त्यांनीं बादशाहास सांगून वर सांगितलेला सक्तीचा हुकूम औरंगजेबास पाठविला होता. औरंगजेबास त्या दोघांचा अतिशय राग आला होता, परंतु त्या वेळीं तो त्यानें तसाच गिळून टाकला.

पित्याचे आज्ञेप्रमाणें औरंगजेब दक्षिणेंत निघून आला खरा, तथापि परत येतांना त्यानें गोवळकोंड्याच्या राजापासून असा करार करून घेतला कीं, "मीर जुमला यानें आपलें कुटुंब, मालमत्ता व सैन्य यांसह त्याला वाटेल तिकडे निघून जावें, राजानें त्यास कोणत्याही रीतीनें अडथळा करूं नये, व तेथें चालणाऱ्या रुपेरी नाण्यांवर त्यापुढें शहाजहानी शिक्का सुरू करावा." त्याच वेळीं त्यानें त्याचा वडील मुलगा सुलतान महंमद याचें त्या राजाचे मुलीशीं लग्न केलें, व राजाचे मागें तें राज्य महंमदास मिळावें असा त्याच्यापासून दुसरा एक करार करून घेतला. त्या वेळीं मुलीच्या आदणाबद्दल ह्मणून औरंगजेबानें त्या राजापासून रामगिरी[1] व त्याचे आसपासचा मुलूख तोडून घेतला. मीर जुमला यानें या मोहिमेचा सर्व खर्च औरंगजेबास दिला.

मीर जुमला याच वेळीं औरंगजेबास येऊन मिळाला. पुढें दक्षिणेंत परत येत असतां त्या दोघांनीं बेदरच्या किल्ल्यास वेढा घालून तो घेतला, व ते दौलताबादेस येऊन

१ हा किल्ला हैदराबादेच्या वायव्येस ११३ मैलांवर आहे.

पोहोंचले. ते दोघे त्या ठिकाणीं बरेच दिवस मोठ्या स्नेहभावानें एकत्र राहिले. त्यांनीं पुढील भयंकर उलाढालींचे मनसुबे अगोदरच करून ठेविले होते. ह्या दोन राज्यकारस्थानी पुरुषांचा एकोपा झाला ही गोष्ट औरंगजेबाचे चरित्रांत विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, कारण औरंगजेब पुढें जो तक्तनशीन झाला व वैभवाच्या शिखरास जाऊन पोहोंचला, त्याचें बहुतेक श्रेय मीर जुमला यास देणें रास्त आहे.

पुढें कांहीं दिवसांनीं शहाजहान यानें बोलाविल्यावरून मीर जुमला त्याचे भेटीस गेला. त्यानें जातांना बादशाहाकरितां फार मोठा नजराणा बरोबर घेतला. जगांतील संपूर्ण रत्नांचें सार असा कोहिनूर नामक प्रसिद्ध हिरा याच वेळीं मीर जुमला यानें बादशाहास नजर केला. येवढा मोठा नजराणा बादशाहास देण्यांत मीर जुमला याचा मुख्य उद्देश असा होता कीं, बादशाहानें, विजापूर, गोवळकोंडें व पोर्तुगीज लोक यांस जिकण्याकरितां त्याच्याबरोबर मोठी फौज द्यावी. गोवळकोंड्याचें राज्य जिंकलें असतां बादशाहास फार मोठा फायदा होईल व त्याचप्रमाणें तेथील मौल्यवान् हिऱ्यांचे खाणींचेंही मोठें उत्पन्न त्याचे हातीं लागेल; कंदाहारासारख्या खडकाळ व ओसाड प्रदेशावर स्वारी करून सैन्य व पैसा यांचा फुकट नाश करण्यापेक्षां विजापूर, गोवळकोंडें अशा मातबर प्रदेशांवर स्वारी केली असतां त्यापासून अतिशय फायदा होईल इतकेंच नव्हे, तर बादशाहाचा अंमल काबूलकंदाहारापासून तों थेट कन्याकुमारी केपापर्यंत पोहोंचून संपूर्ण हिंदुस्थानांत मोंगलांचें एकछत्री साम्राज्य होईल, इत्यादि गोष्टी त्यानें बादशाहाचे

मनांत अशा मार्मिक रीतीनें ठसवून दिल्या कीं, बादशाहाचें मन त्यानें लगेच आपणाकडे ओढून घेतलें. त्यानें तावडतोब एक जंगी फौज उभारून तिचें आधिपत्य **मीर** जुमला यास दिलें व त्याला वर सांगितलेलीं राज्यें जिंकण्याचा हुकूम दिला. हें सैन्य उभारण्यांत व **मीर** जुमला यास येवढें वर्चस्व देण्यांत बादशाहाचा दुसरा असा एक गुप्त हेतु होता कीं, **दारा** त्या वेळीं फार उद्दाम रीतीनें वागूं लागला होता त्याला त्या गोष्टीमुळें चांगली जरब बसावी.

**दारा**चे मनांत हळूहळू राज्याचा सर्व कारभार आपणच चालवावा व बादशाहास ठेवतां येईल तितकें राज्यकारभारापासून अलग ठेवावें, असे विचार घोळूं लागले. **शहा-**जहान मोठा धूर्त असल्यामुळें **दारा**चा हा अंतस्थ हेतु त्यानें तेव्हांच ताडला, व त्यामुळें त्याची **दारा**वर थोडीशी इतराजी झाली; परंतु पुढें लौकरच दुसरी एक गोष्ट घडून आली तिच्यामुळें तर बादशाहास **दारा**ची फारज चीड आली व तो त्याचे मनांतून पक्का उतरला. तो प्रकार असाः त्या वेळीं **सादुल्लाखान** नांवाचा एक सरदार बादशाहाच्या वजिरीचें काम पहात होता. तो मोठा हुशार असून त्याचे शहाणपणाची सर्व **आशिया** खंडभर प्रसिद्धि झाली होती. बादशाहाचा मुख्य इतबार या वजिरावर असे. पुढें त्यास **दारा** यानें विषप्रयोग करून ठार मारिलें. परंतु ठार मारण्यासारखा त्यानें **दारा**चा कांहीं विशेष अपराध केला होता असें दिसत नाहीं. कदाचित् **दारा**ला असें वाटलें असेल कीं, तो मोठा हुशार असून त्याच्याजवळ फौजफांटाही बराच होता त्यामुळें बादशाहाचे मागें सर्व राज्याचीं सूत्रें त्याचे हातांत अडकून राहतील, व **सुलतान सुजा**चे

पक्षाकडे त्याचा कांहींसा ओढा होता यामुळें तो सुजा यास पादशाहा करील; व त्यामुळें त्यानें त्यास ठार मारिलें असावें. कोणी असेंही ह्मणतात कीं, सादुल्लाखान मुळचा हिंदु असल्यामुळें दरबारांतील इतर मुसलमान उमरावांस त्याचा उत्कर्ष सहन न होऊन हा बादशाहाचे मागें आपल्या मुलास किंवा दुसऱ्या कोणा पठाणे[1] जातीच्या सरदारास गादीवर बसवून मोंगलाई बुडविणार आहे, असे खोटेनाटे विचार त्यांनीं दाराचे मनांत भरवून दिले, व त्यामुळें त्यानें त्यास ठार मारिलें. कांहीं असो, परंतु वरील निंद्य गोष्टीमुळें बादशाहास दाराची फार भीति वाटूं लागली व त्याच्या मर्जीतून तो अगदीं उतरला.

मीर जुमला याचे हाताखालीं येवढी मोठी फौज देऊन दक्षिणेंत पाठविणें ह्मणजे अन्यपक्षीं तितक्या सैन्यानें औरंगजेबाची शक्ति ज्यास्त वाढविणें होय, असें दारास वाटून त्यानें, तूर्त येवढें मोठें सैन्य दक्षिणेंत आपण पाठवूं नये, म्हणून परोपरीनें बादशहास सांगितलें. परंतु बादशाहानें त्याच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. शेवटीं त्यानें बादशाहास अशी विनंति केली कीं, "आपणास हें सैन्य दक्षिणेंत पाठविणेंच असेल तर निदान या मोहिमेंत औरंगजेबानें तरी कांहीं ढवळाढवळ करूं नये अशी कांहीं तरी अट ठेवावी." बादशाहानें तें त्याचें बोलणें मान्य करून असा ठराव केला कीं, "या स्वारींत औरंगजेबानें कोणतीही ढवळाढवळ करूं नये, त्यानें दौल-

१ बाबर यानें मोंगल घराणें हिंदुस्थानांत स्थापन केलें. त्याचे पूर्वीं लोदी घराणें राज्य करीत होतें. त्या घराण्यांतील पुरुष पठाण जातीचे असून सादुल्लाखानाची बायको त्या जातीची होती.

तावाद सोडून कोठेंही जाऊं नये, त्यानें फक्त दक्षिणेच्या सुभ्याचें काम पहावें, मोहिमेची सर्व व्यवस्था एकटा मीर जुमला यानेंच करावी व त्यानें आपले इमानीपणाबद्दल आपलें कुटुंब आग्रा येथें ओलीस ठेवावें. या शेवटच्या अटीमुळें मीर जुमला यास मोठी चीड आली. परंतु "केवळ दाराचें थोडक्या गोष्टीकरतां मन मोडूं नये एवढ्या करितांच मीं ही अट घातली आहे, वस्तुतः तींत विशेष तथ्यांश आहे असें नाहीं, तुमचे मागें तुमचीं मनुष्यें मी लौकरच पाठवून देईन," इत्यादि गोष्टी सांगून बादशाहानें त्याचा राग शांत केला. नंतर मीर जुमला बादशाहाची जंगी फौज बरोबर घेऊन दक्षिणेंत आला व प्रथमतः विजापूरचे राज्यांत शिरून त्यानें कल्याण नांवाच्या एका शहरास वेढा दिला.

अशा रीतीनें मीर जुमला विजापुरचे राज्यांत धामधूम करीत असतां, व बादशाहाचे चौघेही पुत्र आपापल्या सुभ्यांत दिल्लीच्या गादीविषयीं होणाऱ्या भावी तंट्यांसंबंधानें आपापला पक्ष जोरांत आणण्याचा प्रयत्न करित असतां, शहाजहान अकस्मात् आजारी पडला. तारीख १ सपटेंबर सन १८५७ रोजीं त्यास अपस्मार वायूचा झटका झाला. मग काय विचारतां? वायुवेगाप्रमाणें ती बातमी संपूर्ण राज्यांत हां हां म्हणतां पसरली. त्या वेळीं राज्यांतील संपूर्ण प्रजा हवालदील झाली; त्यांच्या चित्ताची शांतता नाहींशी झाली व त्यांना वित्ताची व जीविताची मोठी भीति वाटूं लागली; आणि संपूर्ण मोंगल बादशाहींत राज्याच्या उलाढालीच्या चळवळी सुरू झाल्या. दारा यानें आग्रा व दिल्ली येथें मोठी जंगी फौज गोळा केली; सुजा यानें

दाराशीं सामना देण्याकरितां बंगाल्यांत मोठी कडेकोट तयारी चालविली; तसेंच दक्षिणेंत औरंगजेब व गुजराथेंत मुराद हेही आपापल्या पदरीं ज्यास्त फौजेचा भरणा करूं लागले. सुजा, औरंगजेब, व मुराद यांचीं पत्रें दरबारी मंडळींत खेळूं लागलीं, त्यामुळें दरबारी मंडळींतही फाटाफूट होऊन सर्व राज्यांत खेळखंडोबा सुरू झाला. वर सांगितलेल्या पत्रांपैकीं कांहीं पत्रें दाराचे हातीं पडलीं. तेव्हां तर त्याला आपल्या तिघां बंधूंचा फारच राग आला. त्यानें लगेच तीं पत्रें बादशाहास नेऊन दाखविलीं, व त्या तिघांस बादशाहानें कांहीं तरी चांगलें शासन करावें, अशाविषयीं त्यानें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. बादशाहाची अतिशय आवडती कन्या बेगम साहेब हिनेंहि त्या तिघांच्या पुष्कळ नालस्त्या त्यास सांगितल्या व त्याचें मन दाराकडे लागावें म्हणून आपणाकडून करतां आला तितका प्रयत्न केला; परंतु बादशाहाचें मन दाराविषयीं पूर्वींपासून कलुषित झाल्यामुळें त्याचा दाराच्या बोलण्यावर मुळींच विश्वास बसेना, व कोणत्याही रीतीनें त्याला मदत करावी असें त्यास वाटेना. त्याचा दारावरचा विश्वास इतका उडाला होता कीं, दारा सादुल्लाखानाप्रमाणें आपणासही कदाचित् विषप्रयोग करील कीं काय, अशी त्याला मोठी भीति पडली होती. त्यामुळें त्याला कांहीं खाणेंपिणें झाल्यास तें तो मोठ्या चिकित्सेनें खात असे. असें म्हणतात कीं, या वेळीं बादशाहा व औरंगजेब यांच्यामध्यें गुप्त रीतीनें पत्रव्यवहार सुरू झाला होता, व दारास ती गोष्ट समजली तेव्हां त्यानें अतिशय संतापून जाऊन बादशाहास मोठी धमकीही दिली होती. बादशाहाची प्रकृति दिवसेंदिवस ज्यास्त बिघडत

चालली होती, व एकदां तर तो मेला अशी खोटीच कंडी सर्व आग्रा शहरभर पसरली. त्या वेळीं आग्रा शहर भीतीनें गर्भगळीत होऊन गेलें; मोठा हाहाकार उडाला; दरबारांत अतिशय गोंधळ माजून गेला; वाणी-उदमी, तेलीतांबोळी, शेटसावकार, यांच्या तोंडचे पाणी पळालें व कितीएक दिवस ते आपलीं दुकानें बंद करून बसले; लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं; त्यांना आपल्या कुटुंब-संरक्षणाची मोठी भीति पडली; व ज्याच्या त्याच्या चेहे-ऱ्यावर भावी संकटाची छाया दिसूं लागली. पूर्वी शहा-जहान राज्यपदारूढ झाला त्या वेळीं त्यानें ज्याप्रमाणें गादीवर हक्क सांगणाऱ्या आपल्या इतर बंधुवर्गाचें सत्र केलें होतें, त्याच्यापेक्षां भयंकर असें दुसरें महासत्र आतां लौक-रच सुरू होणार व या चौघां भावांपैकीं जो विजयी होईल त्याच्या क्रोधाग्नींत बाकीच्या तिघांच्या, त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांच्या, व त्यांच्या साह्यकारी मंडळीच्या खात्रीनें आहुति पडणार असें सर्वांस वाटूं लागलें.

चौघां बंधूंपैकीं प्रथमतः सुजा लढाईची मोठी कडेकोट तयारी करून बंगाल्यांतून निघाला. त्यानें बंगाल्यांत लहान लहान संस्थानें व राज्यें मोडून टाकून, व पुष्कळ संस्थानें लुटून, अतोनात संपत्ति मिळविली होती. तिच्या जोरावर त्यानें आपल्या पदरीं फार मोठी फौज ठेविली होती. त्यानें आपल्या सैन्यांत अशी कंडी पिकाविली कीं, "दारा यानें बादशाहास विषप्रयोग करून त्याचा खून केला आहे, याकरितां आपल्या पित्याच्या भयंकर खुनाचा सूड मला घेतलाच पाहिजे." अशा रीतीनें तो आग्रा शहरावर चाल करून आला. दारा यानें बादशाहास या एकंदर

हकीकतीची वर्दी दिली, तेव्हां त्यानें मी अद्यापि जिवंत असून औषधी उपचारांनीं माझी प्रकृति हल्लीं बरीच सुधारत चालली आहे, इत्यादि गोष्टी लोकांच्या मनाचा गैरसमज दूर करण्याकरितां प्रसिद्धपणें जाहीर केल्या. त्याचप्रमाणें सुजा यासही त्यानें ती गोष्ट कळविली, व "तुह्मीं पुढें न येतां एकदम बंगाल्यांत निघून जावें," म्हणून त्यास आज्ञापत्र पाठविलें. परंतु बादशाहाचें दुखणें असाध्य आहे असें दरबारांतील त्याच्या पक्षाच्या मंडळीनें त्यास अगोदरच कळाविलें होतें, त्यामुळें मागें न फिरतां तो तसाच पुढें चाल करून येऊं लागला. तो आपल्या लोकांस असें सांगूं लागला कीं, "बादशाहा जिवंत आहे, ही गोष्ट खरी नसून मीं बंगाल्यांत परत जावें, एवढ्याच हेतूनें दारानें ही गप्प उठविली आहे. बरें, कदाचित् बादशाहा जिवंत असलाच तर एवढ्या लांबीच्या पल्लयावर येऊन आतां तो आसन्नमरण झाला आहे, अशा वेळीं त्याला न भेटतां परत जाणें ही गोष्ट पुत्रधर्मास अतिशय लांछनास्पद आहे." असो. अशा रीतीनें मागें न फिरतां तो आग्रयाच्या अगदीं नजीक येऊन ठेपला.

सुजा यानें बंगाल्यांत दाराबरोबर लढाई करण्याकरितां तयारी केली, त्याच वेळीं दक्षिणेंत औरंगजेबानेंही तशीच तयारी चालविली होती. परंतु तो मोठा दूरदृष्टि असल्यामुळें सुजाप्रमाणें एकदम हातघाईस न येतां त्यानें आपली तयारी मोठ्या धिमेपणानें चालविली होती. सुजा यास बादशाहानें जसें पत्र पाठविलें होतें, तसेंच त्यानें औरंगजेबासही एक पाठविलें. ह्या पत्रावर बादशाहाची सही असून शिवाय दाराचीही सही होती. त्यांत बादशाहानें त्याला

असें निक्षून लिहिलें होतें कीं, "तुह्मीं कोणच्याही सबबी-वर दक्षिण सोडून उत्तर-हिंदुस्थानांत येऊं नये; आल्यास तुम्हांस मोठी कडक शिक्षा होईल." परंतु तो कावेबाज औरंगजेब अशा पोकळ डरकावणीस भिणारा पुरुष नव्हता. त्यानेंही सुजाप्रमाणेंच "सदरहू पत्र खुद्द बादशाहाचें नसून दारानें बनावट केलेलें आहे," असें स्पष्टपणें आपल्या मित्रमंडळींत बोलून दाखविलें. त्यानें लढाईची मोठ्या ज्यारीनें तयारी चालविली. आपण कितीही फौज वाढविली, तरी दारा, सुजा, व मुराद यांच्याशीं पृथक् पृथक् लढून आपला निभाव लागणार नाहीं ही गोष्ट तो पूर्णपणें ओळखून होता. तेव्हां त्यानें प्रथमतः आपलें कपटजाल पसरून त्याच्या योगानें आपला बहुतेक कार्यभाग उरकून घेण्याचा प्रयत्न केला, व तो त्याचा प्रयत्न चांगल्या रीतीनें शेवटास गेला. त्याचा प्रकार येणेंप्रमाणें:—

त्यानें मनांत असा विचार केला कीं, आपल्या सर्व बंधूंत शूर, धाडशी, परंतु मूर्ख असा आपला कनिष्ठ बंधु मुराद हा आहे; त्याच्यावर आपल्या पूर्वीच्या फकिरी बाण्यानें मोहिनीमंत्राचा प्रयोग केला, तर तो आपणास तेव्हांच वश होईल व तसें झालें म्हणजे, आपला एक शत्रु आपल्या मुठींत आल्याप्रमाणें होईल. तेव्हां त्यानें मुराद यास मोठ्या गौरवानें असें पत्र लिहिलें कीं, "मुराद साहेब! मला राज्याच्या दगदगीचा किती कंटाळा आहे, ही गोष्ट मीं स्वमुखानें वारंवार बोलून दाखवावी असें नाहीं. ती आपणास व सर्व जगास पूर्वीपासून महशूर आहेच. त्यामुळें, जरी या वेळीं दारा व सुजा हे सख्खे बंधू परंतु पक्के हाडवैरी बनून राज्यप्राप्तीकरितां एकमेकांचे प्राणही घेण्यास उद्युक्त झाले

आहेत, व जरी वडिलांच्या गादीवर त्यांच्या इतकाच माझा हक्क आहे, तरी आपण त्या भानगडींत न पडतां फकिरी दीक्षा घेऊन देशांतरास निघून जावें, व या नाशवंत देहाचें सार्थक्य करून घ्यावें, असें माझे मनांत येतें. परंतु माझें लक्ष्य तुमच्याकडे गेलें, व लहानपणापासून माझा तुमच्यावर जो लोभ आहे तो मनांत आला, म्हणजे माझी चित्तवृत्ति चंचल होते, व जरी मीं माझा स्वतःचा राज्यावरचा हक्क सोडून दिला आहे, तरी तें राज्य तुम्हांस मिळवून देईपर्यंत मला फकीर बनतां येत नाहीं. दारा व सुजा हे राज्यपदाला अगदीं नालायक आहेत; कारण दारा निर्बुद्ध असून धर्मलंड आहे. मुसलमानी धर्माचा त्याला बिलकूल अभिमान नाहीं; व मुत्सद्दी व अमीरउमराव लोक त्याचा अतिशय द्वेष करितात, ही गोष्ट मला पक्की माहीत आहे. सुजाही दाराप्रमाणेंच पाखंडी असून येवढा मोठा राज्यकारभार चालविण्याचा वकूब त्याचे अंगीं नाहीं. सत्यधर्मास स्मरून मी प्रतिज्ञापूर्वक असें सांगतों कीं, माझ्या सर्व बंधूंत येवढा अवाढव्य राज्यशकट हाकण्यास सकलगुणगणमंडित असे फक्त आपण आहां. हें केवळ मीच म्हणतों असें नाहीं, तर दरबारांतील थोर थोर मुत्सद्द्यांचेंही असेंच मत आहे. ते आपल्या शौर्याची व अलौकिक पराक्रमाची फारच तारीफ करित असतात. आपणास राज्यप्राप्ति करून देण्याचे कामीं हा माझा देह खर्ची पडला तरी हरकत नाहीं, परंतु जीवेंभावेंकरून या कामीं आपणास मदत करण्याचा मीं निश्चय केला आहे. आपण राज्यपदारूढ झालां म्हणजे माझी एक इच्छा आहे तेवढी मात्र तृप्त करण्याचें आपण मला वचन दिलें पाहिजे. ती एवढीच कीं, परमेश्वराची

ध्यानधारणा करून ह्या नाशवंत व मायिक जगाच्या संबंधा-पासून अलग राहण्याकरितां, जेथें जगाचा उपसर्ग काडी-इतकाही लागणार नाहीं, अशी एकांतवासाची जागा आपण मला दिली पाहिजे. माझी सर्व फौज व पैसा मीं आपल्या कामीं खर्च करण्याचा निश्चय केला आहे. या पत्रासोबत आपल्या बंधुप्रेमाची खूण म्हणून एक लाख रुपयांचे तोडे पाठविले आहेत, त्यांचा आपण स्वीकार कराल अशी आशा आहे. प्रसंग फार बिकट येऊन पोहोंचला आहे, याकरितां आपण प्रथमतः असें करा कीं, सुरतच्या किल्ल्यास वेढा घालून तो घ्या, म्हणजे तेथें आपणास अतिशय द्रव्य सांपडेल व त्याच्या जोरावर आपणास फौजफांटाही ज्यास्त वाढवितां येईल."

औरंगजेबाचें वरील पत्र व एक लाख रुपयांचे तोडे मुराद यास येऊन पोहोंचतांच तो बेअक्कल मुराद त्याच्या मोहजालांत अगदीं पक्का गुरफटून गेला. तो पुढील वैभवाचे मनोराज्यांत दंग होऊन त्याच्या मनोवृत्ति तन्मय होऊन गेल्या. त्यानें औरंगजेबाकडून आलेलें पत्र लहान थोर अमीरउमरावांस व शेटसावकारांस वाचून दाखविलें. तसें करण्यांत त्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, त्यांनीं त्यास लागेल तितक्या पैशाची मदत करावी व त्याच्या पक्षास सामील व्हावें. तो तेव्हांपासूनच बादशाही थाटानें वागूं लागला, व "पुढें मी आग्र्यास गेल्यावर तुम्हांस मोठमोठ्या देणग्या देईन" अशीं लोकांस भडाभड वचनें देऊं लागला. वरील गोष्टीमुळें त्याला त्या वेळीं बराच पैसा मिळाला व त्यानें आपली फौजही बरीच वाढविली. नंतर त्यानें शाहा अबास नांवाच्या आपल्या इमानी व शूर सर-

दाराच्या हाताखालीं तीन हजार फौज देऊन त्याला सुरतेचा किल्ला घेण्याकरतां पाठवून दिलें.

मुराद यास अशा रीतीनें भुरळ पाडल्यावर त्या कपटपटु औरंगजेबानें आपला मोर्चा मीर जुमला याजकडे फिरविला. जरी त्याचा व मीर जुमला याचा पूर्वीपासून स्नेह होता, तथापि बादशाहानें त्याच्या हाताखालीं मोठें सैन्य देऊन त्यास स्वतंत्र रीतीनें विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें जिंकण्याकरितां दक्षिणेंत पाठवून दिलें होतें, तेव्हां तो स्वतःचें काम सोडून आपणास येऊन साह्य करील अशी औरंगजेबास खातरी नव्हती; व त्याला तर मीर जुमल्यासारख्या शूर व हुशार सरदाराची मदत अवश्य पाहिजे होती. त्यानें प्रथमतः आपला वडील पुत्र सुलतान महंमद यास त्याचेकडे पाठवून दिलें, व त्याचेबरोबर त्यास असा निरोप पाठविला कीं, "दरबारांतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टींत मला आपली सल्ला घेणें आहे, याकरितां मेहेरबानी करून आपण मला दौलताबाद येथें येऊन भेटावें." मीर जुमला यानें त्या निरोपाचें इंगित तेव्हांच ताडलें व "मला सैन्य सोडून तूर्त आपले भेटीस येतां येत नाहीं" असा परत निरोप पाठविला. शिवाय त्यानें औरंगजेबास असेंही कळविलें कीं, "मला आग्र्याहून नुकतेंच पत्र आलें आहे त्यांत बादशाहा अद्यापि जिवंत आहे असें लिहिलें आहे. तेव्हां आपण तूर्त विशेष खटपटींत पडूं नये." मीर जुमला यास औरंगजेबाचे पक्षास या वेळीं मिळतां येईना, याचें मुख्य कारण असें होतें कीं, त्याचें सर्व कुटुंब आग्रा येथें दाराचे ताब्यांत होतें व "आपण त्याचा हाडवैरी औरंगजेब यास जाऊन मिळालों तर तो आपल्या कुटुंबाची

घाताहत करण्यास कधींही चुकणार नाहीं," अशी त्यास मोठी भीति होती. शेवटीं, या गृहकलहाग्नीचा निकाल लागेपर्यंत आपण कोणत्याच पक्षास मिळूं नये, असा मनाचा धडा करून तो स्वस्थ बसला. महंमद यानें पुष्कळ रीतीनें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं हताश होऊन तो दौलताबादेस परत आला. परंतु औरंगजेब दीर्घोद्योगी असल्यामुळें त्यानें आपला प्रयत्न शिथिल होऊं दिला नाहीं. त्यानें लगेच आपला द्वितीय पुत्र सुलतान माजूम किंवा मोअज्जीम यास मीर जुमला याचेकडे पाठवून दिलें. त्या राजपुत्रानें काय जादू केली असेल ती असो, पण हो ना होतां होतां त्यानें शेवटीं आपला पगडा मीर जुमला याच्यावर बसविला, व तो आपली फौज बरोबर घेऊन दौलताबादेस येण्याकरतां निघाला.

तो दौलताबादेस आल्यावर औरंगजेब लगेच त्याचे भेटीस गेला व त्याचा त्यानें मोठा आदरसत्कार केला. औरंगजेब पुढें त्यास बहुमानपुरःसर 'बाबा' असें ह्मणूं लागला. पुढें एके दिवशीं त्यानें मीर जुमला यास आपले खासगी महालांत नेलें व त्यास सांगितलें कीं, "महंमद याचेबरोबर 'मला तूर्त येतां येत नाहीं' ह्मणून आपण जो निरोप पाठविला त्याचें इंगित मीं ताडलें आहे, व दरबारांत माझे जे शहाणे पुरस्कर्ते आहेत त्यांचेंही असें मत आहे कीं, आपलें कुटुंब आग्रा येथें दाराच्या ताब्यांत असल्यामुळें आपणास उघडपणें माझ्या पक्षास मिळतां येणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपण माझें गुप्त रीतीनें साहाय्य करतां, ही गोष्ट अप्रत्यक्ष रीतीनेंही दारास कळून उपयोगी नाहीं. तथापि

कशीही अडचण आली तरी तिच्यावर तोडही असलीच पाहिजे, असा सिद्धांत आहे. ह्या कामीं मला एक युक्ति सुचली आहे; आपणास ती रुचली तर माझें पूर्ण रीतीनें काम होऊन त्या योगानें आपल्या कुटुंबासही तोशीस लागणार नाहीं. सकृद्दर्शनीं माझी युक्ति आपणास फारच चमत्कारिक वाटेल व कदाचित् माझा आपणास राग येऊन आपणास ती मुळींच मानवणार नाहीं. परंतु थोडा विचार केला तर आपणास ती पसंत पडलीच पाहिजे, अशी माझी खातरी आहे. माझी युक्ति अशी आहे कीं, आपण माझे कैदी, अशा रीतीनें दौलताबादेच्या किल्ल्यावर राहवें व त्या ठिकाणीं आपल्या रखवालीकरितां ह्मणून मी आपल्या एका मुलास आपल्याजवळ ठेवितों. त्यायोगानें आपण माझे शत्रु आहां अशी दाराची पक्की खातरी होईल व तो आपल्या कुटुंबास मुळींच त्रास देणार नाहीं. त्याचप्रमाणें आपणासारख्या बलिष्ट सरदारास मीं कैदेंत टाकलें, हा पुकार बाहेर झाला ह्मणजे लोकांवर माझा चांगला वचक बसून मला ते अनुकूल होतील. आपल्या फौजेपैकीं कांहीं फौज आपण माझे मदतीस द्यावी. तिची आपण सांगाल तशी व्यवस्था मी ठेवितों. तसेंच या कामीं पैशाचीही आपण मला मदत केली पाहिजे. इतक्या सर्व गोष्टी आपण मेहेरबानीनें कबूल केल्या, तर पुढें होणाऱ्या लढाईत मला यश येईल अशी माझी पक्की खातरी आहे, व त्याचें खरें श्रेय आपणास मिळेल."

या वेळीं मीर जुमला यानें औरंगजेबास काय उत्तर दिलें असेल तें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु इतकी गोष्ट खरी आहे कीं, त्यानें त्याच्या सर्व अटी कबूल केल्या; त्यानें आपलें सैन्य त्याच्या ताब्यांत दिलें, तसेंच त्यानें त्यास

पैशाचीही मदत दिली व विशेष आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट ही कीं, त्या शूर सरदारानें औरंगजेबाचा कैदी ह्मणून आपणास दौलताबादेच्या किल्ल्यांत नेऊं दिलें. असें वाटतें कीं, मीर जुमला या मानहानीस कबूल झाला तो, औरंगजेब बादशाहा झाल्यावर आपला फार मोठा फायदा होईल अशी आशा उत्पन्न झाल्यामुळें व त्या दोघांमध्यें जो अकृत्रिम स्नेह जडला होता त्यामुळें झाला असावा. नाहींतर तो मानी व शूर पुरुष अशा लांछनास्पद गोष्टीस कधींही कबूल झाला नसता. कोणी असेंही म्हणतात कीं, औरंगजेबानें मीर जुमला यास आपल्या खाजगी दिवाणखान्यांत नेलें तेव्हां त्याच्याजवळ त्याचे पुत्र सुलतान महंमद व सुलतान माजूम हे सशस्त्र होऊन बसले होते. सुलतान महंमद याचा पूर्वीपासून मीर जुमला याच्यावर राग होता, कारण त्याचे ह्मणण्यास रुकार देऊन तो त्याचेबरोबर दौलताबादेस आला नव्हता. त्यानें तर आपला हात तरवारीच्या सळावरच ठेविला होता; व सुलतान माजूम हा तर माजूम खाल्लेल्या मनुष्याप्रमाणें डोळे लाल करून त्याच्याजवळच बसला होता. तेव्हां अशा वेळीं "आपण औरंगजेब सांगेल त्याप्रमाणें वागलों नाहीं तर हे कृतांत आपला खून करावयास कधींही मागेंपुढें पाहणार नाहींत" अशी त्यास भीति उत्पन्न होऊन प्रसंगास पाठ देऊन त्यानें त्याच्या सर्व अटी कबूल केल्या असाव्या, व हेंच ह्मणणें पुष्कळ अंशीं खरें असावें असें वाटतें.

पुढें मीर जुमला यास औरंगजेबानें कैद केलें ही गोष्ट त्याच्या सैन्यास कळतांच त्या लोकांनीं मोठा गिल्ला केला, व आमचे सरदारास सोडून द्या, नाहींतर आम्ही दौलता-

बादेचा किल्ला फोडून टाकूं असें ते म्हणूं लागले. परंतु औरंगजेबानें मीर जुमला याचे फौजेंतील मुख्य मुख्य सरदारांस बोलावून आणून त्यांस असें सांगितलें कीं, "मीर जुमला यास खरोखर कैद केलें नसून तो आपखुशीनें किल्ल्यांत जाऊन राहिला आहे. वरील गोष्ट त्याचें आमचे विचारें ठरली असून त्यापासून आह्मांस एक मोठा कार्यभाग साधणें आहे;" व आपल्या बोलण्याप्रमाणें त्यानें त्यांची खातरीही करून दिली. तसेंच त्या सैन्याचा आपणावर ज्यास्त विश्वास बसावा ह्मणून त्यानें त्या सर्व लोकांस तीन महिन्यांचा आगाऊ पगार दिला व त्यांत जे प्रमुख होते त्यांस मोठमोठ्या देणग्या दिल्या, शिवाय "मी तुह्मांस पुढें चांगलें इनाम देईन" इत्यादि गोडीगुलाबीच्या गोष्टी सांगून त्यानें त्या लोकांतील असंतोष काढून टाकून त्यांची प्रीति संपादन केली. वरील दोन गोष्टींवरून औरंगजेब किती कावेबाज व दूरदृष्टि होता हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. असो.

वर सांगितल्याप्रमाणें मीर जुमला याची फौज औरंगजेबास मिळाल्यामुळें त्याच्याजवळ बरीच फौज जमली. नंतर तें सर्व सैन्य बरोबर घेऊन तो प्रथमतः सुरतेकडे मुराद याचे मदतीस निघाला. कारण सुरत शहर त्या वेळेपर्यंत मुराद याचे हातीं आलें नव्हतें. परंतु मार्गांतच त्याला तें शहर मुराद यानें काबीज केलें अशी बातमी कळली, त्यावरून त्यानें आपल्या सैन्याचा मोर्चा लगेच फिरविला व मुराद यास सुरत घेतल्याबद्दल आनंदप्रदर्शित असें एक पत्र पाठविलें. या पत्रांत मीर जुमला याचेविषयींचाही त्रोटक मजकूर लिहून मुराद यास आणखीं असें कळविलें कीं, "मीर

जुमला याची सर्व फौज आपणांस येऊन मिळाल्यामुळें आपणांजवळ आतां बरीच फौज जमली आहे. तसेंच त्यानें आपणांस पैशाचीही चांगली मदत केली आहे, दरबारांतील बहुतेक मंडळी आपणांस अनुकूल आहे, आतां आग्र्यावर स्वारी करण्यास कांहीं हरकत नाहीं. मी आपल्या लोकांनिशीं निघालों आहें. मी अमुक स्थळीं तुमची वाट पहात बसतों, तर तुम्हीं त्या ठिकाणीं मला त्वरेनें येऊन मिळावें."

मुराद यास सुरतेस जितका खजिना सांपडेल असें वाटलें होतें तितका सांपडला नाहीं. त्यानें, पुढें आपणास अतिशय संपत्ति मिळणार आहे, या भपकीवर अगोदरच मोठी फौज चाकरीस ठेविली होती. सुरतेच्या लुटींत सरासरी त्या सैन्याचा रोजमुरा भागला; यापेक्षां पैशाच्या बाजूनें त्याचा विशेष फायदा झाला नाहीं. परंतु अन्य तऱ्हेनें त्याचा एक फार मोठा फायदा झाला. तो प्रकार असा कीं, जरी त्या वेळीं सुरत शहराची तटबंदी फारशी मजबूत नव्हती तरी आंतील लोकांनीं बरेच दिवस मुराद यास दाद दिली नाहीं. पुढें त्याच्या पदरीं कांहीं डच कामगार होते त्यांच्या युक्तीनें त्यानें तटास सुरुंग लावून तो पाडून टाकला व तें शहर लुटलें. (जानेवारी इ० स० १६५८). सुरुंग लावण्याची युक्ति त्या वेळपर्यंत हिंदुस्थानांत माहीत नव्हती. वरील नवीन युक्तीमुळें मुराद याच्या युद्धकला-भिज्ञतेची फार ख्याति झाली, व जरी वस्तुतः त्याला तेथें फारशी संपत्ति मिळाली नाहीं, तरी लोकांमध्यें त्याला तेथें अपार संपत्ति सांपडली अशी अफवा उठली व त्यामुळें पुष्कळ लोक त्याचे पदरीं भडाभड नोकऱ्या पतकरूं

लागले. सुरत घेतल्यामुळें त्याच्या शौर्याची झालेली प्रसिद्धि, औरंगजेबाचीं व्याजस्तुतीनें ओतप्रोत भरलेलीं पत्रें, व त्याची अमृतमुख विषकुंभाप्रमाणें गोड गोड भाषासरणी, यांच्या योगानें मुराद अतिशय फुगून गेला व आपला खरा पुरस्कर्ता काय तो औरंगजेब आहे, असें त्यास वाटूं लागलें. मुराद याची या वेळची खरी स्थिति पंचतंत्रांतील "कीलोत्पाटी" वानराप्रमाणें होती, व तो आपल्या मूर्खपणामुळें औरंगजेबानें त्याला तोंडघशी पाडण्याकरतां खोदून ठेवलेल्या खड्ड्याच्या एकएक पाऊल जवळ येत होता. औरंगजेबाचें खरें कपट त्याचा इमानी सरदार शाहा अब्बास यास ठाऊक होतें. तो त्यास वारंवार सांगे कीं, " खाविंद ! औरंगजेब महा ठक आहे. आपण त्याच्यावर काडी इतकाही विश्वास ठेऊं नका. तो आपला खातरीनें दगा करील." एकदां तर त्यानें मुराद यास स्पष्ट बोलून दाखविलें कीं, "हजरत ! अद्यापि तरी सावध व्हा. मी आपल्या अनहिताची कधींहीं गोष्ट सांगणार नाहीं. औरंगजेबाच्या पत्रांची भाषा फार गोड असते हें खरें, परंतु त्याचें अंतःकरण कालकूट विषानें भरलें आहे. याकरतां आपणही त्याच्याशीं वरकांती गोड गोड वागत जा, परंतु आपला अंतर्यामींचा भेद त्यास कळूं देऊं नका. बाहेरून आपण पाहिजे तितकी साखर पेरा, परंतु आपल्या सैन्यासह त्यास जाऊन मिळूं नका. त्याला एकट्यालाच आग्र्यास जाऊं द्या. आपण धीरे धीरे बादशाहाची खरी स्थिति काय आहे त्याची खातरीलायक चौकशी करूं, व तोंपर्यंत दुसऱ्या काय काय उलाढाली होतात त्या पाहूं; म्हणजे तदनुसार पुढील वर्तनक्रम ठेवण्यास आपणास ठीक पडेल. प्रथमतः आपण या सुरत शहराचीच तटबंदी

चांगली मजबूत करूं या. ह्मणजे जरी आपणास आपला थोर हेतु साध्य करतां आला नाहीं, तरी ह्या गुजराथ सारख्या सुपीक प्रदेशाचा आपणास स्वतंत्र रीतीनें अधिकार चालविण्यास हरकत येणार नाहीं, व पुढें हळू हळू दक्षिणेची किल्ली जें बऱ्हाणपूर शहर तेंही आपल्या हस्तगत होईल." परंतु औरंगजेबानें आपल्या जादूच्यां कांडीनें त्यास इतकें भारून टाकिलें होतें कीं, त्यानें त्या दूरदृष्टि, शूर व इमानी सरदाराच्या हितवचनांकडे बिलकूल लक्ष्य दिलें नाहीं. खरोखर मुराद त्या वेळा शाहा अब्बास याच्या सुसेव्य उपदेशाप्रमाणें वागता तर त्याच्यावर पुढें जो भयंकर प्रसंग गुदरला तो न गुदरतां त्याचें अतिशय कल्याण झालें असतें; परंतु तसें झालें असतें तर "युक्तचि मरणाराला हित परिणामीं न सोसवे काढा" या मोरोपंताच्या सिद्धांतास हरताळ लागला नसता काय? असो. शाहा अब्बास याचा वरील हितोपदेश झुगारून देऊन तो दुर्दैवी मुराद संकेतस्थळीं औरंगजेबास जाऊन मिळण्याकरतां आपल्या फौजेसह निघाला, व थोडकेच दिवसांत त्याची व औरंगजेबाची गांठ पडली.

मुराद याची फौज औरंगजेबास येऊन मिळाली त्या दिवशीं औरंगजेबानें फार मोठा उत्साह केला. तो प्रथमतः मुराद यास कडकडाऊन भेटला, व जेणेंकरून त्यास आपला संशय येणार नाहीं अशा रीतीनें तो त्याच्याशीं वागूं लागला. त्यानें बंधुप्रेमाची अगदीं रेलचेल करून टाकिली होती. तो त्यास वारंवार सांगे कीं, "हजरत! राज्यपदाची मला मुळींच इच्छा नाहीं. केवळ माझा तुमच्यावर लोभ आहे, ह्मणूनच मी तुम्हांस मदत करीत आहें.

एकदां आपण तख्तावर बसलां म्हणजे मी आपल्या कामगिरींतून मोकळा झालों." या वेळीं औरंगजेबाची मुराद याजबरोबरची वर्तणूक इतक्या प्रेमाची होती कीं, एकाद्या मोठ्या शहाण्या मनुष्यालाही त्याचा तिळमात्र संशय आला नसता. तो त्याला नेहमीं बहुमानपुरःसर 'हजरत' म्हणून हाक मारीत असे. परंतु पूर्वी जेव्हां गोवळकोंड्याचें राज्य घेण्याकरतां त्यानें खटपट केली, त्या वेळचे त्याचे दुष्ट हेतु, व त्याच्या अगदीं उलट अशी त्याची हल्लींची साधीभोळी वर्तणूक, या दोन गोष्टी ताडून पाहिल्या तर त्याच्या अंतर्यामींचें कपट एकाद्या यःकश्चित् मनुष्याच्याही लक्ष्यांत आलें असतें. परंतु मुरादसाहेब इतके दीडशहाणे होते कीं, त्यांना त्या गोष्टीचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. मुराद या वेळीं पुढील राज्यप्राप्तीच्या धुंदीनें आपलें देहभान अगदीं विसरून गेला होता. गोवळकोंड्याचें राज्य कपटानें घेऊं पाहणारा महत्त्वाकांक्षी औरंगजेब फकीर होऊन एकांतवासांत काळ घालविणार, ही गोष्ट, 'पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवणें,' या गोष्टी इतकीच असंभाव्य होती. परंतु "बुद्धिः कर्मानुसारिणी"—पुढें आपल्या नशिबीं जसें असेल तशाप्रमाणें बुद्धि व्हावयाची—या प्रसिद्ध उक्तीप्रमाणें पुढें त्या मानभावी फकिराच्या हातून मुराद याचे धिंडवडे व्हावयाचे होते व त्याला अनुसरूनच त्याच्या वर्तनक्रमाची दिशा झुकली होती.

औरंगजेब व मुराद जंगी फौजेनिशीं आग्र्यावर चाल करून येत आहेत, हें वर्तमान दरबारांत कळतांच तेथें मोठी गडबड उडून गेली. त्यामुळें दाराचें मन उद्विग्न झालें, व शहाजहान यास मोठी धास्ती उत्पन्न झाली. मुराद याचें

विलक्षण शौर्य व धाडस यांना औरंगजेबाचीं गूढ कारस्थानें व दूरदृष्टि यांचा जोड मिळाल्यावर काय होईल व काय होणार नाहीं, याची त्या वृद्ध बादशाहास कल्पना करतां येईना. त्यानें वारंवार औरंगजेब व मुराद यांस निरोप पाठवावे कीं, "माझी प्रकृति आतां दुरुस्त आहे, तर पुढें न येतां तुम्हीं एकदम आपापल्या सुभ्यांवर निघून जावें; तुम्हीं परत गेल्यास तुमचे ह्या वेळेपर्यंत झालेले सर्व अपराध मी माफ करीन." परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. बादशाहाचें दुखणें असाध्य आहे हें त्यास कळलें होतें, तेव्हां त्यांनीं आपल्या लोकांत अशी अफवा उठविली कीं, "आह्मांस जीं पत्रें येतात तीं बादशाहाच्या सहीचीं नसून दारानें बनावट केलेलीं आहेत. बादशाहा या वेळीं बहुतकरून मृत्यु पावला असेल व कदाचित् तो जिवंत असलाच तर अगदीं आसन्नमरण तरी झाला असेल. बरें, कदाचित् त्याची प्रकृति दुरुस्त असलीच तर आम्हीं त्यास भेटूं व दारानें त्यास आपल्या जरबेंत ठेवून जी त्याची विटंबना मांडली आहे तींतून तरी त्याची मुक्तता करूं;" अशा बहाण्यावर ते पुढें चाल करून येऊं लागले.

शहाजहान बादशाहाची या वेळीं खरोखर फारच शोचनीय स्थिति होती. तो दुखण्यानें अतिशय गांजून गेल्यामुळें दाराच्या हातांत एकाद्या कैद्याप्रमाणें पडला होता. दारा त्याचें कांहीं चालूं देईना इतकेंच नव्हे तर प्रसंगीं तो त्याला आपल्या इच्छेप्रमाणें हुकूम द्यावयास भाग पाडी. "आपल्या मुलांत आतां खास तंटे होणार, व त्यांच्यांत जो विजयी होईल त्याच्या तरवारीला बाकीच्या पुत्रांचे बळी पडून या वृद्धावस्थेमध्यें तें भयंकर दुःख पाहण्याचें

आपल्या नशिबीं येणार" इत्यादि गोष्टी त्याच्या मनांत आल्या ह्मणजे त्याचें अंतःकरण पोळून जात असे. अतिश्रमानें मिळविलेल्या आपल्या अपार खजिन्याची या आपसांतील लढाईंत राखरांगोळी होणार, हा विचार त्याचे मनांत आला म्हणजे त्याला फार दुःख होई. एके दिवशीं तर दारानें दरबारांत त्याच्या विरुद्ध जे उमराव व सरदार होते, त्यांना बोलावून आणिलें व "तुम्हीं माझ्या इतर मुलांचा पक्ष सोडून सर्व प्रकारें दाराचें साह्य केलें पाहिजे, " अर्थात् "माझ्या इतर तिघां पुत्रांस ठार मारण्याकरितां तयार असलें पाहिजे, " असा सक्तीचा हुकूम देण्यास बादशाहास भाग पाडलें. खरोखर असा हुकूम करतांना बादशाहाच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. वास्तविक पाहूं गेलें तर बादशाहाचा खरा ओढा दाराकडे नसून त्याच्या इतर तीन पुत्रांकडे व त्यांत विशेषतः औरंगजेबाकडे होता. परंतु तो स्वतः पराधीन झाल्यामळें दारापुढें त्याचें कांहीं चालेना.

दारा यास औरंगजेब व मुराद यांच्यापेक्षां सुजाची फार भीति पडली होती. तेव्हां त्यानें आपला जेष्ठपुत्र सुलेमान याच्या हाताखालीं मोठी फौज देऊन त्यास सुजावर रवाना केलें, व औरंगजेब व मुराद यांचेवर पाठविण्याकरितां दुसरी एक मोठी फौज तयार केली. सुलेमान हा राजपुत्र त्या वेळीं ऐन पंचविशींत असून मोठा शूर, हुशार व अतिशय लोकप्रिय होता. शहाजहान याची त्याच्यावर फार मर्जी होती व आपल्यामागें आपली गादी दारास न मिळतां ती आपल्या या आवडत्या नातवास मिळावी अशी त्याची फार इच्छा होती. दारानें सुलेमान यास सुजावर पाठविलें

त्या वेळीं बादशाहानें प्रसंगीं त्याला योग्य सल्लामसलत देण्याकरितां म्हणून राजा जयसिंग[1] यास त्याचेबरोबर पाठविलें. त्या वेळीं सर्व राजपुतान्यांत जयसिंगासारखा शूर व संपत्तिमान् दुसरा राजा नव्हता. बादशाहाची त्याच्यावर फार मर्जी होती. त्यानें जयसिंगास एकांतीं असें सांगितलें कीं, "तुम्हीं काय पाहिजे तें करा, परंतु लढाईचा प्रसंग न येतां जेणेंकरून सुजा परत फिरेल अशी कांहीं तरी युक्ति करा. तुम्हीं त्यास माझा असा निरोप कळवा कीं, "तुझें कर्तव्यकर्म आहे म्हणूनच केवळ नव्हे, तर त्यांत तुझें कल्याण आहे म्हणून वेळेवर नजर देऊन तूं माझ्या उपदेशाप्रमाणें वाग. तूं आतांच आपल्या शक्तीचा उपयोग करूं नको; ती दाखविण्याचा योग्य काल पुढेंच आहे; निदान माझें देहावसान होईपर्यंत किंवा औरंगजेब व मुराद या दोघांबरोबर होणाऱ्या लढाईचा शेवट होईपर्यंत कांहीं एक हालचाल करूं नको."

बादशाहानें सांगितल्याप्रमाणें जयसिंगानें सुजा यास पुष्कळ बोध केला, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. एका बाजूस सुलेमानासारखा तारुण्याच्या ऐन भरांत असलेला शूर, महत्त्वाकांक्षी व युद्धकलाकोविद राजपुत्र व दुसऱ्या बाजूस त्याच्याच तोडीचा परंतु जरा उतार वयाचा असा त्याचा काका. दोघांसही आपण एकमेकांस दोन हात केव्हां दाखवूं असें झालें होतें. सुजा यास असें वाटलें कीं, आपण

---

१ हा जयपूरचा राजा होय. त्याला 'मिरझा राजा' असेंही म्हणत असत. हल्लींचा जयपूरचा राजा या जयसिंगाचा ३५ वा पुरुष होय. जयसिंग इ० स० १६६७ त ता० १० जुलै रोजीं बऱ्हाणपूर येथें मरण पावला.

बादशाहाच्या उपदेशाप्रमाणें वागलों व औरंगजेब व मुराद यांनीं कदाचित् दाराचा पराभव करून आग्रा व दिल्ली हीं राजधानीचीं शहरें बळकाविलीं तर त्या दोघांचा पराभव करण्यास आपणास पुढें फारच जड जाईल, तेव्हां ते दोघे येण्याचे अगोदरच आपण आपला कार्यभाग उरकून घ्यावा हें बरें. पुढें त्या दोन्ही फौजांची दृष्टादृष्ट होतांच लढाईस सुरवात झाली. तोफांचा भयंकर भडिमार सुरू झाला व गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. दोन्ही फौजा मोठ्या निकरानें लढल्या व कांहीं वेळपर्यंत जयाचें पारडें कोणत्या बाजूस कलणार त्याचा कांहींच अजमास करतां येईना. शेवटीं सुलेमान यानें सुजाचे फौजेवर एकदम मोठ्या जोरानें हल्ला केला व त्याची फळी फोडून त्याच्या फौजेची थोडक्याच वेळांत दाणादाण उडवून दिली. आपल्या सैन्याची अशी स्थिति पाहून सुजा लढाई सोडून पळून गेला. जर त्या वेळीं जयसिंग व त्याचा जिवलग मित्र शूर दिलावरखान पठाण यांनीं मुद्दाम सुजाचा पाठलाग सोडून दिला नसता, तर सुलेमान यानें त्यास खातरीनें कैद केलें असतें, व त्याच्या फौजेचा अगदीं फडशा करून टाकला असता. परंतु ज्या धन्याचें अन्न आपण आजपर्यंत खाल्लें व ज्यानें आपणास एवढ्या थोर पदास चढविलें, त्याच्या पुत्रास त्याच्या हाडवैऱ्याच्या हातीं देऊन अप्रत्यक्ष रीतीनें तरी आपण त्याच्या मृत्यूस कारणीभूत व्हावें, व राजहत्ये-सारख्या भयंकर पापास अंशतः तरी वांटेकरी व्हावें, ही गोष्ट जयसिंगासारख्या थोर, व नीतिमान् राजास निंद्य आहे असें वाटलें व म्हणूनच त्यानें सुजाचा पाठलाग सोडून

दिला. जरी ह्या लढाईंत सुजाचें प्रत्यक्ष रीतीनें फारसें नुकसान झाल नव्हतें, तरी अप्रत्यक्ष रीतीनें त्याचें फार मोठें नुकसान झालें; तें असें कीं, 'सुलेमान यानें सुजाचे फौजेचा फडशा उडवून त्याचेवर फार मोठा जय मिळविला,' अशी बातमी दरबारांत येऊन पोहोंचतांच तेथें सुजाचे पक्षाची जी मंडळी होती त्यांना मोठी भीति उत्पन्न झाली, व त्यामुळें त्यास मदत करण्याचा त्यांचा हरूप कमी झाला, व त्यांपैकीं कांहींनीं तर त्याचा पक्ष अजी सोडून दिला.

सुलमान यानें हळू हळू सुजाचा पाठलाग चालविलाच होता. इतक्यांत औरंगजेब व मुराद मोठ्या झपाट्यानें चाल करून आग्रयाजवळ येऊन ठेपले, अशी त्यास बातमी समजली; तेव्हां त्यानें सुजाचा पाठलाग सोडून दिला व आपल्या पित्यास मदत करण्याकरतां तो आपल्या फौजेसह आग्रयास येण्याचे हेतूनें परत फिरला. जर सुलेमान योग्य वेळीं दारास येऊन मिळाला असता, किंवा तो येईपर्यंत दारा स्वस्थ बसला असता, तर औरंगजेबानें दगाबाजीनें पुढें दाराचा जो पराभव केला तो त्यास करतां आला नसता. ती हकीकत येणेंप्रमाणें:—

औरंगजेब व मुराद बऱ्हाणपूर येथें नर्मदा उतरून अलीकडे आले हें वर्तमान दारा यास कळलें, तेव्हां त्याला अतिशय राग आला व ज्या संस्थानिकांच्या मुलखांतून ते आले होते त्यांचा पुढें चांगला समाचार घेण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु त्याचा उपयोग काय ? पुढें

---

१ ही लढाई काशीजवळ इ० स० १६५७ च्या दिजंबर महिन्यांत झाली असें काफीखान ह्मणतो.

उज्जनी[1] येथें तरी त्यांना नर्मदेच्या अलीकडे येऊं देऊं नये ह्मणुन दारानें कासमखान व यशवंतसिंग या दोन शूर सरदारांच्या हाताखालीं मोठी फौज देऊन त्यांना तिकडे रवाना केलें. कासमखान यास दाराचा स्वभाव मुळींच आवडत नसे व त्यामुळें त्याच्या पक्षास मदत करण्याची त्याची बिलकूल इच्छा नव्हती. परंतु आपण जाण्याचें नाकबूल केलं तर बादशाहाचा हुकूम आपण मोडला असें होईल, एवढ्या करतांच त्यानें ती कामगिरी मोठ्या नाखुशीनें पतकरिली होती. बादशाहानें त्या दोघां सरदारांस पूर्वीं जयसिंगास सुजावर पाठविलें त्या वेळीं त्याला जसें सांगितलें होतें तसेंच सांगितलें. त्यांनीं बादशाहाचा निरोप औरंगजेबास सांगण्याकरतां त्याच्याकडे पुष्कळ निरोप्ये पाठविले; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं पाठविलेल्या लोकांपैकीं एकही निरोप्या परत येईना; व औरंगजेब व मुराद तसेच पुढें चाल करीत नर्मदा नदीवर येऊन पोहोंचले. परंतु औरंगजेब येण्याचे अगोदरच कासमखान व यशवंतसिंग नदीचे अलीकडील तीरावर येऊन दाखल झाले होते.

उन्हाळा असल्यामुळें नर्मदेस पायउतार होता; व प्रतिपक्षी सैन्यांचे तळ नदीच्या दोन्ही तीरांवर पडले होते. त्या वेळीं औरंगजेबाचें सैन्य वाटेच्या श्रमानें अतिशय

---

१ बरनीर साहेब यांनीं आपल्या इतिहासांत ' उज्जनी ' असें लिहिलें आहे. परंतु तेथें ' उज्जनी ' शब्दानें ' माळवा प्रांत ' असें घेतलें पाहिजे. कारण उज्जनी त्या वेळीं माळवा प्रांताच्या राजधानीचें शहर होतें. माळवा प्रांतांत अकबरपूर येथें नर्मदा नदीस पायउतार होतो. हें शहर महूच्या आग्नेयीस ३४ मैलांवर आहे. उज्जनी बरोबर क्षिप्रा नदीचे कांठीं आहे.

थकून गेलें होतें, व जर त्या दोन सरदारांनीं एकदम नदी उतरून त्याच्यावर लगेच हल्ला केला असता तर त्याचा खातरीनें पराभव झाला असता. परंतु बादशाहाच्या गुप्त मसलतीप्रमाणें ते वागत होते, व त्यामुळेंच त्यांनीं त्या वेळीं औरंगजेबावर हल्ला केला नाहीं. पुढें दोन तीन दिवस विश्रांति घेऊन औरंगजेबाचें सैन्य ताजेतवानें झाल्यावर त्यानें आपला तोफखाना चांगल्या मान्याच्या ठिकाणीं नेला व त्याच्या माराखालीं नदी उतरून जाण्याकरतां आपले घोडेस्वार पुढें घातले. परंतु शत्रूनें त्यांच्यावर तोफांचा भडिमार केल्यामुळें त्यांना मागें हटावें लागलें. औरंगजेबाची फौज पलीकडे जाण्याकरतां मोठ्या निकरानें लढूं लागली. परंतु यशवंतसिंगानें त्यांस आपल्या बाजूकडून एक बोटभरही पुढें येऊं दिलें नाहीं. परंतु कासमखानाच्या हातून तसें झालें नाहीं. जरी त्याच्या शौर्याबद्दल व धैर्याबद्दल पूर्वी मोठी ख्याति झालेली होती, तरी या प्रसंगीं त्याच्या हातून कांहींएक झालें नाहीं, किंवा त्यानें कांहींएक केलें नाहीं. असें ह्मणतात कीं, त्यास औरंगजेबानें आंतून वश करून घेतलें होतें, व त्यामुळें त्यानें लढाई होण्याचे आदले दिवशीं आपली युद्धसामग्री वाळूंत पुरून टाकिली होती; दुसरे दिवशीं लढाई सुरू झाली तेव्हां थोडक्याच वेळांत त्याच्या जवळचा दारूगोळा संपला व त्याचे लोक स्वस्थ उभे राहिले. त्यानें अशा तऱ्हेची दगाबाजी केली तरी यशवंतसिंगानें ती लढाई तशीच नेटानें पुढें चालविली होती. नदीमध्यें मोठमोठे खडक असल्यामुळें व तिचे तीर फार उंच असल्यामुळें औरंगजेबास आपलें सैन्य पलीकडे नेतां येईना. शेवटीं मुराद मोठ्या शौर्यानें आपल्या

लोकांसह पलीकडचे तीरावर गेला, व त्याचे मागून त्याचें सर्व सैन्यही पलीकडे गेलें. यशवंतसिंग अद्यापि मोठ्या निकरानें लढत होता. दोन्ही सैन्यें अगदीं हातघाईवर आलीं आहेत, व यशवंतसिंग आपल्या शूर रजपूत शिपायांसह आपल्या शौर्याची कमाल करून सोडतो आहे, अशा वेळीं कासमखान आपल्या लोकांसह लढाई सोडून पळून गेला, व त्यामुळें औरंगजेबाच्या सर्व सैन्याचा मारा एकट्या यशवंतसिंगावर सुरू झाला. तथापि तो रजपुताचा शूर बच्चा कांहीं इतका डगमगला नाहीं. औरंगजेबाचे लोक त्याच्या सैन्यावर चोहोंकडून हल्ले करीत होते व त्याच्या ८००० शूर रजपुतांपैकीं फक्त ६०० लोक शिलक राहिले. शेवटीं हताश होऊन तो तेवढ्या लोकांनिशीं शत्रूची फळी फोडून बाहेर पडला व आग्र्यास परत न जातां आपल्या राज्यांत निघून गेला. कारण असें अपजयाचें वर्तमान घेऊन आग्र्यास जाणें त्यास प्रशस्त वाटेना.

या वेळीं यशवंतसिगाच्या बायकोविषयीं अशी एक

१ ही लढाई धरमतपूर नांवाच्या गांवाजवळ तारीख २० अप्रील सन १६५८ रोजीं झाली असें अलमगीरनाम्यांत लिहिलें आहे का.ीखान या लढाईचें वर्णन देतांना असें म्हणतो कीं, "घडी घडीस पाखंडी रजपूत लोकांच्या टोळयांचा मुसलमान लोक फडशा करून टाकीत होते; यशवंतसिंगाच्या चेहऱ्यावर निराशा व भीति यांची छाया पडली होती, व रजपुताचे ब्रीद सोडून तो शत्रूस पाठ दाखवून लढाईतून पळून गेला; व अशा रीतीनें त्यानें आपल्या नांवास अक्षयी कलंक लावुन घेतला." परंतु तें लिहितांना काफीखानास दगेबाज कासमखानाची आठवण झाली नसावी असें वाटतें; नाहीं तर त्यानें वरच्याप्रमाणें कडक टीका कधींही केली नसती.

चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, यशवंतसिंग आपल्या ८००८ रजपूत शिपायांपैकीं शिलक राहिलेले फक्त ६०० लोक बरोबर घेऊन नाइलाजास्तव लढाई सोडून परत येत आहे, हें वर्तमान तिला समजलें, तेव्हां त्या शूराचें सांत्वन करण्याचा विचार एकीकडेच राहून तिला त्याचा मोठा राग आला, व तिनें किल्ल्याचे दरवाजे बंद करून टाकिले. ती म्हणाली कीं, "ह्या मनुष्यानें आपले नांवास कलंक लाविला आहे. त्याला मी किल्ल्यांत कधींही वेणार नाहीं. तो माझा नवरा नव्हे व मी त्याची बायको नव्हे. आजपासून तो संबंध तुटला. मी या पुढें त्याचें तोंड कधींही पाहणार नाहीं. चितुरच्या महाराण्याच्या कुलांत माझा जन्म झाला आहे. त्या महाराण्याच्या जावयांमध्यें याच्या इतका हीन कोणीही निपजला नसेल. जर त्याला आपल्या शत्रूस जिंकतां येत नव्हतें तर त्यानें लढाईंतच मेलें पाहिजे होतें." इतक्यांत तिची ती लहर फिरली व ती म्हणाली "हां, चिता तयार करा. मला सती जाणें आहे. मी फसलें. माझे पतिराज अपयशाचें खापर पदरीं बांधून लढाईंतून पराङ्मुख होऊन कधींही येणार नाहींत. ते लढाईंत पडले हीच गोष्ट खरी." नंतर कांहीं वेळानें ती पुनः रागानें बेफाम झाली, व तिनें यशवंतसिंगावर दुरुक्तींचा एकसारखा भडिमार चालविला. ती त्या स्थितींत आठ नऊ दिवस होती, व तेवढ्या वेळांत तिनें आपल्यासमोर त्यास येऊं दिलें नाहीं. पुढें तिची आई येऊन तिनें तिला चार बोधाच्या गोष्टी सांगून असें सांगितलें कीं, "यशवंतसिंग बरोबर दुसरी फौज घेऊन लौकरच औरंगजेबावर पुनः स्वारी करील व आपली गेलेली कीर्ति पुनः मिळवील;" अशा रीतीनें तिचें

समाधान केलें तेव्हां तिचा राग कमी झाला. रजपूत स्त्रियांचा केवढा मानीपणा हा !

औरंगजेबाबरोबर झालेल्या लढाईचा भयंकर शेवट जेव्हां दारा यास समजला, तेव्हां तो रागानें इतका बेफाम होऊन गेला कीं, त्यानें आकाशपाताळ एक करून टाकलें. त्या वेळीं कासमखान त्याच्या तडाक्यांत सांपडता तर त्यानें त्याचें मुंडकेंच उडविलें असतें. मीर जुमला यानें औरंगजेबास पैशाची व सैन्याची मदत केल्यामुळें आपला पराभव झाला, असेंही त्या वेळीं दारास वाटलें; व रागाच्या सपाट्यांत त्यानें त्याचा मुलगा महमंद अमीरखान यास ठार मारून त्याच्या बायकोस व मुलीस बाजारांत नेऊन ठेविलें असतें. परंतु शहाजहान यानें दारास असें सांगितलें कीं, "मीर जुमला याचेविषयीं तुझ्या मनांत जी शंका आली आहे ती सर्वथैव खोटी आहे. कारण औरंगजेबाविषयीं त्याचे मनांत काडी इतकाही स्नेह नाहीं. शिवाय औरंगजेबाचे बऱ्याकरितां आपल्या बायकामुलांचे जीव संकटांत घालून तो त्याचा पक्ष स्वीकारील ही गोष्ट मीर जुमल्यासारखा शहाणा व राज्यकारस्थानी पुरुष कधींही करणार नाहीं. औरंगजेबानें कांहीं तरी दगा करून त्याला फसविलें असावें." अशा रीतीनें बादशाहानें दाराचा राग शांत करून मीर जुमला याचे कुटुंबावर गुजरणारा भयंकर प्रसंग टाळला

ह्या वरील जयामुळें औरंगजेब व मुराद यांस आपण अजिंक्य झालों असें वाटूं लागलें. शिवाय आपल्या फौजेस प्रोत्साहन मिळावें म्हणून औरंगजेबानें त्या लोकांस असें सांगितलें कीं, "दाराच्या सैन्यांत मला अनुकूल असे तीस

हजार मोंगल आहेत." ही गोष्ट कितपत खरी होती हें पुढील इतिहासावरून दिसून येईलच मुराद मोठा उतावळा असल्यामुळें आपण एकदम आग्र्यावर चाल करून जावें असें त्यास वाटलें. परंतु "आपल्या लोकांस कांहीं दिवस विश्रांति मिळणें जरूर आहे" असें औरंगजेबानें त्यास सांगून त्याचा बेत रहित केला, व ते दोघे कांहीं दिवस नर्मदेच्या सुंदर तटाकीं विश्रांति घेत राहिले. दरबारांत औरंगजेबाच्या पक्षाची जी मंडळी होती ती त्यास आग्रा येथील इत्थंभूत वर्तमान कळवीत असे; व औरंगजेबानें आपले सर्व बेत त्या धोरणावर चालविले होते. पुढें थोडक्याच दिवसांत नर्मदातीर सोडून औरंगजेबाची फौज आग्र्याकडे कूच करूं लागली.

शहाजहान यास आपलें दुखणें असाध्य आहे असें पाहून फार दुःख होत असे, व तशांत त्यानें औरंगजेब आग्र्याकडे येण्याकरितां निघाला ही बातमी ऐकिली, तेव्हां त्याला फारच दुःख झालें. आपल्या कुळावर आतां काय काय अनर्थ गुदरतील, याची त्या वृद्ध बादशाहास कल्पनाही करतां येईना त्यानें लढाईचा प्रसंग येऊं नये म्हणून अतिशय खटपट केली परंतु ती व्यर्थ गेली. तो अजारी असल्यामुळें त्याच्यानें दाराला आपल्या कह्यांत ठेववेना. वस्तुतः पहातां शहाजहान यास या वेळीं बादशाहा म्हणण्यापेक्षां दारा नाचवील तसें नाचणारें एक बाहुलें असें म्हटलें तरी चालेल. बादशाहानें पूर्वीपासून दारास अधिकार दिल्यामुळें व राज्यांतील सर्व अमीरउमरावांनीं त्याची आज्ञा पाळली पाहिजे असा सक्तीचा हुकम फिरविल्यामुळें तो फार शेफारून जाऊन आज सर्व राज्याचे

खरे बादशाहा आपणच आहों असें आपणास मानूं लागला होता. तो शहाजहान यास मुळींच जुमानीत नसे. त्यानें आपल्या अधिकाराच्या जोरावर आग्रा येथें फार मोठी फौज गोळा केली. त्या वेळीं त्याच्याजवळ एक लाख घोडेस्वार, वीस हजारांपेक्षां जास्त पायदळ व ८० तोफा येवढें सैन्य होतें. शिवाय बाजारबुणगे किती होते याची गणतीच नव्हती असें म्हटलें तरी चालेल. दारास त्या वेळीं औरंगजेब व मुराद यांच्या सैन्याच्या तिप्पट सैन्याची खोडकी जिरविण्याचें सामर्थ्य होतें. त्यांच्याजवळ चाळीस हजारही फौज नव्हती, व तीसुद्धां वाटेच्या श्रमानें अगदीं थकून गेलेली होती. अशी जरी खरी स्थिति होती तरी पुढें होणाऱ्या लढाईत दारास जय मिळेल, अशी कोणाचीही मनद्वता लवेना. त्याच्या स्नेहीमंडळीनें "आपण तूर्त या लढाईचे भानगडींत पडूं नये, दरबारांत आपले विरुद्ध बऱ्याच खटपटी चालल्या आहेत," असा त्याला पुष्कळ बोध केला. प्रत्यक्ष बादशाहानें त्याला असें सांगितलें कीं, "जर तुला लढाई करणेंच असेल, तर जरी मी दुखण्यानें जर्जर झालों आहें तरी सैन्याचें आधिपत्य मला दे. मी स्वतः औरंगजेबाबरोबर लढाईस जातों." परंतु दोन्हींपैकीं कोणतीच गोष्ट दारास पसंत पडेना. जर त्या वेळीं दारानें बादशाहाचें म्हणणें कबूल केलें असतें तर औरंगजेब व मुराद यांस बादशाहाबरोबर लढाईस उभें रहाण्याचें धैर्य झालें नसतें, व कदाचित ते उभे राहिलेच असते तर राज्यांतील सर्व प्रजेची, सैन्याची, व उमीरउमराव मंडळीची बादशाहावर अतिशय प्रीति असल्यामुळें त्यांचा पराभव झाला असता. पुढें दाराच्या स्नेह्यांनीं "निदान सुलेमान

आपणास येऊन मिळेपर्यंत तरी आपण लढाई करूं नये" म्हणून त्यास विनंति केली. परंतु तो माथेफिरू दारा तीही गोष्ट कबूल करीना. जर त्या वेळीं दारा वेळेवर नजर देऊन आपल्या हितचिंतकांच्या उपदेशाप्रमाणें वागता, तर त्या राज्यकारस्थानाला एक निराळेंच रूप आलें असतें. परंतु नशिबापुढें कोणाच्यानें धांव घेववत नाहीं. असो. वर सांगितल्याप्रमाणें दारानें सर्वांचा उपदेश झुगारून देऊन औरंगजेब व मुराद यांचेबरोबर एकदम लढाई करण्याचा निश्चय केला. असा निश्चय करण्यास जीं कारणें झालीं तीं येणेंप्रमाणें:—

दाराला त्या वेळीं असें वाटलें कीं, "बादशाहा आज माझे ताब्यांत आहे; त्याचप्रमाणें सर्व खजिनाही माझ्या हातांत आला आहे; संपूर्ण सैन्यावर माझा अधिकार चालतो आहे; सुजाचा अर्धामुर्धा पराभव झालाच आहे; औरंगजेब व मुराद यांचेबरोबर फार थोडी फौज असून ती वाटेच्या श्रमानें अगदीं थकून गेलेली आहे; त्यामुळें तिचा पराभव करून त्या दोघांस कैद करण्यास आपणास विशेष आयास पडणार नाहींत; व अशा रीतीनें दिल्लीचें राज्य निष्कंटक आपल्या हातीं येईल; जर आपण या लढाईंत सैन्याचें आधिपत्य आपल्या पित्याकडे दिलें, तर त्याचा परिणाम आपल्या मनाप्रमाणें होणार नाहीं; कारण औरंगजेब व मुराद हे त्याच्या बरोबर लढाई न करतां आपापल्या मुलखीं परत जातील, व बादशाहाचे मागें ते आपणास पुनः त्रास देऊं लागतील; बादशाहाची प्रकृति दिवसेंदिवस सुधारत चालली आहे, तेव्हां कांहीं दिवसांनीं तो पुनः राज्यकारभार पाहूं लागेल; व आपल्या हातांतून अधिकार जाऊन आपण पुनः पूर्वपदावर

येऊन बसूं. बरें, जर आपण आपला पुत्र सुलेमान याची वाट पहात बसलों, तर बादशाहा मध्यंतरीं काय घोंटाळा करील त्याचा नियम लागत नाहीं, व त्यामुळें कदाचित् आपलें नुकसान होण्याचा संभव आहे, कदाचित् सुलेमान आपणास येऊन मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसलों, व मध्यंतरीं कांहीं एक घोंटाळा झाला नाहीं असें घेऊन चाललें, व पुढें लढाई होऊन तींत आपणास जय मिळाला असें मानलें, तर त्या जयाचें श्रेय आपणास न मिळतां सुलेमान यास मिळेल; कारण तो लोकप्रिय असून त्याच्या शौर्याची अगोदरच सर्वत्र प्रसिद्धि झालेली आहे व तसें झालें म्हणजे लोक त्याची ज्यास्तच तारीफ करूं लागतील; शिवाय बादशाहाची त्याच्यावर अतिशय मर्जी आहे, ही गोष्ट निराळीच; तेव्हां या सर्व गोष्टींमुळें चढून जाऊन, अशा घोटाळ्याच्या संधीस आपलेंच घोडें पुढें ढकलून दिल्लीची गादी आपणच बळकवावी, अशी महत्त्वाकांक्षा त्यास उत्पन्न होऊन व पुत्रधर्मास गुंडाळून ठेवून तो माझ्यावरच उलटणार नाहीं म्हणून कशावरून? " काय कल्पनेची धांव ही? अति शहाणा त्याचा बैल रिकामा!

वरील एकंदर कारणांमुळें कोणाचाच उपदेश न ऐकतां त्यानें आपल्या सर्व सैन्यास कूच करण्यास हुकूम दिला, व आपण बादशाहाशाचा निरोप घेण्याकरतां आग्र्याचे किल्ल्यांत गेला. बादशाहानें त्यास आलिंगन दिलें त्या वेळीं त्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले. शेवटीं मनांतील दुःख आवरून धरून मोठ्या गंभीरपणानें तो दारास म्हणाला, "मुला, तूं माझें कांहीं एक न ऐकतां आपल्या हेक्यानेंच या सर्व गोष्टी करीत आहेस. तथापि देव तुला त्यांत यश

देवो. परंतु माझी तुला अशी आज्ञा आहे कीं, जर या लढाईंत तुझा कदाचित् पराभव झाला तर मात्र मला आपलें अपयशी तोंड पुनः दाखवूं नको. " दारास बादशाहाच्या या शब्दांचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. अशा रीतीनें बादशाहास भेटून तो आपल्या सैन्यासह आग्र्यापासून २७ कोसांवर चंबळा नदीचे कांठीं आला, व तेथें तटबंदी करून औरंगजेब व मुराद यांची वाट पहात बसला.

औरंगजेब मोठा कावेबाज असल्यामुळें त्यानें आपले हेर जिकडे तिकडे पसरून ठेविलेच होते. चंबळा नदीवर दारा आपली वाट पहात बसला आहे, ही बातमी त्यास कळतांच त्यानें दारास फसविण्याची निराळीच युक्ति काढिली. प्रथमतः तो चंबळा नदीकडेच आला व दारास दिसतील अशा बेतानें त्यानें आपल्या सैन्याचे तंबू ठोकले. दारास अशा रीतीनें नादीं लावून आंतून त्यानें बुंदेले लोकांचा राजा चंपतराय याच्याशीं कारस्थान सुरू केलें. त्यानें त्या राजास मोठमोठ्या देणग्या देऊन , पुढें तुम्हांस मोठा मुलूख देऊं इत्यादि वचनें देऊन, वश करून घेतलें; व दारास फसविण्याकरितां थोडीशी फौज मागें ठेवून तो बाकीच्या फौजेसह ज्या ठिकाणीं नदीला पायउतार होता अशा ठिकाणीं गेला. ज्या पर्वतांतून व अरण्यांतन औरंगजेबास कधींच येतां येणार नाहीं, असें दारास वाटत होतें, त्यांतून त्या राजानें त्याला सुरक्षित पार नेलें, व अशा रीतीनें औरंगजेबानें दारास फसविलें. पुढें दारास ही गोष्ट कळली त्याच्या अगोदरच औरंगजेब चंबळेच्या अलीकडे आला होता. औरंगजेबानें आपणास अशा रीतीनें फसविलें असें पाहून दाराला त्याचा अतिशय राग आला, व त्यानें

ताबडतोब त्याचा पाठलाग सुरू केला. परंतु औरंगजेब मोठमोठे मुक्काम करीत आग्र्यापासून १९ मैलांवर सामगड[1] येथें येऊन पोहोंचला, व खंदक खणून आपणच उलट दाराची वाट पहात बसला. दाराही लौकरच तेथें येऊन पोहोंचला व त्यानें आग्रा व औरंगजेब यांचे दरम्यान् आपल्या फौजेचा तळ दिला.

तीन चार दिवसपर्यंत दोन्ही फौजांची फक्त दृष्टादृष्ट होत होती. प्रत्येक दिवशीं शहाजहान याचें दारास पत्र येत होतें, व त्यांत तो त्याला असें लिहीत असे कीं, "सुलेमान अगदीं नजीक आला आहे, याकरितां विनाकारण लढाईची घाई करूं नको. आग्र्यापासून जवळच चांगलीशी जागा पाहून तेथें सुलेमान तुला येऊन मिळेपर्यंत स्वस्थ रहा." त्यावर दारानें बादशाहास इतकेंच कळविलें कीं, "आपण माझी कांहीं काळजी करूं नये. आजपासून तीन दिवसांचे आंतच औरंगजेब व मुराद यांचे हातपाय बांधून त्यांस आपल्यापुढें आणून उभे करतों. नंतर आपल्या त्या बंडखोर उभय पुत्रांस वाटेल ती शिक्षा करण्यास आपण मुखत्यार आहां." दारानें या लढाईची व्यवस्था केली, त्याचा प्रकार येणेंप्रमाणें:—

त्यानें प्रथमतः अघाडीस आपला तोफखाना ठेविला, व शत्रूस तोफांमधुन शिरतां येऊ नये ह्मणून त्यानें त्या सांखळदंडानें बांधून टाकिल्या. तोफांच्यामागें त्यानें आपला उंटांचा जेजाला ठेविला, त्याच्यामागें आपलीं पायदळ पल-

---

१ औरंगजेबाची या ठिकाणीं फत्ते झाली म्हणून त्यानें पुढें या स्थळास नांव फत्तेबाद असें ठेविलें. याला हल्लीं फत्तेगड असें म्हणतात.

टणें उभीं केलीं, व घोडेस्वार, तिरंदाज, बर्चीवाले, भालेवाले, वगैरे बाकीचें सैन्य त्यानें अगदीं निराळें ठेविलें. त्यानें आपल्या एकंदर सैन्याचे तीन भाग केले होते. उजव्या बाजूचें आधिपत्य कलीलुल्लाखान नांवाच्या सरदारास देऊन त्याचे हाताखालीं तीस हजार मोंगल लोक दिले होते. व डाव्या बाजूचें आधिपत्य रुस्तुमखान दख्खनी नांवाच्या एका शूर व प्रख्यात सरदारास देऊन त्याच्या मदतीस राजा छत्रसाल व राजा रामसिंग यांस दिलें होतें. शहाजहान बादशाहानें पूर्वीं दानिषमन्खान नांवाच्या एका हुशार व शूर सरदारास स्वारांची बक्षीगिरी[1] दिली होती. बादशाहा आजारी पडल्यावर जेव्हां दारा बादशाहास आपल्या छापेंत ठेवूं लागला, तेव्हां बादशाहाचा अधिकार अनियंत्रित चालावा अशी दानिषमन्खान याची इच्छा असल्यामुळें दाराची त्याच्यावर इतराजी झाली होती. तेव्हां त्यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला, व दारानें तो अधिकार कलीलुल्लाखान यास सांगितला.

औरंगजेब व मुराद यांनींही दाराप्रमाणेंच आपल्या सैन्याची व्यवस्था केली होती. फरक इतकाच कीं, त्यांनीं आपल्या दोन्ही बाजूंच्या सैन्यांत मधून मधून कांहीं तोफा छपवून ठेविल्या होत्या. ही युक्ति मीर जुमला याची होती, व बरेच प्रसंगीं तिच्यापासून चांगला फायदा होतो असें अनुभवास आलें होतें. शिवाय ठिकठिकाणीं त्यांनीं दारूचे बाण देऊन आपले लोक बसवून ठेविले होते. ह्या युक्तीमुळें असें होत असे कीं, हे बाण शत्रूच्या घोडेस्वारांत जाऊन फुटले म्हणजे त्यांचे घोडे बिथरून जात व त्यांच्या गोंधळामुळें प्रसंगीं बरेच लोक जायां होत.

---

१ बक्षी ह्मणजे घोडेस्वारांवरचा मुख्य अधिकारी.

अशा रीतीनें जय्यत तयारी झाल्यावर लढाईस सुरवात झाली. प्रथमतः दोन्हींकडचा तोफखाना सुरू झाला, व मागून बाणाची अशी वृष्टि झाली कीं, सर्व आकाश बाणमय होऊन गेलें. इतक्यात पावसाची अशी एक मोठी सर आली कीं, त्यामुळें कांहीं वेळपर्यंत लढाई बंद करणें भाग पडलें. परंतु पाऊस बंद होतांच पुनः तोफखाना सुरू झाला. दारा त्या वेळीं लंकेंतल्या एका सुंदर हत्तीवर बसला होता. त्यानें शत्रूच्या तोफखान्यावर एकदम हल्ला करण्यास आपल्या लोकांस हुकूम दिला, व स्वतः बरोबर पुष्कळ स्वार घेऊन औरंगजेबाच्या तोफखान्यावर चाल करून गेला. परंतु औरंगजेबाच्या लोकांनीं त्याच्यावर एकसारखा मारा चालविल्यामुळें त्याच्या सभोंवतीं त्याच्या घोडेस्वारांच्या प्रेतांचे ढिगांचे ढीग पडले, व त्यामुळें त्याच्या शिल्लक राहिलेल्या व त्याच्या मदतीस येणाऱ्या दुसऱ्या घोडेस्वारांत मोठा गोंधळ उडून गेला. इतकें झालें तरी दारा काडीइतका डगमगला नाहीं. तो मोठ्या निर्भयपणानें व शांतपणानें आपल्या हत्तीवरून लढाई कशी काय चालली आहे तें पहात होता, व तसाच पुढें लढाईच्या गर्दींत घुसत होता. त्याचें हें अलौकिक धाडसाचें कृत्य पाहून त्याच्या स्वारांच्या अंगांत पुनः वीरश्रीचें वारें शिरलें, व ते पुनः तोफखान्यावर चाल करून गेले. परंतु पुनः त्यांचा पहिल्याप्रमाणेंच फडशा उडाला. ह्या वेळीं दाराचे बरेच लोक पळून गेले. परंतु बाकीच्यांचे अंगांत दाराप्रमाणेंच आवेश चढून त्यांनीं तिसऱ्यानें मोठ्या निकरानें तोफखान्यावर हल्ला केला व तो हिसकावून घेतला. नंतर तोफांचे सांखळदंड तोडून टाकून त्यांनीं उंटांचा जेजाला व पायदळ यांच्या-

वर हल्ला करून त्यांची अगदीं दाणादाण करून टाकिली. नंतर दोन्हींकडचे घोडेस्वार एकमेकांस येऊन भिडले, तेव्हां लढाईस खरें स्वरूप आलें. प्रथमतः बाणांचा असा वर्षाव झाला कीं, त्यांच्या योगानें दशदिशा अगदीं झांकून गेल्या. बाण संपल्यावर तरवारीशीं गांठ आली, व दोन्ही फौजा हातघाईवर येऊन भयंकर कत्तल सुरू झाली. बराच वेळ कोणीं कोणास हार जाईनात, व जयाचें पारडें कोणत्या बाजूस कलतें त्याचा कांहींच अंदाज होईना. **दारा** आपल्या हत्तीवरून आपल्या लोकांस वारंवार उत्तेजन देत होता, त्यामुळें त्याच्या लोकांस ज्यास्त स्फुरण येऊन ते जिवावर उदार होऊन लढत होते. शेवटीं **दारा** आपल्या लोकांसह **औरंगजेबाच्या** घोडेस्वारांवर तुटून पडला तेव्हां त्यांचा पराभव होऊन ते पळून गेले.

**औरंगजेबही दाराप्रमाणेंच** हत्तीवर बसला होता. त्यानें आपणास जय मिळावा ह्मणून विलक्षण प्रयत्न केले, परंतु तें सर्व निष्फळ झाले. शेवटीं त्यानें कांहीं घोडेस्वार बरोबर घेऊन स्वतः **दारावर** हल्ला केला. परंतु **दारानें** त्यांचा फडशा पाडून त्यांस परत पिटाळून लाविलें. अशा नातवानीच्या प्रसंगीं **औरंगजेबानें** जें धारिष्ट व जो मनोनिग्रह दाखविला, त्याबद्दल त्याची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. आपल्या लोकांचा पराभव होऊन ते पळून जात आहेत हें तो पहात होता; आपल्याजवळ आतां एक हजार लोकांपेक्षां ज्यास्त लोक नाहींत ही गोष्ट त्यास माहीत होती; शिवाय **दारा** आपणावर हल्ला करण्याचे अगदीं तयारींत आहे, हें तो आपल्या डोळ्यांनीं पहात होता; एवढा प्रसंग येऊन ठेपला तरी तो धैर्यसागर

छातीचा कोट करून तसाच उभा होता. त्यानें आपल्या पळपुट्या सरदारांस हाका मारिल्या, व तो त्यांना ह्मणाला "वीरहो, हेंच का तुमचें शौर्य? रणांगणीं शत्रूस पाठ दाखवून पळून जाणें हें तुम्हांसारख्या पराक्रमी वीरांस शोभत नाहीं. धीर धरा, व मागें फिरा. तुम्हीं पळालां तरी जाणार कोठें? दक्षिण आतां लांब राहिली, हें तुह्मांस कळत नाहीं काय? परमेश्वर थोर आहे, तुम्हीं नेटानें प्रयत्न केला तर आपणांस अजूनही जय मिळेल." असें बोलून त्यांना ज्यास्त उत्तेजन व स्फुरण यावें ह्मणन तो ज्या हत्तीवर बसला होता त्याचे पाय साखळदंडांनीं बांधण्यास त्यानें आपल्या नोकरांस आज्ञा केली.

दारानें औरंगजेबावर चाल करून जावें ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला. परंतु लढाईची जागा फारच खडकाळ व बिकट असल्यामुळें त्याचा कांहीं इलाज चालेना, व प्रत्येक खेपेस औरंगजेबाचे लोक त्याला मागें हटवीत. औरंगजेबाची बरीच फौज अद्यापि शिलक होती. फक्त पळापळ झाल्यामुळें ती चोहोंकडे पांगली होती. दाराला या लढाईंत जय मिळाला खरा, तथापि त्याला स्वतःला असें वाटत होतें कीं, औरंगजेब आपल्या हातीं लागल्याशिवाय आपणास पूर्ण जय मिळाला असें ह्मणतां येणार नाहीं. औरंगजेब खरोखर या वेळीं दाराचे हातीं लागला असता. परंतु मध्यंतरीं एक विलक्षण गोष्ट घडून आली, त्यामुळें सर्वच विपरीत परिणाम होऊन औरंगजेब त्याच्यावर ओढवलेल्या संकटांतून मुक्त झाला; इतकेंच नव्हे, तर दाराचा पराभव होऊन त्याला समरांगणांतून पळून जावें लागलें. त्याचा प्रकार येणेंप्रमाणें:--

**दारा** आपले मनांत **औरंगजेबावर** कोणत्या रीतीनें हल्ला करावा याची योजना करीत आहे, इतक्यांत त्याला असें कळलें कीं, **रुस्तुमखान** व **छत्रसाल** लढाईंत पडल्यामुळें डाव्या बाजूच्या लोकांत मोठा गोंधळ उडून पळापळ सुरू झाली आहे, व **रामसिंग** यास शत्रूनें चोहोंकडून गराडा घातल्यामुळें तो मोठ्या संकटांत पडला आहे. तेव्हां **दारानें औरंगजेबाचा** पाठलाग सोडून दिला व आपल्या लोकांसह तो त्याला मदत करण्याकरितां निघून गेला. **दारा** तेथें येतांच लढाईचा ओघ पुनः फिरला. त्याला पाहून त्याच्या लोकांस धीर आला व ते उलटून पुनः **मुराद** याच्या फौजेवर पडले व त्यांनीं तिला मागें हटविलें. त्या वेळीं **रामसिंग** व **मुराद** हे दोघे योद्धे हातघाईस आले होते. **रामसिंगानें मुराद** यास वार केला व तो हत्तीवर ज्या हौद्यांत बसला होता त्याचे दोर कापून त्याला हौद्यासह खालीं जमिनीवर पाडावें ह्मणून तो त्याच्या अगदीं जवळ जाऊन पोहोंचला. परंतु **मुराद** कांहीं सामान्य वीर नव्हता; त्यानें **रामसिंगाचे** सर्व प्रयत्न हाणून पाडले. जरी त्याला वार लागला होता व त्याच्या सभोंवतीं रजपुतांचा गराडा पडला होता तरी तो शरण आला नाहीं. जो कोणी त्याच्या हौद्याजवळ पोहोंचे त्याच्यावर वज्राप्रमाणें मुष्टिप्रकार करून त्याला तो ठार मारीत असे. या वेळीं **मुराद** याचा एकुलता एक सात वर्षांचा पुत्र त्याच्याबरोबर हौद्यांत होता, व गोळी वगैरे लागूं नये ह्मणन त्यानें त्याला आपल्या ढालेखालीं झांकून ठेविल होतें. शेवटीं **मुराद** यानें **रामसिंगावर** अशा नेमानें एक बाण सोडला कीं, तो त्या शूर रजपूत राजाच्या मर्मस्थानीं लागून तो तत्काल गतप्राण होऊन

खालीं पडला. आपल्या शूर राजाची अशी भयंकर स्थिति पाहून रजपूत लोकांस फारच त्वेष चढला, व त्यांनीं मुराद याच्या लोकांवर भयंकर मारा चालविला. रामसिंग पडला हें ऐकून दारास फार वाईट वाटलें. परंतु त्याचे शूर रजपत लोकांनीं मोठ्या निकरानें लढाई पुढें चालविली आहे असें पाहून, औरंगजेब नाहीं तर त्याचे ऐवजीं मुराद यास तरी कैद करावें. अशा हेतूनें तो त्यांचे सहाय्यास गेला, व त्यानें मुरादाचा पराभव करून त्याच्या लोकांचा पाठलाग सुरू केला.

कलीलुल्लाखान याचे हाताखालीं तीस हजार मोंगल लोक होते व त्याला दारानें उजवे बाजूस ठेविलें होतें, हें पूर्वी सांगितलेंच आहे. औरंगजेबाचा पाठलाग करण्यास तेवढे लोक पुरे होते. परंतु डाव्या बाजूस दारा मोठ्या शौर्यानें मुराद यास मागें हटवीत असतां तो निमकहराम सरदार स्वस्थ बसला होता. तो असें सांगू लागला कीं, "फक्त आणीबाणीच्या प्रसंगीं मी आपले लोक पुढें आणावे असा मला दाराचा हुकूम आहे." परंतु त्या पाजी मनुष्याला अंतर्यामीं असें वाटत होतें कीं, आपण लढाईंतून अलग राहिलों म्हणजे दाराचा सहज पराभव होईल

ही लढाई होण्याचे पूर्वी कांहीं वर्षें ह्या कलीलुल्लाखानास दारानें कांहीं अपराधावरून जोड्यांनीं मारलें होतें; तो दंश मनांत धरून तो पाजी मनुष्य दाराचा सूड उगविण्याची संधि पहात होता. त्यानें आपले लोक लढाईस उभे केले नाहींत, याचें तरी कारण हेंच होय. दारानें आपल्या मदतीशिवाय औरंगजेब व मुराद यांचा पराभव केला, हें पाहून त्याला फार दुःख झालें. आपला मनोरथ भग्न झाला

असें पाहून दाराला फसविण्याची त्या हरामखोरानें निराळीच युक्ति काढिली. तो कांहीं लोक बरोबर घेऊन भरधांव घोडा टाकीत दाराजवळ आला व तो मुराद याचेवर हल्ला करण्याचे ऐन रंगांत आहे अशा वेळीं मोठ्यानें ओरडून त्यास म्हणाला " मोबारक आबाद, हजरत सलामत, इलहम दुल्लिल्ला,—आपलें परमेश्वर कल्याण करो, परमेश्वर आपणास ऐश्वर्य देवो व सुखी ठेवो. अपणास आज जय मिळाला हें पाहून मला फार आनंद झाला आहे. आतां दासाचें एवढेंच सांगणें आहे कीं, आपण अद्यापि या हत्तीवर उंच बसलां आहां हें फार वाईट. यामुळें आपणावर संकटें येण्याची ज्यास्त भीति आहे, ही गोष्ट खावंदांच्या नजरेस येत नाहीं.काय ? आपल्या हौद्यास लाखोंशें बाण व गोळ्या येऊन लागत आहेत त्यांपैकीं जर एखादी आपणास लागली, तर आपल्या जीवितावर अवलंबून असणाऱ्या आम्हां दासांची काय अवस्था होईल बरें ? याकरितां आपण हत्तीवरून खालीं उतरा व घोड्यावर स्वार होऊन शत्रूचा पाठलाग करा. पाठलागाशिवाय आतां दुसरें कांहीं एक कृत्य राहिलें नाहीं. माझी आपल्या चरणांपाशीं एवढीच विनंति आहे कीं, काय पाहिजे तें करा, परंतु औरंगजेब व मुराद यांस आपल्या हातचे घालवू नका."

आपण हत्तीवरून खालीं उतरलों तर त्याचा परिणाम काय होईल याचा जरा शांतपणें दारानें त्या वेळीं विचार केला असता तर ज्या हत्तीवरून त्यानें त्या दिवशीं विलक्षण शौर्याचीं व धाडसाचीं अचाट कृत्यें केलीं होतीं, त्यावरून तो खालीं उतरला नसता. परंतु त्याचें कर्मच ओढवलें त्याला तो तरी काय करणार ? त्याच्या त्या पाजी

सरदाराच्या दुष्ट उपदेशाचें भुरळ पडून तो आपल्या हत्ती वरून खालीं उतरला व घोड्यावर बसला. परंतु थोडक्याच अवकाशांत आपण केलेली भयंकर चुकी त्याच्या लक्ष्यांत आली, व कलीलुल्लाखान यानें कपटानें आपणास फसविलें असें त्यास कळून आलें. त्या वेळीं त्याला त्या सरदाराचा इतका राग आला होता कीं, तो त्याच्या जवळपास असता तर त्यानें त्याचें डोकेंच मारलें असतें. परंतु तो काफर अगोदरच तेथून पळून गेला होता. दारा हत्तीवरून खालीं उतरल्यावर त्याचा रिकामा हौदा जेव्हां त्याचे सैन्याचे दृष्टीस पडला, तेव्हां तो लढाईंत पडला असें त्याच्या लोकांस वाटून त्यांचें धैर्य सुटलें, व जो तो प्राणत्राणार्थ वाट फुटेल तिकडे पळूं लागला. दाराच्या लोकांचा असा गोंधळ पाहतांच औरंगजेब व मुराद यांचे जे लोक पळून गेले होते त्यांस अवसान येऊन ते परत फिरले; त्यांनीं दाराचे सैन्यांची भयंकर लांगडेतोड सुरू केली, व थोड्याच वेळांत समर-भूमीवर दाराचा एकही मनुष्य शिल्लक राहिला नाहीं. दैवाची गति कांहीं विचित्र आहे. जो दारा दोन घटकां-पूर्वीं आपल्या हत्तीवर विराजमान होऊन विजयगिरीच्या शिखरावर जाऊन बसला होता, तोच एवढ्याशा थोड्या अवकाशांत त्या उंच शिखरावरून एकदम खालीं ढांसळून अपजयसिंधूंत गटकळ्या खाऊं लागला, व त्याला आपल्या जिविताचीही आशा राहिली नाहीं; व पूर्वीं त्याच सिंधूंत गटकळ्या खाऊन आसन्नमरण झालेला औरंगजेब तेव-ढ्याच अवकाशांत दारा जेथून स्थानभ्रष्ट झाला होता त्या शिखरावर विराजमान झाला. एखादी गोष्ट दिसण्यांत क्षुल्लक

---

१ ही लढाई सामूगड येथें ता० २८ मे सन १६५८ रोजीं झाली.

दिसते, परंतु तिचे परिणाम किती विलक्षण होतात, हें वरील गोष्टीवरून चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे. याकरितां कोणतीही गोष्ट करणें झाल्यास ती दूरवर नजर देऊन करावी.

हा आकस्मिक व अद्भुत जय मिळाल्यामुळें औरंगजेबास फार मोठा आनंद झाला, व तेव्हांपासून फार दिवस मनांत ठेवलेली राज्यप्राप्तीची भयंकर हांव तृप्त करण्याकरितां पूर्वीपेक्षांही नीच व भयंकर अशीं कारस्थानें करण्यास त्यानें सुरवात केली. निमकहराम कलीलुल्लाखान आपल्या लोकांसह त्यास लगेच येऊन मिळाला. औरंगजेबानें त्याचा मोठा आदरसत्कार केला व तो त्याला लगेच मुराद याजकडे घेऊन गेला. तेव्हां मुराद यानेंही त्याचा मोठा गौरव करून त्याची अतिशय तारीफ केली. ह्या वेळींही औरंगजेबाची मुराद याजबरोबरची वर्तणूक एखाद्या चाकराची आपल्या धन्यापाशीं, किंवा प्रजेची राजापाशीं, जशी असावी तशा प्रकारची होती. तो त्या वेळीं मुराद यास ऐकूं जाईल अशा बेतानें कलीलुल्लाखान यास ह्मणाला कीं, "माझ्या सर्व बंधूंत बादशाही अधिकार चालविण्यास हजरत मुराद साहेबच योग्य आहेत. आज आम्हांस जो जय मिळाला तो केवळ मुराद साहेबांच्या लोकोत्तर शौर्यामुळें व धाडसामुळें मिळाला आहे."

अशा रीतीनें बोलण्याची रेलचेल करून त्यानें त्या भाबड्या व मूर्ख मुरादास राज्यप्राप्तीच्या आशेवर लटकत ठेवून, आंतून दरबारांतील प्रमुख अमीरउमरावांस पत्रें पाठविण्याचें काम मोठ्या ज्यारीनें सुरू केलें, व ते एकामागून एक त्यास येऊन मिळूं लागले. त्या वेळीं त्याचा मामा शाहिस्तेखान याची त्यास फार मोठी मदत मिळाली. तो

मोठा हुशार, शूर व खटपटी असून त्याचें दरबारांत फार मोठें वजन होतें. तो मोठा वक्ता असून त्याची लिहिण्याची शैली इतकी मोहक होती कीं, त्याची बरोबरी करणारा दुसरा कोणीही उमराव त्या वेळीं दरबारांत नव्हता. कांहीं क्षुल्लक कारणावरून तो व दारा यांच्यांत बाचाबाच होऊन त्याला दाराचा राग आल्यामुळें तो औरंगजेबाच्या पक्षास मिळाला होता. औरंगजेबास राज्यप्राप्तीची अनावर हांव सुटली होती, परंतु मुराद यास ज्यास्त गोत्यांत आणण्याकरितां त्यानें ती तशीच दाबून ठेविली होती. तो लोकांस जीं जीं वचनें देई, व त्यांच्याशीं जे कांहीं करार करी, ते सर्व आपण मुराद याचे मुखत्यार या नात्यानें करीत असे. त्याला कोणास कांहीं हुकूम करणें झालें, तर तो ती गोष्ट मुरादाच्या परवानगीनें करीत असे. तो सर्वांस सांगत असें कीं, "आमचे यजमान मुराद साहेब आहेत. मी हल्लीं जें काम करित आहें तें त्यांचा नम्र व आज्ञाधारक सेवक या नात्यानें करित आहें. मला ही राज्याची दगदग अगदीं आवडत नाहीं. या दगदगींतून केव्हां सुटेन व केव्हां फकिरी दीक्षा घेईन असें मला झालें आहे." असो. या ढोंगी फकिरास असाच येथें ठेवून आतां दाराची काय स्थिति आहे तिकडे वळूं या.

वर सांगितल्याप्रमाणें दाराचा मोड झाल्यामुळें तो भीति व निराशा यांच्यायोगानें अगदीं बेहोष होऊन गेला. तो एकदम आग्र्यास निघून आला; परंतु, "जर या लढाईंत तुझा कदाचित् पराभव झाला तर मला आपलें अपयशी तोंड पुनः दाखवूं नको," ही, दारा पूर्वी लढाईस निघाला त्या वेळची, शहाजहान याची आज्ञा अद्यापि त्याच्या मस्त-

कांत भणभणत होती; त्यामुळें त्याला बादशाहास आपलें तोंड दाखवितां येईना. तथापि बादशाहानें त्याचें सांत्वन करण्याकरितां आपला एक खोजा त्याच्याकडे पाठविला, व त्याच्याजवळ असा निरोप सांगितला कीं, "तुझा पराभव झाला ह्मणून माझी तुझ्यावरची प्रीति कमी झाली, असें तूं समजूं नको. तुझ्यावर तूर्त प्रसंग आला आहे खरा, तरी धीर सोडूं नको. तुझा पुत्र सुलेमान अद्यापि आला नाहीं. त्याच्याजवळ मोठी फौज आहे. तूर्त तूं असें कर कीं, प्रथमतः दिल्लीस जा, व तेथें आपले एक हजार घोडे आहेत ते घे; त्याचप्रमाणें पैसा, हत्ती व दुसरें युद्धोपयोगी जें सामान तुला लागेल तें देण्याविषयीं मी दिल्लीच्या सुभेदारास अगोदरच हुकूम पाठविला आहे. तें सामान तुला मिळाल्यावर फार दूर न जातां माझी पत्रें तुला लौकर पोहोंचतील अशा ठिकाणीं सुलेमान याची वाट पहात बस. औरंगजेबास अद्यापि मी आपल्या कह्यांत आणीन, व त्यानें केलेल्या अपराधाबद्दल त्यास चांगलें शासन करीन." परंतु दाराचा त्या वेळीं इतका पाणउतारा झाला होता व तो दुःखानें इतका ग्रासून गेला होता कीं, आपल्या पित्याच्या या अकृत्रिम व प्रेमपरिपूरित निरोपास काय उत्तर द्यावें हें त्यास कळेना. शेवटीं त्याची पुरस्कर्ती त्याचीभगिनी बेगम साहेब हिला शेवटचा निरोप पाठवून तो दुर्दैवी व हताश दारा आपलें कुटुंब व तीन चारशें लोक बरोबर घेऊन मध्य रात्रीस आग्रा सोडून दिल्लीस जाण्याकरतां निघाला. आतां दारास दिल्लीचे रस्त्यास लावून देऊन औरंगजेबानें पुढें काय काय कारस्थानें केलीं याविषयींचा इतिहास अगोदर हातीं घेऊं.

सामूगड येथें औरंगजेबास जय मिळाल्यावर तो प्रथमम: दाराचा पुत्र सुलेमान याच्या हाताखालीं जी फौज होती तिच्यांत फाटाफूट करण्याच्या उद्योगास लागला. कारण तसें झालें ह्मणजे आपलें नष्ट झालेलें वैभव पुन: प्राप्त करून घेण्यास दारास जो हा एकच मार्ग उरला होता तो समूळ नष्ट होईल. त्यानें सुलेमान याच्या फौजेंतील मुख्य सरदार जयसिंग व दिलावरखान यांस असें पत्र पाठविलें कीं, "तुह्मीं दाराची आजपर्यंत नोकरी केली तें योग्यच केलें. परंतु त्याचा मी आतां लढाईत पूर्ण पराभव केला आहे, व तो ज्या सैन्याचे जोरावर लढत होता तें सर्व मला येऊन मिळालें आहे. दारा येथून एकटाच पळून गेला आहे, व तो लौकरच माझ्या हातांत सांपडेल. बादशाहाची प्रकृति इतकी क्षीण झाली आहे कीं, तो आतां फार थोड्या दिवसांचा सोबती आहे. वरील गोष्टींचा विचार केला, तर दाराचा पक्ष आतां किती दुर्बल झाला आहे हें सहज तुमच्या ध्यानांत येईल. अशा पक्षास अजूनही चिकटून रहाणें किती चुकीचें आहे, हें मीं लिहावें असें नाहीं. याकरितां तुह्मी माझे पक्षास लौकर येऊन मिळावें, व त्यांत तुमचें ज्यास्त कल्याण आहे. मला येऊन मिळण्याचा तुमच्या मनाचा निश्चय झाला, तर येतांना सुलेमान यास कैद करून आणण्यास तुम्हांसारख्या शूरांस विशेष आयास पडतील असें वाटत नाहीं."

हें पत्र येऊन पोहोंचतांच जयसिंग याला कांहीं वेळपर्यंत आपण आतां पुढें काय करावें तें सुचेना. अद्यापि त्याला शहाजहान व दारा यांची फार भीति वाटत होती; तसेंच सुलेमानासारख्या थोर राजपुत्राविरुद्ध उठण्याचा

त्याला हिय्या होईना. शिवाय आपण त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, तर जिवंत असा तो आपल्या हातीं कधींही सांपडणार नाहीं, अशी त्याची खातरी होती. शेवटीं तें पत्र घेऊन तो त्याचा जिवलग मित्र दिलावरखान याच्याकडे गेला, व दोघांच्या विचाराअंतीं असें ठरलें कीं, तें औरंगजेबाचें पत्र घेऊन जयसिंग यानें राजपुत्राकडे जावें, व तें त्याला दाखवून आपला औरंगजेबास जाऊन मिळण्याचा बेतही त्यास स्पष्टपणें कळवावा. त्याप्रमाणें पुढें जयसिंग सुलेमान याच्या तंबूंत गेला, व त्याला ह्मणाला कीं, " हरजत ! आपण हें पत्र वाचलें ह्मणजे आपणावर केवढा बिकट प्रसंग आला आहे, हें सहज आपल्या ध्यानांत येईल. आतां दिलावरखान किंवा दाऊदखान[1] किंवा बाकीचें सैन्य, यांपैकीं एकही मनुष्य आपल्या उपयोगीं पडणार नाहीं. आपण आतां जर आपले पित्याचे मदतीस पुढें चाल करून जाल, तर पस्ताव्यांत मात्र पडाल. याकरितां माझें आपणास असें सांगणें आहे कीं, आपण अशा वेळीं श्रीनगरचे[2] राज्यांत

---

१ सुलेमान याचे फौजेंत दिलावरखानाप्रमाणेंच हा एक प्रमुख सरदार होता

२ हल्लीं वायव्येकडील प्रांतांत गढवाल ह्मणून जो प्रांत आहे तो पूर्वी एक स्वतंत्र प्रांत होता. त्याची राजधानी श्रीनगर नांवाचें शहर होतें, त्यावरून त्याला श्रीनगरचें राज्य असें ह्मणत असत; हा प्रदेश अलकनंदा नदीचे कांठीं आहे. श्रीनगर हें शहर हल्लीं ओसाड स्थितींत आहे, पुष्कळ इतिहासकार श्रीनगर या नांवानें काश्मीर असा अर्थ घेतात; परंतु तो चुकीचा आहे ही गोष्ट त्या वेळचा मोंगलांचे राज्याचा नकाशा पाहिला असतां त्यांत 'श्रीनगरचें राज्य' म्हणून जो प्रदेश दाखविला आहे त्यावरून सहज ध्यानांत येईल.

निघून जावें. तेथील राजा आपणास उदार आश्रय देईल अशी माझी खातरी आहे. शिवाय तो मुलूख मोठा बिकट असल्यामुळें औरंगजेबासही तिकडे जातां येणार नाहीं. तेथें स्वस्थ बसून पुढें गोष्टी कोणत्या थराला येतात त्या पहा, ह्मणजे तदनुसार वर्तनक्रम ठेवण्यास आपणास ठीक पडेल."

जयसिंगाचे हे शब्द कानीं पडतांच त्या राजपुत्रास मोठा धक्का बसला. एका क्षणापूर्वी आपण होतों कोण, व एका क्षणांत झालों कोण, हें पाहून त्याला विलक्षण दुःख झालें. आपण यापुढें अडथळा केला तर हे लोक आपला प्राण देखील घेण्यास मागेंपुढें पहाणार नाहींत असें त्यांस वाटलें. शेवटीं त्यानें सैन्यावरचा अधिकार टाकून दिला, व श्रीनगर येथें जाण्याकरतां तो आपल्या कुटुंबासह निघाला. त्या वेळीं त्याच्या बरोबर त्याच्या जिवाचे असे कांहीं सय्यद व मनसबदार लोक व थोडेसे चाकरनोकर इतकीच मंडळी होती. त्या राजपुत्राची ती दैना पाहून कोणाही मनुष्याला त्याची कींव आली असती. परंतु जयसिंग व दिलावरखान यांस त्याचें कांहीं एक वाईट वाटलें नाहीं. दिलावरखानानें तर त्या राजपुत्रावर वाटेंत छापा घालून त्याचें सामान लुटावें ह्मणून आपले कांहीं स्वार त्याच्या मागोमाग पाठवून दिले. जयसिंग मोठा थोर मनाचा राजा होता असें ह्मणतात. तेव्हां त्यानें या नीच कृत्यास कसें अनुमोदन दिलें, याचें फार आश्चर्य वाटतें. परंतु ह्मण आहे कीं, "घर फिरलें ह्मणजे घराचे वासे फिरतात;" त्या राजपुत्राच्या नशिबाचा ओघ आतां फिरला होता, त्यामुळें जयसिंगासही तशी बुद्धि झाली असेल; किंवा दिलावरखानानें तें नीच कृत्य जयसिंगास

न कळवितां केलें असेल; व हीच गोष्ट ज्यास्त संभवनीय आहे. असो. त्या स्वारांनीं वाटेंत सुलेमान याच्यावर छापा घालून त्याचें पुष्कळ सामान लुटलें व त्याचा मोहोरांनीं लादलेला एक हत्ती धरून नेला. या वेळीं राजपुत्राबरोबरची बरीच मंडळी त्याला सोडून पळून गेली. शिवाय वाटेनें खेड्यापाड्यांतील लोक द्रव्याचे आशेनें त्याच्यावर छापे घालीत, त्यामुळेंही त्याचे बरेच लोक प्राणास मुकले. अशा दुःखदायक स्थितींत शेवटीं तो दुर्दैवी राजपुत्र श्रीनगर येथें जाऊन पोहोंचला. तेथल्या राजानें सुलेमान याचा त्याच्या दर्जाप्रमाणें मोठा आदर-सत्कार केला, व त्यास आपला आश्रय दिला. त्यानें त्यास असें सांगितलें कीं, "आपण या ठिकाणीं स्वस्थ रहावें. येथें आपल्या केसासही धक्का लागणार नाहीं; व आपणास कारण पडलें, तर मी आपली सर्व फौज आपल्या मदतीस देईन." असो. अशा रीतीनें सुलेमान याची वाट लावून औरंगजेब दाराच्या भीतींतून बराच मोकळा झाला.

सामूगड येथें जय मिळाल्यानंतर तीन चार दिवसांनीं औरंगजेब व मुराद हे आग्र्याच्या किल्ल्यापासून ३ मैलां-वर शहराच्या दरवाज्यापाशीं बागेंत येऊन उतरले. नंतर औरंगजेबानें आपला एक विश्वासु खोजा आपण आल्याची बातमी बादशाहास देण्याकरितां व त्याचें कुशलवृत्त विचा-रण्याकरितां त्याच्याकडे पाठविला. हा खोजा आपल्या धन्याप्रमाणेंच मोठा पटाईत होता. त्यानें बादशाहास औरं-गजेबाचा असा निरोप सांगितला कीं, "माझी आपल्या चरणीं फार भक्ति आहे, व माझें आपणावरचें प्रेम लेश-मात्रही ढळलें नाहीं. दारा याचे हेतु फार दुष्ट होते, व

त्याला फाजील महत्त्वाकांक्षेची चाड होती, त्यामुळेंच त्याच्यावर हा भयंकर प्रसंग आला, मला या गोष्टीबद्दल फार दुःख होतें पण उपयोग काय? आपली प्रकृति आता सुधारत चालली आहे असें मी ऐकिलें, तेव्हांपासून मला किती आनंद झाला आहे तो सांगतां येत नाहीं. मी आग्र्यास आलों आहें तो केवळ आपली आज्ञा शिरसावंद्य करून आपल्या मताप्रमाणें वागावें एवढ्याकरितां आलों आहें.'

ह्या निरोपावर बादशाहानें "तूं जें केलेंस तें प्रसंगास योग्य असेंच केलेंस, व तुझी निस्सीम पितृभक्ति पाहून मला फार संतोष झाला आहे," असा निरोप सांगून त्या खोजास निरोप दिला. औरंगजेबाची राज्यतृष्णा, त्याचें दुटप्पी वर्तन, व त्याची पितृभक्ति किती आहे तें बादशाहा ओळखून होता. त्यानें औरंगजेबाच्या लुच्चेगिरीस तोड देऊन आपल्या अमीर-उमराव लोकांच्या साहाय्यानें औरंगजेबास फसविण्याचा निश्चय केला. परंतु औरंगजेब ह्मणजे साऱ्या दुनियेचा धूर्त व छद्र! त्यानें तें बादशाहाचें कारस्थान तेव्हांच ताडलें. त्यामुळें बादशाहाच्या त्या मसलतीचा शेवट असा झाला कीं, त्यानें औरंगजेबास पकडण्याकरितां ह्मणून जें जाळें पसरलें होतें, त्यांत तोच स्वतः गुरफटून पडला. त्या वेळीं बादशाहानें औरंगजेबास फसविण्याकरितां असा निरोप पाठविला कीं, "दारानें केवढा मूर्खपणा केला हें मला कळलें आहे, तसेंच तो माझ्या तख्तावर बसण्यास अगदीं गैरलायक आहे हेंही मी जाणतों. पूर्वीपासून माझें तुझ्यावर किती प्रेम आहे हें तूं जाणतच आहेस; हल्लीं सर्व राज्यांत किती घोंटाळा झाला आहे हें तुला माहितच आहे; तेव्हां तो नाहींसा करण्याकरितां काय काय उपाय योजले पाहिजेत

त्याचा विचार करण्याकरितां तूं मला त्वरेनें किल्ल्यांत येऊन भेट; भेटीअंती सर्व गोष्टींचा निकाल करतां येईल." परंतु बादशाहाचा औरंगजेबावर जितका विश्वास होता, तितकाच औरंगजेबाचा बादशाहावर होता. कारण बेगम साहेब ही दाराच्या पक्षाची असून नेहमीं बादशाहाजवळ असते व तिच्याशिवाय एक पानही हालत नाहीं ही गोष्ट औरंगजेबास माहीत होती. शिवाय तिनें किल्ल्यात तार्तरी जातीच्या कांहीं धष्टपुष्ट स्त्रिया गोळा केल्या असून आपण आंत शिरलों ह्मणजे त्यांनीं आपणावर हल्ला करावा अशा इराद्यानें त्यांना जनानखान्यांत छपवून ठेविलेलें आहे, असेंही त्यास गुप्त रीतीनें कळलें होतें. त्यामुळें त्याला किल्ल्यांत जाण्याचें धैर्य होईना. तो वारंवार "अमूक एक दिवशीं आपल्या भेटीस येतों," असा बादशाहास निरोप पाठवी; परंतु तो दिवस आला कीं कांहीं तरी सबबीवर आजचें जाणें उद्यांवर ढकलीत असे. इकडे त्याचीं गुप्त कारस्थानें चाललींच होतीं, व दरबारांतील मुख्य मुख्य उमरावांचा तो खडा टाकून ठाव पहातच होता. पुढें एके दिवशीं त्याचा पुत्र सुलतान महंमद यानें अकस्मात् आग्र्याचा किल्ला घेतला, तेव्हां सर्व लोकांस औरंगजेबाच्या कावूपणाचें आश्चर्य वाटलें. त्या धाडशी राजपुत्रानें आपणाबरोबर कांहीं निवडक लोक घेतले व त्यांस किल्ल्याचे आसपास छपवून ठेवून 'बादशाहास औरंगजेबाचा कांहीं जरूरीचा निरोप सांगावयाचा आहे' अशा मिषानें तो किल्ल्यांत शिरला व पहारेकरी बेसावध आहेत असें पाहून एकदम त्यांच्यावर जाऊन पडला. इतक्यांत त्याचे लोक त्याच्या

मदतीस आले, व त्यांनीं पहारेकरी लोकांचा पाडाव करून किल्ला हस्तगत करून घेतला.

बादशाहास ही गोष्ट समजली तेव्हां त्याला किती वाईट वाटलें असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी. ज्याच्या बंदींत आपणास केव्हां तरी पडावें लागेल असें त्याला पूर्वीपासून स्वप्न पडत होतें त्याचें प्रत्यंतर आज आपणास आलें, असें पाहून त्याला मनस्वी दुःख झालें. त्यानें कुराणाची शपथ वाहून सुलतान महंमद यास त्या वेळीं असा निरोप पाठविला कीं, "ह्या वेळीं जर तूं माझ्या मताप्रमाणें वागून मला साह्य करशील तर तुला मी बादशाहा करीन. या तुझ्या वृद्ध आजोबास या कारागृहवासांतून व दुःखांतून मुक्त केलेंस तर परमेश्वर तुझें कल्याण करील व तुझी कीर्ति अजरामर होईल."

जर त्यावेळीं त्या राजपुत्रानें आपल्या आज्याच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचें धाडस केलें असतें, तर बादशाहीपद औरंगजेबास न मिळतां सुलतान महंमद यास मिळालें असतें, असें मोठमोठ्या मुत्सद्यांचें मत आहे. कारण शहाजहान याच्यावर त्याच्या प्रजेची फार प्रीति होती, व औरंगजेबाशीं लढाई करण्याचे हेतूनें जर तो किल्ल्यांतून खालीं उतरला असता, तर राज्यांतील बहुतेक सैन्य त्याला येऊन मिळालें असतें व औरंगजेबास वाटाण्याच्या अक्षता मिळून त्याला जन्मभर ग्वालेरच्या किल्ल्यांत कैदेंत रहावें लागलें असतें. परंतु पुढें ती शिक्षा भोगणें त्या राजपुत्राचेंच नशिबीं लिहिलें होतें, तेव्हां बादशाहास साहाय्य करण्याची बुद्धि त्याला कशी होणार?

सुलतान महंमद यानें, त्याची आपल्या पित्यावर फार भक्ति होती ह्मणून, बादशाहाचें बोलणें मान्य केलें नाहीं;

असें नाहीं, तर त्याचा बादशाहाचे बोलण्यावर विश्वास बसेना; शिवाय औरंगजेबासारख्या दृढनिश्चयी, दीर्घद्वेषी, व कपटी, अशा पुरुषाशीं राज्यसंबंधीं वैर बांधलें तर आपणास त्या कामांत यश न येतां आपली पुरी दुर्दशा होऊन जाईल अशी त्यास भीति पडली. त्यामुळें त्यानें बादशाहाचें बोलणें मान्य केलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर बादशाहानें त्याला भेटीस बोलाविलें, त्या वेळीं त्यानें त्याला असा निरोप पाठविला कीं, "मी आपली भेट घेऊं नये असा माझे पित्याचा मला सक्तीचा हुकूम आहे, याकरितां मला आपले भेटीस येतां येत नाहीं." शिवाय त्यानें बादशाहास असें कळविलें कीं, "माझे पित्यास आपले भेटीस येणें आहे, तर त्यांस किल्ल्यांत कोठेंही अडथळा होऊं नये म्हणून किल्ल्याच्या किल्ल्या बरोबर आणाव्या ह्मणून त्यांनीं मला हुकूम केला आहे, याकरितां किल्ल्या ताबडतोब पाठवून द्याव्या." पुढें किल्ल्या द्याव्या किंवा देऊं नयेत याचा बादशाहा दोन दिवस विचार करीत होता. शेवटीं आपले लोक आपणास हळूहळू सोडून औरंगजेबास जाऊन मिळत आहेत असें पाहून, व यापुढें आपण औरंगजेबाशीं विरुद्ध वागलों तर तो आपली स्थिति फारच वाईट करील अशी त्यास भीति पडून, त्यानें किल्ल्या सुलतान महंमद याचे हवालीं केल्या; व त्याचेबरोबर औरंगजेबास असा निरोप पाठविला कीं, "जर तूं शहाणा असशील तर मला एकदम येऊन भेट. मला कांहीं महत्त्वाच्या गोष्टी तुझ्या कानावर घालावयाच्या आहेत." परंतु औरंगजेब फार सावध होता. बादशाहाचें मन आपणाविषयीं शुद्ध नाहीं, असें त्यास पक्कें माहीत होतें; त्यामुळें त्यानें त्या निरोपाकडे

विशेष लक्ष दिलें नाहीं. नंतर त्यानें आपला विश्वासु खोजा इतबारखान यास आग्र्याचे किल्ल्याचा सुभेदार नेमिलें, व त्याला बादशाहा, बेगम साहेब, व जनानखान्यांतील दुसरी मंडळी, यांस कैदेंत ठेवावें ह्मणून हुकूम दिला." त्यानें किल्ल्याचे बहुतेक दरवाजे चिनून टाकले व बादशाहाचा बाहेरील उमरावांशीं जो पत्रव्यवहार चालत असे, तो अगदीं बंद करून टाकिला. सुभेदाराच्या परवानगीशिवाय बादशाहानें आपल्या कोठडीच्याही बाहेर पडूं नये, अशी त्यास सक्त ताकीद मिळाली होती. दैवाची गति अगम्य आहे. ज्या शहाजहान बादशाहापुढें शेंकडों राजे आपलीं डोकीं लववीत होते, ज्याला पाहून त्याच्या शत्रूचें हृदय फाटून जात होतें, ज्याची आज्ञा शिरसा वंद्य करण्याकरितां हजारों सरदार, मानमानकरी, अमीरउमराव, बद्धहस्त पुढें उभे रहात असत, तो आपल्या पुत्राच्या हस्तें कारागृहांत पडावा काय? औरंगजेबानें मात्र महत्त्वाकांक्षेच्या भरीस पडून जें हें निंद्य कृत्य केलें, त्याच्या योगानें पितृभक्ति पायांखालीं तुडवून टाकिली, पुत्रधर्म रसातळास घालविला, वात्सल्याची राखरांगोळी केली, व आपल्या नांवास यावच्चंद्रदिवाकरौ अक्षयी कलंक लावून घेतला.

ह्या वेळीं औरंगजेबानें बादशाहास एक पत्र लिहिलें व तें पाठविण्यापूर्वी सर्व उमरावांस वाचून दाखविलें. तें पत्र येणेंप्रमाणें:—"दारावरील आपली मर्जी खप्पा झाली आहे, व माझ्यावरील आपल्या प्रेमास भरतें आलें आहे, असा ज्या वेळीं आपण बहाणा केला, त्याच वेळीं दारास मदत करण्याचे हेतूनें आपण त्याच्याकडे मोहोरांनीं लादलेले दोन हत्ती पाठवून दिले, अशी बातमी मला खातरीलायक

आधारावरून कळली आहे. आपण त्यास पैशाचें साहाय्य केल्यामुळें तो पुनः सैन्य गोळा करणार, व पुनः ही अनिष्टकारक लढाई पुढें चालविणार ! बरें असो. आतां आपणाला मी असें विचारतों कीं, दाराच्या अशा ह्या दुराग्रहामुळें मला कडक व गैरशिस्त असे कांहीं उपाय योजावे लागले, ते योजणें बरोबर होतें किंवा नाहीं ? खरोखर पाहूं गेलें तर आपणाला आतां जो कारागृहवास भोगावा लागत आहे, त्याला कारण तो दाराच नव्हे काय ? त्याचप्रमाणें आपल्या चरणीं नम्र होऊन आपली आज्ञा शिरसा वंद्य करण्याच्या सुखास जो मी अंतरलों, याचें कारण तरी दाराच नव्हे काय ? या दारामुळें मला ज्या कांहीं अन्यायाच्या गोष्टी कराव्या लागल्या, त्यांबद्दल आपण मला क्षमा कराल, व आपणास कांहीं वेळपर्यंत जो हा कारागृहवास भोगावा लागणार आहे, तो शांतपणानें सहन कराल, अशी मी आशा करतों. दाराचा पराभव होऊन मला अडथळा करण्याची त्याच्या अंगांत शक्ति राहिली नाहीं असें मला वाटलें, म्हणजे हा आपला आज्ञाधारक पुत्र त्याच क्षणीं धांवत येऊन आपल्या कारागृहाचे दरवाजे स्वतः खुले करील.”
असें सांगतात कीं, ज्या रात्रीस दारा निघून गेला, त्याच रात्रीस शहाजहान यानें त्याच्याकडे दोन हत्ती भरून मोहोरा पाठविल्या, व ती बातमी रोषनार बेगम हिनें औरंगजेबास दिली होती; तसेंच त्याला मारण्याकरितां आग्र्याच्या किल्ल्यांत तार्तरी जातीच्या स्त्रिया तयार करून ठेविलेल्या होत्या, ही बातमी सुद्धां तिनेंच त्याला कळविली होती. याशिवाय दारा व बादशाहा यांच्यामधील कांहीं पत्रेंही औरंगजेबाच्या हातीं पडलीं होतीं. तथापि मोठमोठ्या

मुत्सद्द्यांचें असें मत आहे कीं, वरील पत्रांत औरंगजेबानें बादशाहावर जे आरोप लागू केले आहेत, ते खोटे आहेत. तसेंच त्यानें तें पत्र बादशाहाकडे पाठविलें नसून केवळ लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां, आपल्या अमानुष कृत्यांवर पांघरूण घालण्याकरितां, व लोकांवर आपला दाब बसविण्याकरितां भरदरबारांत वाचून दाखविलें होतें.

खरा प्रकार कांहींही असो. परंतु औरंगजेबानें बादशाहास कैदेंत टाकल्यामुळें राज्यांतील अमीरउमराव लोकांस त्यांचा वचक बसून ते भराभर त्यास येऊन मिळाले; कारण तो कदाचित् आपलीही स्थिति बादशाहाप्रमाणेंच करितील कीं काय, अशी त्यांस मोठी भीति पडली. त्या वेळीं दरबारांत मोठमोठे राजकार्यधुरंधर शूर पुरुष असून त्यांच्यापैकीं कितीएकांस शहाजहान यानें मोठमोठे अधिकार देऊन उच्च स्थितीस आणलें होतें, व कितीएकांस तर दास्यत्वांतून मुक्त केलें होतें; असें असून या वेळीं त्या थोर, वयोवृद्ध व लोकप्रिय बादशाहाचा त्याचा पुत्र औरंगजेब यानें छळ मांडिला असतां त्यांतून त्याची मुक्तता करणारा किंवा "तुम्हीं हें काय करीत आहां" असा औरंगजेबास प्रश्न विचारणारा एकही पुरुष निघूं नये ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. दानिषमन्खान वगैरे फार थोडे उमराव अजून कोणत्याच बाजूस मिळाले नव्हते. तेवढे शिवाय करून बाकीचे सर्व औरंगजेबचरणीं मिलिंदायमान होऊन रुंजी घालूं लागले.

अशा रीतीनें बादशाहाचा बंदोबस्त केल्यावर व अमीरउमराव लोकांस मुठींत आणल्यावर, औरंगजेबानें शाहिस्तेखान यास आग्र्यास सुभेदार नेमिलें. सर्व बादशाही खजिना त्याचे हातांत आल्यामुळें त्यानें आणखी ज्यास्त

फौज नौकरीस ठेविली, व तो मुराद यास बरोबर घेऊन दाराचा पाठलाग करण्याकरितां निघाला.

दाराचा पाठलाग करण्याकरितां औरंगजेब व मुराद हे ज्या दिवशीं निघाले त्याच दिवशीं मुराद याचे कांहीं स्नेही व विशेषेंकरून त्याचा स्वामिभक्त, शूर सरदार शाहा अब्बास यानें त्यास असें सांगितलें कीं, "हजरत! आपण औरंगजेबाच्या मिठ्या बाता व फाजील प्रेम यांवर विश्वास ठेवून फसूं नका. त्याच्या जिव्हाग्रीं अमृत आहे. परंतु हृदयांत कालकूट विष भरलें आहे. आपणाला त्याच्यापासून खातरीनें दगा होईल. जर तो आपणास बादशाहा असें समजून मान देत आहे, तर आपण त्याला एकट्यालाच दाराचा पाठलाग करण्याकरितां पाठवून द्यावें, व आपण आपल्या फौजेसह आग्रा व दिल्ली यांचे दरम्यान् कोठें तरी तळ देऊन रहावें" जर मुराद त्या वेळीं त्याच्या मित्रांच्या उपदेशाप्रमाणें वागला असता, तर औरंगजेबाचें धाबेंच दणाणलें असतें, व त्याचें कारस्थान त्याच्याच अंगावर आलें असतें. परंतु मुराद यानें तो उपदेश ऐकिला नाहीं. औरंगजेबानें कुराणावर हात मारून "आपण तुझ्याशीं निष्कपटपणें वागूं" इत्यादि ज्या मारवाडी शपथा घेतल्या होत्या, त्या त्यास ज्यास्त विश्वसनीय वाटल्या, व राज्यप्राप्तीच्या धुंदींत गुंग होऊन तो आपल्या सैन्यासह दाराचा पाठलाग करण्याकरितां औरंगजेबाबरोबर निघाला. पुढें ते उभय बंधु आग्रा सोडून दिल्लीस जाण्याकरितां निघाले.

नंतर हळूहळू मुक्काम करीत चवथ्या दिवशीं ते आग्र्यापासून ३० मैलांवर मथुरा येथें येऊन पोहोंचले. ह्या ठिकाणींही मुराद याच्या स्नेह्यांनीं पुनः त्याचे कान उघडले. यांनीं

त्यास असें सांगितलें कीं, "हजरत! आम्हीं आपली पुनः विनंति करतों कीं, आपण आपल्या कपटी बंधूवर विश्वास ठेवूं नका. आज त्यानें आपला घात करण्याचा विचार केला आहे, अशी बातमी आह्मांस खातरीलायक आधारावरून कळली आहे. याकरितां निदान आज तरी आपण औरंगजेबाकडे जाऊं नये. कांहीं तरी आजारीपणाचें मिष करून आपण आपलेच गोटांत रहावें." परंतु औरंगजेबानें आपल्या जादुमंत्रानें त्याला इतकें भारून टाकलें होतें कीं, तो आपलें देहभान अगदीं विसरून गेला होता. नंतर त्याच दिवशीं त्याला औरंगजेबाकडून मेजवानीचें बोलावणें आलें, व त्याच्या स्नेह्यांच्या कानउघाडणीकडे दुर्लक्ष करून त्या निमंत्रणाचा त्यानें स्वीकार केला. औरंगजेबानें पुढील सर्व बेत अगोदरच ठरवून ठेविले होते, व त्या कामावर त्यानें मीरखान नांवाच्या एका मनुष्याची योजना केली होती. पुढें मुराद औरंगजेबाकडे नेमलेल्या वेळीं आला, तेव्हां त्या महा ठकानें त्याच्या आदरातिथ्याची व त्याच्यावरील प्रीतीची कमालच करून सोडली. मुराद यास पाहतांच औरंगजेबाचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. वाटेच्या श्रमानें मुराद याचे चेहऱ्यावर घर्मबिंदु आले होते, व थोडी धूळ वगैरे उडाली होती, ती सर्व त्यानें आपल्या शेल्यानें पुसून काढिली; व अशा रीतीनें त्यानें हजरत मुराद साहेब यांस अगदीं गार करून सोडलें. मेजवानीचा बेतही मोठ्या थाटाचा केला होता. जेवण आटोपल्यावर औरंगजेबानें शिराज व काबूल येथील उंची मद्यें मुराद याजपुढें आणून ठेविलीं. नंतर मोठ्या आदबीनें उठून गंभीर मुद्रेनें मुराद यास उद्देशून म्हणाला कीं, "खाविंद! माझ्या मनाचा कांहीं एक

चमत्कारिक तऱ्हेचा कल झाल्यामुळें व आपल्या मुसलमानी धर्मानुशासनाप्रमाणें मी दारूचा निषेध करतों, हें आपणास माहित आहेच, याकरितां आपण मला येथून जाण्याची परवानगी द्यावी अशी विनंति आहे. मी आपल्या करमणुकीसाठीं **मीरखान** वगैरे माझे विश्वासु लोक आपल्या तैनातीस ठेविले आहेत." असें ह्मणून तो निघून गेला. **मुराद** यास मद्याची फार आवड होती, व त्या वेळीं तर त्याच्यापुढें फारच उंची मद्यें ठेविलेलीं होतीं. मग काय विचारतां? त्यानें त्या मद्यांवर असा ताव दिला कीं, तो पितांपितांच बेशुद्ध होऊन पडला. मद्यांनीं आपलें काम योग्य रीतीनें बजावलें असें पाहून **औरंगजेब मुराद** याच्याजवळ आला व गडबड होऊं नये ह्मणून त्यानें प्रथमतः त्याच्या नोकर लोकांस बाहेर घालवून दिलें. नंतर **मीरखान** यानें त्याची तरवार व जंबिया हीं शस्त्रें काढून घेतलीं.[1] पुढें त्या **औरंगजेब**-रूपी मानवी मायावी राक्षसानें त्या मूर्ख व हतभाग्य **मुरादास** लाथा मारमारून जागें केलें, व तो त्याला ह्मणाला "हा मूर्खा, धिक्कार असो तुला! तूं बादशाहा ना? मग तूं इतका मूर्ख असशील असें मला वाटलें नव्हतें. आतां जर तूं तख्तावर बसलास तर लोक तुला व तुझ्याबरोबर मला काय बरें ह्मणतील? कोण आहे रे? बांधा या

---

१ काटू नामक फ्रेंच ग्रंथकार असें ह्मणतो कीं, औरंगजेबानें त्याचा नातू व महंमद याचा पुत्र अझम याला एक हिरा देऊं करून मुराद याचा जंबिया व तलवार घेऊन येण्यास सांगितलें. अझम या वेळीं फक्त सहा वर्षांचा होता. त्यानें मुराद यास जागें न करतां त्याचीं शस्त्रें काढून घेऊन तीं औरंगजेबास आणून दिलीं."

दारूबाजाच्या मुसक्या व ठेवा त्याला त्या खोलींत कोंडून. तेथें त्याला पोटभर झोंप घेत पडूं द्या. " त्या यमाच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतांच त्याचे पांच सहा दूत बाहेर आले, व त्यांनीं मुराद याच्या मुसक्या बांधून त्याच्या हातापायांत बेड्या ठोकल्या, व त्याला एखाद्या गुराप्रमाणें ओढीत नेऊन एका खोलींत कोंडून टाकून तिला बाहेरून कुलूप लावून घेतलें. मुराद याच्याबरोबर जे नोकर लोक आले होते, त्यांस हें दगाबाजीचें कृत्य समजतांच त्यांनीं मोठा गोंधळ उडवून दिला, व ते खोलीचा दरवाजा फोडण्याकरितां जाऊं लागले. इतक्यांत मुराद याचा तोफखान्यावरचा मुख्य सरदार अल्लाकुली हा तेथें आला, व त्यानें धाकदपटशहा देऊन त्यांची हालचाल बंद केली. या सरदारास लाच देऊन औरंगजेबानें अगोदरच वश करून घेतलें होतें. परंतु मुराद याच्या घोडेस्वारांत मोठी चळवळ उडून गेली. तेव्हां औरंगजेबानें अशी युक्ति केली कीं, त्यानें आपले पुष्कळ लोक मुराद याच्या फौजेंत पाठवून दिले, व त्यांच्याकडून त्यांना असें सांगितलें कीं, " तुमच्या यजमानांच्या संबंधानें विशेष ह्मणण्यासारखी अशी कांहींही गोष्ट झालेली नाहीं. आम्ही जवळच होतों. रात्रीं हजरत मुराद साहेब बरेंच मद्य प्याले, व त्याच्या निशेंत ते इतके बेहोष झाले कीं, ते वाटेल त्याच्यावर एकदम तोंड टाकूं लागले. फार काय सांगावें? आमचे यजमानही त्यांच्या तावडींतून सुटले नाहींत. शेवटीं शेवटीं ते इतकी दांडगाई करूं लागले कीं त्यांना कोंडून ठेवण्याशिवाय दुसरी तोडच उरली नाहीं. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. ते शुद्धीवर आले ह्मणजे सकाळीं

आपले गोटांत परत येतील. " अशा रीतीनें त्यानें त्या लोकांची चळवळ बंद केली, व रात्रीच्या रात्रींत मुराद याच्या सैन्यांतील मुख्य मुख्य कामगारांस मोठमोठे लांच देऊन व त्यांच्या हाताखालील शिपायांसही पैसे भरून व त्यांचे पगार वाढवून त्यांचीं तोंडें बंद केलीं, व त्यांस वश करून घेतलें. फार काय सांगावें? दुसरे दिवशीं जेव्हां औरंगजेबाचे लोक मुराद यास एका झांकलेल्या अंबारींत घालून घेऊन जाऊं लागले, तेव्हां मुराद याच्या सैन्यापैकीं एकाही मनुष्यानें तोंडांतून ब्र काढिला नाहीं. पुढें दिल्लीस आल्यावर औरंगजेबानें त्या दुर्दैवी मुरादास यमुना नदींत सेलिमगड[1] नांवाच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें.(इ०स० १६५८). मुराद याच्या सैन्यापैकीं फक्त शाहा अबास यानें मात्र औरंगजेबास बराच त्रास दिला. शेवटीं औरंगजेबानें त्याला-ही कैद करून त्याच्या यजमानाच्या जोडीस नेऊन बसविलें.

अशा रीतीनें मुराद याची वाट लावून आमच्या ढोंगी फकिरानें आपली कफणी फेंकून देऊन आपलें खरें स्वरूप प्रगट केलें, व दाराचा पाठलाग तसाच पुढें चालविला. दारा त्या वेळीं लाहोराकडे मोठ्या जलदीनें जात होता, व त्या शहराची तटबंदी करून तेथें राहण्याचा त्याचा बेत होता. परंतु त्याचा हाडवैरी औरंगजेब यानें त्याचा पाठलाग अशा नेटानें चालविला होता कीं, त्यानें लाहोराची तटबंदी करण्याचा दारास अवसरच मिळूं दिला नाहीं. तेव्हां निरुपाय होऊन तो लाहोर सोडून मुलतान येथें जाण्याकरितां निघाला. ह्या ठिकाणींही औरं-

[1] हा किल्ला शीरशाहाचा वंशज सेलीम यानें इ० स० १५४६ त बांधला. हल्लीं तो अगदीं पडून गेला आहे.

गजेबानें त्याचा पिच्छा सोडला नाहीं. हें पाठलागाचें काम त्यानें मोठ्या नेटानें व दक्षतेनें चालविलें होतें. भर उन्हाळा असतांही त्याचें सैन्य अहोरात्र कूच करीत होतें. आपल्या सैन्यास जास्त स्फुरण यावें ह्मणून औरंगजेबाचा हत्ती नेहमीं सैन्याचे पुढें तीन तीन कोस असे व तो सैन्यांतील साधारण शिपायाप्रमाणें शिळी भाकरी व मिळेल तसलें पाणी पिऊन उघड्या जमिनीवर निजत असे.

लाहोर सोडल्यावर दारानें काबुलाचा रस्ता धरला असता तर बरें झालें असतें. परंतु त्यानें तसें केलें नाहीं, यासंबंधानें मोठमोठ्या राजकार्यधुरंधर पुरुषांनीं त्याला मोठें दूषण दिलें आहे. त्याला काबुलास जाण्याविषयीं पुष्कळ लोकांनीं उपदेश केला होता, परंतु त्यांच्या उपदेशाप्रमाणें तो कां वागला नाहीं, यासंबंधानें मोठें गूढ आहे. त्या वेळीं माहाबतखान नांवाचा सरदार काबुलचा सुभेदार असून तो मोठा शूर व शक्तिमान् होता. त्याचें मन औरंगजेबाविषयीं शुद्ध नव्हतें. तसेंच अफगाण, इराणी व उसबेक या लोकां-बरोबर लढाई करण्याकरितां त्या वेळीं त्याच्याजवळ दहा-हजार फौज जय्यत तयार होती. दाराजवळ मुबलक पैसा होता, व माहाबतखान यानें आपल्या सैन्यासह त्यास मोठ्या खुशीनें मदत केली असती. तसेंच तो काबुलांत गेला असता, ह्मणजे इराण व उसबेक या राष्ट्रांच्या हद्दीवरच गेला होता असेंही ह्मणण्यास हरकत नाहीं, व त्या राष्ट्रांतूनही त्याला बरीच मदत मिळण्याचा संभव होता. पठाण लोकांचा राजा शेरखान यानें दाराचा पणजा

---

१ हा जवानपूरचा सुभेदार होता. त्यानें हुमायून याचा प्रथमतः

( पुढें चालू )

अकबर याचा बाप हुमायून यास त्याच्या राज्यांतून घालवून दिलें, त्या वेळीं इराणी लोकांच्या मदतीनें त्यानें आपलें राज्य पुनः कसें मिळविलें, या गोष्टीचें स्मरण त्या वेळीं दारास कसें झालें नाहीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें. परंतु हीच गोष्ट खरी कीं, पदोपदीं त्याचें दुर्दैव त्याच्या मार्गांत आडवें पडत होतें, त्यामुळें त्याला काबुलास जाण्याची बुद्धि झाली नाहीं. लाहोर सोडल्यावर तो मुलतान येथें जाण्याकरितां निघाला, परंतु तेथपर्यंत औरंगजेबानें त्याचा पिच्छा न सोडल्यामुळें तो सिंध देशांत गेला, व ठठ्ठाबक्कर[1] नांवाच्या किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला. दारा सिंध देशांत गेल्यावर औरंगजेबानें त्याचा पाठलाग सोडून दिला; कारण तो काबुलास गेला तर तेथें विलक्षण घोंटाळा उत्पन्न होईल, अशी जी त्यास भीति पडली होती ती तो सिंध देशांत गेल्यामुळें नाहींशी झाली. नंतर त्यानें मीर बाबा नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं सात आठ हजार फौज देऊन त्याला दारावर पाठ-

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

इ० स० १५३९ त बहार प्रांतांत चानसा येथें पराभव केला व नंतर सन १५४० त कनोज येथें दुसऱ्यानें त्याचा पराभव केला व त्याला सिंधुनदीचे पार हाकून दिलें. तो शेरशाहा असा किताब धारण करून इ० स० १५४१ त दिल्लीच्या गादीवर बसला व इ० स० १५४५ त मरण पावला. हुमायुन यानें इराणी लोकांच्या मदतीनें इ० स० १५५५ त त्याच्या वंशजांचा पराभव करून आपली गादी पुनः मिळविली.

१ हा किल्ला मोठा बळकट असून तो सिंधुनदीचे पात्रांत सक्कर व रोरी या शहरांचेमध्यें ठठ्ठाबक्कर नांवाच्या एका बेटावर बांधलेला आहे.

वून दिलें, व आपण मोठमोठे मुक्काम करीत आग्र्यास परत आला. कारण आपल्या पश्चात् कदाचित् जयसिंग, यशवंतसिंग वगैरे पराक्रमी रजपूत राजे बादशाहास मुक्त करितील कीं काय, किंवा सुलेमान श्रीनगरचे राजाचे मदतीनें, किंवा सुजा स्वतः, आग्र्यावर स्वारी करील कीं काय, अशी त्यास मोठी भीति पडली होती. ह्या वेळीं एक लहानशी गोष्ट घडून आली, तिच्या हकीकतीवरून औरंगजेबानें शिरावर घेतलेलें जोखिमेचें काम मोठ्या कावेबाजपणानें कसें शेवटास नेलें, याची बरीच कल्पना करितां येईल.

तो मुलतान येथून मोठ्या त्वरेनें लाहोरास परत येत असतां, वाटेंत जयसिंग राजा चार पांच हजार लोक बरोबर घेऊन आपणाकडे येत आहे असें त्यानें पाहिलें. त्या वेळीं तो नेहमींप्रमाणें आपल्या सैन्याच्या अवाडीसच होता. जयसिंगाची बादशाहावर फार भक्ति होती, ही गोष्ट औरंगजेबास माहीत होती. त्यामुळें तो आपणावर एकदम हल्ला करतो कीं काय, अशी औरंगजेबास मोठी भीति पडली. त्याला असें वाटलें कीं अशा अनायासें प्राप्त झालेल्या प्रसंगीं आपल्या थोर व पूज्य वृद्ध बादशाहास कारागृहांतून सोडविण्याचें यश आपण घ्यावें व त्या थोर बादशाहाचा ज्या निर्दय व दुष्ट पुत्रानें त्याला कारागृहांत विनाकारण कोंडून ठेवून नाहक छळ मांडिला आहे त्याला चांगली खरमरीत शिक्षा करावी, असें जयसिंगासारख्या शूर रजपुतास वाटणें साहजिक आहे. जयसिंगाचा त्या वेळीं तोच बेत होता असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. परंतु औरंगजेबानें त्या प्रसंगीं

जें विलक्षण प्रसंगावधान व जो दृढनिश्चय दाखविला, त्यामुळेंच त्याच्यावरचा तो प्रसंग टळला. जयसिंग आपल्या फौजेसह आपणाकडे येत आहे असें पाहून काडीभरही न डगमगतां तो त्याच्याकडे गेला, व मोठ्या आनंदप्रदर्शित मुद्रेनें दुरूनच "सलामत राजाजी! सलामत बाबाजी!" असें ह्मणून त्यानें त्यास सलाम केला. नंतर जवळ येतांच "आज आपल्या आकस्मिक दर्शनानें मला जो आनंद झाला आहे, तो शब्दांनींही व्यक्त करून दाखवितां येत नाहीं. आपल्या भेटीची मला फार उत्कंठा लागली होती. ह्या अनिष्टकारक लढाईचा आतां शेवट झाला. दाराचा पूर्ण पराभव होऊन तो देशोधडीस लागला. मीं मीर बाबा यास त्याचा पाठलाग करण्याकरितां पाठवून दिलें आहे, तो लौकरच त्याला पकडून आणील." असें म्हणून त्यानें आपल्या गळ्यांतील मोत्यांचा हार काढून तो मोठ्या नम्रतेनें व विनयानें जयसिंगाच्या गळ्यांत घातला. नंतर तो त्याला पुनः म्हणाला कीं, "माझें सैन्य वाटेच्या श्रमानें फार थकलें आहे, तेव्हां मी आपली विनंति करतों कीं, आपण तातडतोब लाहोरास जावें; कारण त्या ठिकाणीं बखेडा होण्याचा बराच संभव आहे. मीं आपणास लाहोरचा सुभेदार नेमिलें. आहे, व आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें बंदोबस्त करण्याचा मीं आपणास पूर्ण अधिकार दिला आहे; मी लौकरच तेथें येईन. आपण सुलेमान यास घालवून देण्यासाठीं जी युक्ति योजिली ती फारच उत्कृष्ट होती, व त्या कामगिरीबद्दल मी आपला फार आभारी आहें.

दिलावरखान हल्लीं कोणीकडे आहे? त्याला काय शिक्षा करावयाची तें मला ठाऊक आहे. असो. आपण आतां विलंब न करतां लाहोरास जावें. सलामत." औरंगजेबाच्या वरील प्रसंगावधानाचा परिणाम असा झाला कीं, जयसिंग कांहीं एक हालचाल न करितां त्याच्या हुकमाप्रमाणें एकदम लाहोरास निघून गेला.

दारा ठठ्ठाबक्कर येथें येऊन पोहोंचल्यावर त्यानें एका हुशार, शूर व दृढनिश्चयी अशा खोजास त्या किल्ल्याचा सुभेदार नेमिलें, किल्ल्याचे संरक्षणार्थ पठाण व सय्यद लोकांची शिबंदी ठेविली, व तोफखान्यावर पुष्कळ पोर्तुगीज इंग्लिश, फ्रेंच, व जर्मन लोक नेमिले. त्यानें वरील युरोपियन लोकांस "आपण बादशाहा झालों म्हणजे तुह्मांस मी उमराव करीन" अशीं वचनें दिलीं होतीं. नंतर त्यानें आपला सर्व खजिना त्या किल्ल्यांत ठेविला, व बरोबर दोन तीन हजार लोक घेऊन, तो कच्छच्या राज्यांतून खालीं उतरून, एकदम गुजराथेंत शिरला, व अमदाबाद शहराच्या दरवाज्याशीं येऊन थडकला. त्यावेळीं तेथें औरंगजेबाचा सासरा शहानवाझखान हा सुभेदारीचें काम पहात होता. अमदाबाद येथील शिबंदी मोठी लढाऊ होती, व तिनें दारास बरेच दिवस दाद दिली नसती. परंतु त्या सुभेदाराचें धैर्य खचल्यामुळें ह्मणा, किंवा दुसऱ्या कांहीं अंतस्थ

---

१ दिलावरखान यानें औरंगजेबाचा काय अपराध केला होता तें कळत नाहीं. कदाचित् त्यानें आपले स्वार पाठवून सुलेमान यास मार्गांत लुटण्याचें जें निंद्य कृत्य केलें होतें त्याची बातमी औरंगजेबास कळून त्याची दिलावरखानावर इतराजी झाली असावी.

कारणानें म्हणा, त्यानें शहराचे दरवाजे खुले करून तें दाराचे ताब्यांत दिलें.

दारानें अमदाबाद शहर सर केलें, ही बातमी औरंगजेबास समजली तेव्हां त्याला मोठा अचंबा वाटला, व तो अतिशय गोंधळून गेला. एकदां त्यांस असें वाटे कीं, दारा यास अमदाबादेसारख्या बळकट ठिकाणांतून घालवून देण्याकरितां आपण स्वतःच जावें. परंतु त्याच क्षणीं त्यास असेंही वाटे कीं, बादशाहास आग्र्याच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवून आपण इतक्या लांबीच्या पल्ल्यावर गेलों, तर आपल्यामागें येथें कांहीं तरी घोंटाळा होऊन आपणावर निराळेंच कांहीं तरी संकट येणार नाहीं म्हणून कशावरून? शिवाय अमदाबादेस जाणें ह्मणजे जयसिंग, यशवंतसिंग आदीकरून बलाढ्य रजपूत राजांच्या मुलखांतून गेलें पाहिजे, व त्या राजांचा विशेष ओढा बादशाहाकडे असल्यामुळें कदाचित् ते आपणावर उलटून पडणार नाहींत ह्मणून कशावरून? शिवाय, त्यास असेंही कळलें होतें कीं, सुजा जंगी फौज घेऊन मोठ्या जलदीनें आग्र्यावर चाल करून येत आहे, व सुलेमान यानें श्रीनगरच्या राजाच्या मदतीनें लढाईची जय्यत तयारी चालविली आहे. या एकंदर कारणांमुळें औरंगजेबाची चित्तवृत्ति अगदीं व्यग्र होऊन गेली, व तो मोठ्या पेंचांत पडल्यासारखा झाला. शेवटीं दाराच्या अगोदर सुजाचा बंदोबस्त करणें ज्यास्त

१ शहानवाझखान ज्याप्रमाणें औरंगजेबाचा सासरा होता त्याचप्रमाणें मुरादाचाही तो सासरा होता. दारा अमदाबादेस आला त्या वेळीं मुराद याची बायको आमदाबादेस होती, व तिच्या सांगण्यावरून त्यानें आमदाबाद शहर दाराचे स्वाधीन केलें, असें कितीएक ग्रंथकारांचें मत आहे.

जरूरीचें आहे, असें त्यास वाटल्यावरून त्यानें दारावर जाण्याचा बेत रहित केला, व सुजा अलाहाबाद येथें गंगा नदी उतरून अलीकडे आला होता, याच्यावर स्वारी करण्याची त्यानें तयारी केली.

सुजा खजवा[1] येथें येऊन पोहोंचल्यावर तेथें एक फार मोठा तलाव आहे असें पाहून त्यानें तेथेंच आपल्या सैन्याचा तळ दिला; व त्या गांवांला बळकट तटबंदी करून तो औरंगजेबाची वाट पहात बसला. औरंगजेब तेथें आल्यावर त्यानें चार मैलांचे अंतरावर एका नदीचे कांठीं आपल्या सैन्याचा तळ दिला. दोन्हीं सैन्यांच्या मध्यंतरीं मैदान असून तें लढाईच्या योग्य होतें. या लढाईचा सोक्षमोक्ष एकदम करून टाकावा, अशी औरंगजेबास मोठी घाई झाल्यामुळें त्यानें दुसऱ्या दिवशींच लढाई सुरू केली. मीर जुमला यास औरंगजेबानें आपले कांहीं हेतु साध्य करून घेण्याकरितां दौलताबादेच्या किल्ल्यांत कैदादाखल ठेविलें होतें; तो त्याच दिवशीं सकाळीं आपल्या फौजेसह औरंगजेबास येऊन मिळाला. दारा आग्रा येथून पळून गेल्यामुळें मीर जुमला याच्या मुलांमाणसांची त्याच्या कैदेंतून आपोआप मुक्तता झाली होती, व औरंगजेब विजयी झाल्यामुळें त्यालाही आतां कैदादाखल राहण्याचें कारण उरलें नव्हतें. ही लढाई मोठी घनघोर झाली, व दोन्ही फौजा अतिशय निकरानें लढल्या. ज्या ज्या

१ हें गांव गंगा व यमुना या नद्यांचेमध्यें अलाहाबाद प्रांतांत फत्तेपूरच्या पश्चिमेस ३० मैलांवर आहे. येथें औरंगजेब व सुजा यांचेमध्यें तारीख ५ जानेवारी इ० स० १६५९ रोजीं लढाई झाली.

वेळीं औरंगजेब सुजावर हल्ला करण्याचा प्रयत्न करी, त्या त्या वेळीं सुजा त्याच्या सैन्याची कत्तल करून त्यास मागें हटवीत असे. तो मैदानांत लढाईस न येतां आपल्या जाग्यावरूनच लढत होता. त्याचे मनांत असें होतें कीं, कडकडीत ऊन पडलें ह्मणजे औरंगजेबाचें सैन्य परत फिरेल व त्या वेळीं आपण त्याच्या पिच्छाडीवर हल्ला केला तर आपला मोठा फायदा होईल. परंतु हा त्याचा कावा औरंगजेबाचे अगोदरच लक्ष्यांत येऊन चुकला होता. इतक्यांत त्याला अशी बातमी समजली कीं, यशवंतसिंग यानें आपल्याशीं स्नेहभावानें वागण्याचें कबूल केलें होतें, तरी त्यानें आपलें वचन मोडून आपल्या पिच्छाडीवर एकाएकीं हल्ला करून आपल्या सैन्याची अगदीं दाणादाण करून टाकिली, व तो आतां आपलें सामानसुमान व खजिना लुटीत आहे. ही गोष्ट ऐकून त्याला फारच भीति बसली. इतक्यांत ती बातमी त्याच्या सैन्यांत पसरली व त्याचे लोक घाबरून जाऊन सर्व सैन्यांत मोठा गोंधळ उडून गेला. परंतु अशा या आणीबाणीच्या वेळीं त्या धैर्यसागरानें आपलें प्रसंगावधान सोडलें नाहीं. आपण या वेळीं परत फिरलों तर आपला खातरीनें पराभव होईल असें त्यास माहीत होतें. तेव्हां परत न फिरतां पूर्वीं दारा बरोबर लढाई झाली त्या वेळीं मोठ्या दृढ निश्चयानें पुढें गोष्टी कोणत्या थराला येतात, याची वाट पहात जसा तो सामूगडाच्या रणांगणांत एके ठिकाणीं उभा होता, तसाच या वेळींही तो रणांगणांत उभा राहिला. परंतु त्याच्या सैन्यांत अधिक अधिक घोंटाळा माजत चालला. सुजा यानें औरंगजेबाच्या सैन्याची अशी स्थिति पाहून त्याच्या-

वर एकदम मोठ्या जोराचा हल्ला केला. त्यामुळें त्या सैन्याची दाणादाण होऊन तें सैरावैरा पळत सुटलें. औरंगजेबाचा महात बाण लागून खालीं पडला, त्याचा हत्ती बेफाम होऊन पळूं लागला, व तो आपल्या हत्तीवरून खालीं उतरण्याच्या अगदीं बेतात होता. परंतु मीर जुमला हा त्याचे जवळच होता, तो त्याला मोठ्यानें ओरडून ह्मणाला "हजरत! आतां दक्षिण फार लांब राहिली; ध्यानांत आहेना? खालीं उतराल तर पराभव पावाल." ह्या वेळीं औरंगजेबाचीं पुरीं शंभर वर्षें भरलीं होतीं. सुजा येऊन आपणास कैद करतो कीं काय, अशी त्यास प्रतिक्षणीं भीति वाटत होती. परंतु त्याच्या नशिबाची सद्दी अशी कांहीं बलवत्तर होती कीं, ज्या कारणामुळें पूर्वीं दाराचा पराभव झाला होता, त्याच कारणामुळें या वेळीं सुजाचाही पराभव झाला, व औरंगजेबास जय मिळून सुजा यास प्राणत्राणार्थ समरभूमि सोडून पळून जावें लागलें. ह्या वेळीं हत्तीवरून खालीं उतरून औरंगजेबाच्या सैन्याचा एकदम पाठलाग सुरू करा, अशी ज्या मनुष्यानें सुजास मसलत दिली, त्याचें नांव अलिवर्दीखान असें होतें. तो सुजाचे फौजेंतील एक मोठा सरदार होता. त्यानें पूर्वीं कलीकुल्लाखान यानें धांवत येऊन दारास सांगितलें होतें, त्याचप्रमाणें येऊन

---

१ हा पाटणचा सुभेदार होता. सुजाचा पराभव झाल्यावर तो त्याचे बरोबर बंगाल्यांत परत गेला. पुढें इ० स० १६५९ च्या जुलै महिन्यांत सुजानें त्यास ठार मारिलें. त्यानें हत्तीवरून खालीं उतरण्याची सुजा यास जी मसलत दिली ती कृत्रिमभावानें दिली किंवा सरळ भावानें दिली याबद्दल खातरीलायक कांहींएक सांगतां येत नाहीं.

हात जोडून मोठ्या कळवळ्यानें सुजा यास लांबूनच मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं, " खाविंद! या हत्तीवर उंच बसून आपला अमोलिक जीव विनाकारण धोक्यांत कां बरें घालितां ? शत्रूच्या सैन्यांत गोंधळ उडून गेला आहे हें आपणास दिसतच आहे. अशा वेळीं त्याचा पाठलाग करून त्याचा आपण पुरा नाश करीत नाहीं, ही आपणाकडून मोठी चूक होत आहे असें आपणास वाटत नाहीं काय? खालीं उतरून घोड्यावर स्वार व्हा, व शत्रूचा पराभव करून हिंदुस्थानची बादशाही मिळवा.' अलिवर्दी-खानाच्या उपदेशाप्रमाणें सुजा खालीं उतरला व घोड्यावर बसला, परंतु हत्तीवरील त्याचा हौदा रिकामा पाहतांच तो लढाईंत पडला, असें त्याच्या सैन्यास वाटून ते लोक घाबरून गेले, व त्यांनीं रणांगणांतून पळ काढिला. त्यांनीं परत फिरावें म्हणून सुजानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु तो सर्व व्यर्थ गेला. शेवटीं निरुपाय होऊन आपला जीव वांच-विण्याकरितां त्यालाही समरांगणांतून पळून जावें लागलें.

यशवंतसिंगास ही बातमी कळली, तेंव्हां त्याला जेवढी लूट मिळाली होती तेवढी घेऊन तो आपल्या राज्यांत जाण्याचे हेतूनें आग्रा येथें निघून आला. तो येण्याचे अगोदर आग्रा येथें अशी बातमी पसरली होती कीं, सुजाबरोबरच्या लढाईंत औरंगजेबाचा पराभव होऊन त्याला व मीर जुमला याला सुजानें कैद केलें, व तो आपल्या विजयी सैन्यासह आग्र्या-वर चाल करून येत आहे. आग्र्याचा सुभेदार शाहि-स्तेखान याला यशवंतसिंग दगा करून सुजास फितूर झाला आहे, ही बातमी अगोदरच समजली होती. पुढें यशवंतसिंग आग्रा येथें येऊन थडकला, ही बातमी त्याला

कळतांच निराश होऊन आत्महत्या करून घेण्याचे हेतूनें त्यानें हातांत विषाचा पेला घेतला, व आतां तो तें पिणार इतक्यांत ती बातमी त्याच्या जनानखान्यांत जाऊन पोहोंचली. तेव्हां त्याच्या सर्व स्त्रिया त्याच्यावर येऊन पडल्या, व त्यांनीं त्याच्या हातांतील पेला फोडून टाकला. दोन दिवसपर्यंत आग्रा येथें मोठा गोंधळ उडून गेला होता. या वेळीं लोकांस खरी बातमी न कळल्यामुळें यशवंतसिंगानें प्रयत्न केला असता, तर त्यानें बादशाहास बंधमुक्त केलें असतें. परंतु त्याला खरी स्थिति माहीत असल्यामुळें तो त्या भानगडींत न पडतां आपल्या पूर्वींच्या संकल्पाप्रमाणें आपले राज्यांत निघून गेला.

यशवंतसिंग आग्र्यास गेला ही गोष्ट औरंगजेबास समजली, तेव्हां आतां आग्रा येथें खातरीनें बंड होईल अशी त्यास मोठी भीति पडली. त्यामुळें सुजाचा पाठलाग टाकून देऊन तो एकदम आग्रा येथें निघून आला. सुजा याजपाशीं अद्यापि बरीच फौज शिल्लक असून, गंगा नदीच्या दोन्ही तीरांवर जे रजपूत संस्थानिक होते, ते पैशाच्या लालचीनें त्याला भडाभड येऊन मिळत होते, व त्यामुळें दिवसेंदिवस त्याची फौज ज्यास्त वाढत चालली होती. त्यानें आपलें ठाणें गंगेच्या कांठीं बंगाल प्रांताचें नाकें जें अलाहाबाद शहर तेथें दिलें होतें. अशा बिकट प्रसंगीं औरंगजेबाच्या असें ध्यानांत आलें कीं, या प्रसंगीं ज्यांचा आपणास खरा उपयोग करून घेतां येईल अशीं आपणापाशीं दोन मनुष्यें आहेत: एक आपला ज्येष्ठ पुत्र सुलतान महंमद व दुसरा मीर जुमला. औरंगजेब ह्मणजे आपल्या सांवलीचीही शंका

घेणारा मनुष्य होता. आग्र्याचा किल्ला घेतल्यापासून सुलतान महंमद फार चढून गेला होता, ही गोष्ट त्याच्या नजरेस आली होती, व मीर जुमला याचे संबंधानें त्याची विशालबुद्धि, त्याचें धैर्य व त्याचें शौर्य इत्यादि त्याच्या नैसर्गिक गुणांबद्दल औरंगजेब त्याला फार मान देत होता. परंतु या त्याच्या लोकोत्तर गुणांमुळेंच औरंगजेबाचे मनांत त्याचेविषयीं भीति व अविश्वास हीं उत्पन्न झालीं होतीं. तसेंच मीर जुमला याचेजवळ कुबेराची संपत्ति असून शिवाय तो एक अद्वितीय राजकारणी पुरुष आहे, व राज्यांतील प्रत्येक महत्त्वाचें काम त्याच्या सल्ल्यानें होत असतें, अशी त्याची सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्धि झाली होती. तेव्हां अशा थोर पुरुषाच्या आशाही थोरच असल्या पाहिजेत, अशी औरंगजेबाचे मनांत शंका उत्पन्न झाली होती. त्यामुळें ते दोघे कदाचित् आपणाविरुद्ध कारस्थानें उपस्थित करितील कीं काय, असें औरंगजेबास वाटूं लागलें. आपण त्या दोघांची सुजावर रवानगी केली ह्मणजे त्यांना गडबड करावयास फुरसत सांपडणार नाहीं, असा विचार करून औरंगजेबानें त्यांचे हाताखालीं मोठी फौज देऊन त्यांना सुजावर पाठवून दिलें. त्यानें मीर जुमला यास असें सांगितलें कीं, "मी आपणास व आपल्या मागें आपल्या पुत्रास बंगाल्याची कायमची सुभेदारी देण्याचा विचार केला आहे. आजपर्यंत आपण माझ्यावर जे उपकार केले आहेत, ते एवढ्या लहानशा देणगीनें फिटतील असें नाहीं; सुजाचा पराभव झाल्यावर मी आपणास माझ्या राज्यांतील अमीर-उल्-उमराम ( उमरावांचा राजा ) हा पहिला किताब देण्याचा निश्चय केला आहे;" व

सुलतान महंमद यास इतकेंच सांगितलें कीं, "मुला! तूं माझा वडील मुलगा आहेस ही गोष्ट ध्यानांत ठेव. तूं ज्या कामगिरीवर जात आहेस, ती खरोखर तुझ्याच भावी हिताची आहे, ही गोष्ट तुझ्या ध्यानांत आलीच असेल. आजपर्यंत तूं मोठमोठे पराक्रम केलेस हें खरें. परंतु या प्रसंगीं तुझ्या हातून जर सुजाचा पराभव झाला नाहीं, व जर तूं त्याला कैद करून आणिलें नाहींस, तर मागें तूं कांहींच केलें नाहींस असें मी समजेन. आपल्या सर्व शत्रूंत सुजाच काय तो जबरदस्त आहे." नंतर औरंगजेबानें त्या दोघांस शिरपाव, हत्ती, घोडे वगैरे नजर देऊन त्यांची रवानगी केली. परंतु जातांना त्यानें सुलतान महंमद याची स्त्री (गोंवळकोंड्याच्या राजाची मुलगी) व मीर जुमला याचा पुत्र महंमद अमीरखान या दोघांस त्यांचे बरोबर न पाठवितां त्यांना आग्रा येथें ठेवून घेतलें. सुलतान महंमद याच्या स्त्रीस अशा कारणाकरितां ठेवून घेतलें कीं, ती फार सुस्वरूप असल्यामुळें तो तिच्या नादीं लागून मोहिमेचें काम बरोबर रीतीनें चालविणार नाहीं, व मीर जुमला याचा पुत्र महंमद अमीरखान यास अशा कारणाकरितां ठेवून घेतलें कीं, मीर जुमला याची त्याच्यावर अतिशय प्रीति असल्यामुळें त्याच्या वियोगाकडे वगैरे त्याचें लक्ष्य लागून लढाईचे कामांत त्याचे हातून कदाचित् कसूर होईल. परंतु पस्तुतः पहातां त्यानें त्या दोघांस मीर जुमला व महंमद यांनीं आपल्याशीं कपट करूं नये म्हणून दरबारीं ओलीदाखल ठेविलें होतें.

सुजानें पूर्वी दक्षिणबंगाल प्रांतांतील राजांवर मोठा जुलूम केल्यामुळें ते आतां आपणावर उलटून पडतील कीं काय अशी त्यास मोठी भीति उत्पन्न झाली होती.

त्यामुळें जेव्हां मीर जुमला व महंमद आपणावर चाल करून येत आहेत अशी बातमी त्याला कळली, तेव्हां तो बंगाल्यांत न जातां प्रथमतः बनारस, नंतर पाटणा व नंतर मोंगीर येथें गेला. त्याला असें वाटलें कीं, मीर जुमला अलाहाबादेच्या खालींवर कोठें तरी गंगा नदी उतरून आपल्या अगोदर मोंगीर येथें जाईल, व तिकडून बंगाल्यांत जाण्याचा आपला मार्ग बंद करील. मोंगीर शहर गंगा नदीचे कांठीं असून त्याच्या एका बाजूस उंच व बिकट डोंगर आहे, व दुसऱ्या बाजूस अटव्य अरण्य आहे. ह्या शहराला बंगाल प्रांताचें नाकें असें ह्मणत असत. तेथें आल्यावर सुजानें त्या शहरास मोठा बळकट तट बांधला, व गंगा नदीपासून तों तहत डोंगरांच्या रांगेपर्यंत एक खोल खंदक खणला, व अशा रीतीनें आपला पक्का बंदोबस्त करून तो मीर जुमला व महंमद यांची वाट पहात बसला. परंतु मीर जुमला यानें त्याला पक्केंच फसविलें. सुजाला आपला संशय येऊं नये ह्मणून त्यानें आपले कांहीं लोक गंगेच्या कांठीं त्याच्या दृष्टीस पडतील अशा बेतानें ठेविले, व बाकीचे लोक बरोबर घेऊन तो गंगेच्या उत्तर तीरावरील डोंगराळ प्रदेशांत जे राजे होते त्यांना वश करून घेऊन त्यांच्या मुलखांतून राजमहालाकडे चाल करून येऊं लागला. सुजा यास ती बातमी समजली तेव्हां त्याची पांचांवर धारण बसली. कारण सुजाचा बंगाल्यांत जाण्याचा मार्ग बंद करावा, येवढ्या हेतूनेंच मीर जुमला त्याचे पिछाडीकडून येत होता. शेवटीं निरुपाय होऊन सुजा मोंगीर सोडून आपल्या सैन्यासह राजमहाल येथें जाण्याकरितां निघाला, व मोठ्या कष्टानें मीर जुमला येण्याचे पूर्वी तेथें जाऊन पोहोंचला; व तेथें

तटबंदी करून पुनः मीर जुमला याची वाट पहात बसला. पुढें मीर जुमला यास ती बातमी समजली, तेव्हां त्याच्या बरोबर जेवढी फौज होती तिच्या मदतीनें राजमहाल येथून सुजास घालवून देणें आपणास जड जाईल असें त्यास वाटल्यावरून, तो डावे बाजूस गंगानदीकडे वळला, व मोठ्या बिकट वाटांनीं गंगेवर येऊन पोहोंचला. नंतर त्या ठिकाणीं आपले घोडेस्वार व तोफखाना अलीकडे घेऊन सुजाशीं लढाई देण्याचे विचारानें तो महंमदासह राजमहालाजवळ येऊन पोहोंचला.

मध्यंतरीं सुलतान महंमद व मीर जुमला यांच्यामध्यें तंटा उपस्थित झाला. सर्व सैन्यावर आपला अबाधित हुकूम चालावा, असें महंमदास वाटून तो मीर जुमला याच्याशीं द्वेषभावानें वागूं लागला. औरंगजेबास ही बातमी समजली तेव्हां त्याला महंमदाचा मोठा राग आला. पुढें तें वर्तमान महंमद यास समजलें तेव्हां औरंगजेब मीर जुमला यास आपणास कैद करावें ह्मणून कदाचित् हुकूम पाठवील, अशी त्यास भीति उत्पन्न होऊन तो कांहीं थोडे लोक बरोबर घेऊन मीर जुमला यास सोडून सुजास जाऊन मिळाला. परंतु आपणास फसवून कैद करण्याचे हेतूनें औरंगजेब व मीर जुमला यांनीं काविबाजीनें त्यास मुद्दाम आपल्याकडे पाठविलें असावें, असें सुजा यास वाटल्यावरून त्यानें त्याच्या बोलण्यावर व शपथांवर मुळींच विश्वास ठेविला नाहीं. त्यानें त्यास विशेष अधिकाराचें असें कांहीं एक काम सांगितलें नाहीं, व त्याच्या कृत्यांवर तो बारकाईनें आपला डोळा ठेवूं लागला. शेवटीं महंमद यास या त्रिशंकूसारख्या स्थितीचा कंटाळा येऊन तो थोडकेच महिन्यांनीं सुजास सोडून पुनः

मीर जुमला याजकडे परत आला. मीर जुमला यानें योग्य रीतीनें त्याचें स्वागत केलें, व "तुझ्या चुकीबद्दल तुझ्या पित्यानें तुला एकवार क्षमा करावी ह्मणून मी तुझ्याविषयीं रदबदली करीन" असें त्यास वचन दिलें.

सुजाचा घात करण्याकरितां औरंगजेबाच्या सांगण्यावरून महंमद यानें वरील कृत्य केलें होतें, असें कांहींचें मत आहे. तें कसेंही असो, परंतु वरील कृत्याचा औरंगजेबास चांगला उपयोग करून घेतां आला. त्याला आपल्या डोईजड पुत्राचा, अर्थात् महंमदाचा, कांहीं तरी सबळ कारणावरून बंदोबस्त करावयाचा होता; तेव्हां वरील कृत्यामुळें त्याचें काम बिनतोड झालें. महंमद राजमहाल येथें पुनः परत आला, ही बातमी औरंगजेबास कळतांच, आपणास त्याचा अतिशय राग आला आहे असा बाहाणा करून, त्यानें एकदम दिल्लीस निघून यावें ह्मणून त्यानें त्याला सक्तीचा हुकूम पाठवून दिला. तो बिचारा दुर्दैवी राजपुत्र तो हुकूम पहातांच गर्भगळीत होऊन गेला. पुढें पित्याचे आज्ञेप्रमाणें तो दिल्लीस येण्याचे हेतूनें गंगानदी उतरून अलीकडे येतो आहे तोंच त्याला औरंगजेबानें पाठविलेले कांहीं स्वार भेटले. त्यांनीं त्या हतभाग्यास तेथल्या तेथें कैद करून अंबारींत घातलें, व ग्वालेरच्या किल्ल्याचा रस्ता सुधारला. तेथें तो शूर राजपुत्र इ० स० १६७६ च्या डिसेंबर महिन्याच्या २५ व्या तारखेस कैदेंत असतां मरण पावला. असे कृतघ्न बाप जगामध्यें कितीसे मिळतील बरें?

महंमदाची अशा रीतीनें वाट लाविल्यावर एके दिवशीं औरंगजेबाजवळ त्याचा दुसरा पुत्र सुलतान माजूम हा

बसला असतां, त्यानें बेपरवाईनें वागूं नये ह्मणून, तो त्याला उद्देशून बोलला "शहाजादे! राज्यकारभार चालविण्याची कला फार बिकट व नाजूक आहे बरें! ती इतकी नाजूक आहे कीं, राज्यकर्त्यानें प्रत्यक्ष आपल्या सांवलीसही भ्यालें पाहिजे. एवढ्याकरितां तुमच्या ज्येष्ठ बंधूच्या उदाहरणावरून तुम्हीं वेळींच सावध व्हा. नाहींतर तुह्मांसही त्याच्याप्रमाणेंच कारागृहवास भोगावा लागेल. तुमचे आजोबा शहाजहान बादशाहा यांनीं त्यांचे वडील जहांगीर बादशाहा यांची जशी स्थिति[1] केली, किंवा तुमच्या आजोबांची तुमच्या वडिलांनीं जशी स्थिति केली, तशीच तुमच्या वडिलांची स्थिति करण्याचे विचार तुमच्या मनांत घोळत असतील तर तो निवळ भ्रम आहे बरें. हा औरंगजेब आहे, व तो आपल्या मस्तकावरील राजछत्र कधींही खालीं पडूं देणार नाहीं, ही गोष्ट चांगली लक्ष्यांत ठेवा."

औरंगजेब या वेळीं आग्र्याजवळ होता. त्यानें मुराद यास सेलीमगड येथून काढून ग्वालेरच्या किल्ल्यावर पाठवून दिलें. नंतर तो दिल्लीस गेला व त्या ठिकाणीं बादशाहा या दर्जानें राज्याचा सर्व कारभार पाहूं लागला. त्याच्या मनांत दारा यास गुजराथेंतून वालवून द्यावयाचें फार होतें; परंतु पूर्वीं सांगितलेल्या कारणांमुळें त्याला ती गोष्ट त्या वेळीं करतां आली नाहीं. परंतु त्याचें नशीब असें जोरावर होतें कीं, थोडक्याच दिवसांत तो त्या संकटांतून मुक्त झाला.

---

१ शहाजहान यानें इ० स० १६२७ त महाबतखान याच्या मदतीनें त्याचा पिता जहांगीर बादशाहा याच्या विरुद्ध बंड केलें होतें, व बादशाहा तें बंड चालू असतांच इ० स० १६२८ त मरण पावला.

यशवंतसिंग खजवा येथें मोठी लूट मिळवून आपल्या राज्यांत परत आल्यावर त्यानें आपल्या पदरीं फार मोठी फौज ठेविली. त्यानें दारा यास असें वचन दिलें होतें कीं, "तुम्हीं आग्र्यावर स्वारी करण्याकरितां अमदाबाद शहर सोडून निघालां ह्मणजे मी वाटेंत आपणास येऊन मिळतों." दारानेंही आपल्या पदरीं बरीच फौज ठेविली होती, व यशवंतसिंगासारखा बलिष्ट राजा आपणास येऊन मिळाला ह्मणजे दुसरेही पुष्कळ लोक आपणास येऊन मिळतील असें त्यास वाटत होतें. नंतर यशवंतसिंगाचे भरंवशावर तो अमदाबाद सोडून अजमीर येथें आला. परंतु यशवंतसिंग आपल्या वचनाप्रमाणें त्याला येऊन मिळाला नाहीं. कारण मध्यंतरीं जयसिंगानें त्याला असें पत्र पाठविलें कीं, "राजाजी! हल्लीं औरंगजेबाचे ग्रह फार उच्चीचे आले आहेत. आजपर्यंतच्या एकंदर गोष्टींवरून ही गोष्ट सिद्ध झालीच आहे. याकरितां आपण दाराचा दुर्बल पक्ष सोडून औरंगजेबास येऊन मिळावें व ह्यांतच आपलें व आह्मां इतर रजपुतांचें कल्याण आहे. तुम्हीं आपणाकडून कितीही प्रयत्न केला, तरी त्या अभागी दारास यश येणार नाहीं. याउपर तुम्हीं दारासच चिकटून राहिलां तर त्यापासून इतकेंच होईल कीं फक्त दाराचाच नाश न होतां त्याच्याबरोबर तुमचा व तुमच्या कुटुंबाचाही नाश होईल. औरंगजेबास क्षमा हा शब्द ठाऊक नाहीं हें तुम्हीं जाणतच आहां. माझा दर्जा आपल्या तोडीचाच आहे, याकरितां आपल्या शूर रजपूत जातीचा विनाकारण रक्तपात कराल तर माझी तुह्मांस शपथ आहे. दुसरे कांहीं राजे तुम्हांस येऊन मिळतील असें

तुम्हांस कदाचित् वाटत असेल तर तो निवळ भ्रम आहे. कारण एखाद्या राजाचा तसा बेत असलाच तर तो हाणून पाडण्याचीं माझ्याजवळ साधनें आहेत. ज्या कृत्यावर आपल्या हिंदु समाजाचें बरेंवाईट पुष्कळ रीतीनें अवलंबून आहे, व ज्या कृत्यामुळें पुढें सर्व हिंदुस्थानभर सारखा वणवा लागून त्यांत लाखोंशें हिंदूंच्या प्राणांच्या आहुती पडणार, तें कृत्य बंद करण्याचा मला प्रयत्न केलाच पाहिजे. याकरितां तुम्हीं दाराचा पक्ष सोडून द्या. त्याला काय पाहिजे तें करूं द्या. तुम्हीं औरंगजेबास येऊन मिळालां तर तो मागील सर्व गोष्टी विसरून जाऊन खजवा येथें तुम्हीं जी लूट मिळविली आहे, ती तुह्मांजवळ परत मागणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर तुह्मांस गुजराथेचा सुभेदार नेमण्याचा त्याचा विचार आहे. तुमच्या राज्याला लागून असणाऱ्या या सुपीक प्रांताचा अधिकार तुह्मांस प्राप्त झाला तर त्याच्यायोगानें तुमचा केवढा फायदा होईल हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. औरंगजेब ज्या गोष्टी करील ह्मणून मीं वर लिहिलें आहे, त्याबद्दल मी जामीन आहे." वरील पत्राचा असा परिणाम झाला कीं, यशवंतसिंगानें दाराचा पक्ष सोडला, व तो आपले राज्यांत स्वस्थ बसला. नंतर औरंगजेब आपल्या फौजेसह अजमीर येथें आला, व दारापासून थोड्याच अंतरावर त्यानें आपल्या फौजेचा तळ दिला.

ह्या वेळेची दाराची स्थिति लक्ष्यांत आणिली तर दुःखानें एखाद्याचें हृदय खरोखर फाटून जाईल. ज्या यशवंतसिंगाच्या भरंशावर दारा अमदाबाद शहर सोडून अजमीर येथें आला होता, त्यानें वचनभंग करून आपला

जशा रीतीनें गळा कापला, असें पाहून दाराला किती दुःख झालें असेल, त्याची वास्तविक कल्पना वाचकांनींच करावी. तो मोठ्या खुशीनें अमदाबादेस परत गेला असता. परंतु ते ऐन उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें त्या प्रांतांत पाण्याचा दुष्काळ पडला होता, व तो परत फिरता तर वाटेंत त्याचे बहुतेक लोक पाणी पाणी करून मेले असते. तसेंच पुनः अमदाबादेस परत जावयाचें म्हणजे लहान सहान नव्हे २९ दिवसांचा मार्ग असून त्याला यशवंतसिंगाचे स्नेही व मांडलिक अशा राजांच्या मुलुखांतून—त्यांना आतां दाराचे शत्रू म्हटलें तरी चालेल—जावयाचें होतें. शिवाय औरंगजेब आपणाबरोबर ताज्या दमाची जंगी फौज घेऊन आला होता, व त्यानें त्याचा मोठ्या नेटानें पाठलाग केला असता, ही गोष्ट अगदींच निराळी. अशा रीतीनें चोहोंकडून त्याचा कोंडमारा झाला होता. शेवटीं मारीन किंवा मरेन अशा आणीबाणीनें तो अजमीर येथेंच राहिला. परंतु त्याच्या स्वतःच्या सैन्यांत काय घोंटाळा झाला होता, व त्यामुळें पुढें केवढा प्रसंग ओढवणार होता, त्याची त्याला अद्यापि दादच लागली नव्हती. कारण आपण ज्या घरांत राहतों त्याचे वांसे आपणावर उलटले आहेत, अशी कल्पना त्या बिचाऱ्याचे मनांत कां म्हणून यावी? तो अमदाबादेहून अजमीर येथें आला तेव्हां त्यानें अमदाबादेचा सुभेदार शहानवाझखान यास आपल्या विश्वासाचा मनुष्य म्हणून बरोबर घेतलें होतें, व त्याला तो आपला प्रत्येक बेत सांगत असे. परंतु तो नीच मनुष्य आंतून दाराचे सर्व बेत औरंगजेबास कळवीत असे. या हरामखोरीबद्दल पुढें दाराची व

औरंगजेबाची जी लढाई झाली तींत त्याला यथायोग्य प्रायश्चित्त मिळालें. कोणी असें ह्मणतात कीं, त्याला दारानेंच ठार मारिलें, कोणी असें म्हणतात कीं, औरंगजेबाचे सैन्यांत दाराचे वर्ताची जी मंडळी होती त्यांनीं, कदाचित् तो पुढें त्यांचीं नांवें औरंगजेबास सांगेल या भीतीनें, त्यास ठार मारिलें. दारानें अमदाबाद शहर घेतलें तेव्हांपासून त्याचे कांहीं स्नेही दारास त्याच्यावर विश्वास न टाकण्याविषयीं सांगत होते, तें तो ऐकता व त्याच वेळीं त्यानें त्याची वाट लाविली असती, तर त्याचेवर पुढें जो प्रसंग आला तो पुष्कळ अंशीं आला नसता असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

औरंगजेब व दारा यांची लढाई सकाळीं ९ व १० यांचे दरम्यान् सुरू झाली. दारानें आपला तोफखाना चांगल्या माऱ्याचे ठिकाणीं नेऊन ठेविला होता; परंतु त्याचा उपयोग काय? त्याच्या तोफांनीं मोठा गडगडाट करून दिला होता; परंतु त्यांतून गोळे न येतां फक्त वायबार निघत होते. इतक्या भयंकर रीतीनें औरंगजेबानें त्याच्या सैन्यांत फितुरी करून टाकिली होती. या लढाईला लढाई ह्मणतां येईल किंवा नाहीं, याचीच मोठी शंका आहे; तेव्हां तिचें पाल्हाळीक वर्णन तरी कशाला पाहिजे? तोफेचा एक अवाज होतो आहे तोंच जयसिंग दाराच्या दृष्टीच्या टप्प्यांत आला, व त्यानें त्याच्याकडे आपला एक कामगार पाठवून त्याला असें कळविलें कीं, "आपणास औरंगजेबाचे हातीं लागणें नसेल तर आपण आतांचे आतां येथून

१ ही लढाई अजमीरच्या दक्षिणेस सहा मैलांवर देवरा येथें ता० १२ व १३ मार्च सन १६५९ रोजीं झाली—कापीतान.

पळ काढा." हे शब्द कानीं पडतांच दारा भीतीनें गर्भगळीत होऊन गेला, व आपण कोणीकडे जातों वगैरे कांहीं एक आपल्या सैन्यास न सांगतां तो लढाई सोडून पळून गेला. परंतु येवढें त्याचें भाग्य कीं, जयसिंगानें त्याला योग्य वेळीं सूचना दिल्यामुळें त्याला आपलें कुटुंब बरोबर घेतां आलें. त्याबद्दल त्यानें जयसिंगाचे उपकार मानले पाहिजेत. त्या वेळीं तो जयसिंगाचे हातांत पडलाच होता. परंतु राजघराण्यांतील पुरुषास त्याच्या शत्रूच्या स्वाधीन करून आपण पातकास धनी व्हावें, ही गोष्ट फार अयोग्य व निंद्य आहे, असें त्यास वाटून पूर्वी सुजा यास जाऊं दिलें होतें, त्याचप्रमाणें या वेळीं दारासही त्यानें जाऊं दिलें.

हतभाग्य दारा या वेळीं आपल्या शत्रूच्या मुलुखांतून बरोबर तंबू नाहींत, सामानसुमान नाहीं, वेळेवर जेवण नाहीं, अशा शोचनीय स्थितींत अमदाबादेस येण्याकरितां निघाला. त्या वेळीं त्याचे बरोबर फक्त २००० लोक होते. ते दिवस भर उन्हाळ्याचे असून वाटेनें पाण्याचा दुष्काळ होता; तसेंच मधून मधून लुटारू लोक त्याच्यावर हल्ला करून जे कांहीं लोक त्यांच्या सपाट्यांत सांपडत त्यांना कापून टाकीत व त्याचें सामान लुटीत असत. अशा भयंकर संकटांतून शेवटीं तो अमदाबादेपासून एका टप्प्यावर येऊन पोहोंचला. त्याच्या मनांत अमदाबादेस जाऊन पुनः सैन्य गोळा करावें असें होतें; परंतु नशिबाचा तारा एकदां फिरला ह्मणजे उपाय तेच अपाय होऊं लागतात: दारा अजमीर येथें गेला त्या वेळीं त्यानें अमदाबाद येथें जो सुभेदार नेमिला होता त्यास औरंगजेबानें धाकदपट-

शाहा देऊन, व तुझें मी पुढें चांगलें कल्याण करीन इत्यादि वचनें देऊन, अगोदरच फितूर करून ठेविलें होतें. **दारा** अमदाबादेच्याजवळ आला, असें त्या हरामखोरास कळतांच त्यानें त्यास असें पत्र पाठविलें कीं, "आपला येथें येण्याचा विचार असेल तर तो रहित करावा; कारण आपण आलां तर आपणाबरोबर लढण्याकरितां येथील सर्व लोक सज्ज होऊन बसले आहेत, व त्यांनीं शहराचे दरवाजे बंद केले आहेत. त्या वेळीं तीन दिवसपर्यंत बरनीर साहेब **दारा**-बरोबर होते. ते असें लिहितात कीं, "माझी व **दारा**ची फारच चमत्कारिक तऱ्हेनें गांठ पडली. त्याच्याबरोबर त्या वेळीं कोणी वैद्य नसल्यामुळें त्यानें मला आपणा-बरोबर घेतलें होतें. अमदाबादेच्या सुभेदारानें पत्र पाठविलें त्याच्या आदल्या रात्रीस मला लुटारू लोक कदाचित् लुटतील व ठार मारतील या भीतीनें **दारा**नें आपल्या धर्म-शाळेंत निजावयास बोलाविलें होतें. त्याची त्या वेळीं इतकी निकृष्टावस्था आली होती कीं, त्याला स्वतःला निजा-वयास तंबू वगैरे कांहीं नसून त्याच्या बायकामुलांकरितां मात्र एक लहानशी राहुटी होती, व तिचे दोर मी ज्या गाडींत निजलों होतों तिच्या चाकांना बांधले होते. मुसलमानी गोषा फार कडक असतो, परंतु **दारा**स या वेळीं त्याची चाड उरली नव्हती. प्रातःकाळीं सूर्योदय होतो आहे तोंच वर निर्दिष्ट केलेलें **अमदा**-बादेच्या सुभेदाराचें पत्र त्यास येऊन पोहोंचलें. मग तर त्याच्या दुःखास पारावारच नाहींसा झाला. **दारा**च्या जनानखान्यांत त्या वेळीं जी रडारड सुरू झाली ती ऐकून एखाद्या पाषाणहृदयी मनुष्याचेंही काळीज

दुभंग झालें असतें. तो आकांत ऐकून आह्मां सर्वांचे डोळे अश्रूंनीं भरून आले, ज्याच्या त्याच्या चेहेऱ्यावर खिन्नता व औदासिन्य यांची छाया दिसूं लागली, भीतीमुळें त्यांच्या तोंडांतून एकही शब्द बाहेर पडेना, पुढें काय करावें हें त्यांस कांहीं एक सुचेना, व ते एकमेकांकडे पहात चित्रा-प्रमाणें तटस्थ उभे राहिले. बिचारा दारा इतका बेहोष होऊन गेला होता कीं, त्यास कोणीही भेटो त्याला तो 'पुढें काय करावें' म्हणून विचारीत असे. आपण आतां काय करावें, कोठें जावें, कोणाजवळ मदत मागावी हें त्यास कांहीं सुचेना. शेवटीं ठठ्ठाबक्कर येथें परत जावें असा विचार करून तो तेथून निघाला. मी तीन दिवस-पर्यंत दाराबरोबर होतों. आह्मीं कूच करूं लागलों त्या वेळीं उन्हाळा इतका प्रखर होता कीं, मी ज्या गाडींत बसलों होतों तिला तीन गुजराथी धष्टपुष्ट बैल जुंपले होते, त्यांपैकीं एक उन्हाच्या तिरमिरीनें मेला, दुसराही खालीं पडून त्याच पंथास लागला, व तिसरा अतिशय थकून गेल्यामुळें चालेनासा झाला. दाराच्या एका बायकोच्या पायांस जबर जखम लागली होती, व ती बरी करण्याक-रितां आग्रह करून दारानें मला आपणाबरोबर घेतलें होतें. मला बसण्याकरितां एखादा घोडा, उंट, किंवा बैल मिळेल म्हणून दारानें पुष्कळ प्रयत्न केला. त्यानें लोकांस धमकी देऊन पाहिलें, पुष्कळ पैसा देऊं केला, त्यांचीं आर्जवें केलीं, परंतु त्यास एकही मिळेना. त्याची ती स्थिति पाहून मला रडें कोसळलें. शेवटीं निरुपाय होऊन मला बरोबर घेण्या-चा बेत त्यास रहित करावा लागला, व मी मागें राहिलों."

१ प्रस्तावना पहा.

अधिकारारूढ असतां ज्या दारापुढें पाहिजे ती वस्तु एका क्षणांत येऊन पडत असे, ज्याच्या दराऱ्याबरोबर मोठमोठ्या राजांची लटपट उडून जात असे, ज्याचा शब्द झेलण्यास हजारों दासदासी तत्पर असत, ज्याचे हुकुमाबरोबर औरंगजेबाशीं सामना देण्याकरितां दोन लाख किंबहुना राज्यांतील सर्व फौज गोळा झाली होती, त्यास त्या दिवशीं एक बैलही मिळूं नये काय? व त्याच्याबरोबर जेमतेम १०० लोक व दोन हत्ती रहावे काय! व प्राण वांचविण्याकरितां तो असा देशोधडीस लागावा काय? हा कष्टदशे! तुझा फेरा फार भयंकर आहे.

दारा ठठ्ठाबक्कर येथें जाण्याकरितां निघाला, परंतु मध्यंतरीं विस्तीर्ण वालुकामय प्रदेश असल्यामुळें तो जिवावरचाच प्रवास होता. वाटेंत तहान, भूक व श्रम यांनीं त्याचे बरेच लोक व त्याच्या जनानखान्यांतील कांहीं बाया मरण पावल्या. शिवाय लुटारू लोक मधून मधून त्याचे लोकांवर छापा घालून त्यांस ठार मारीत तें निराळेंच. इतके लोक मेले त्यांत दाराही मेला असता तर फार चांगलें झालें असतें. बिचारा यातनेंतून तरी मोकळा झाला असता. परंतु अद्यापि त्याचा भोग संपला नव्हता, तेव्हां त्याला मरण तरी कसें येणार? शेवटीं मोठ्या कष्टानें तो कच्छचे राज्यांत येऊन पोहोंचला. कच्छचे राजानें दाराचा त्या वेळीं मोठा आदरसत्कार केला, व " तुम्हीं आपली

१ कार्पीखान असें ह्मणतो कीं, अमदाबादेच्या सुभेदाराचें पत्र दारास पोहोंचल्यावर तो अमदाबादेपासून २ कोसांवर करी ह्मणून गांव आहे तेथें गेला व कानजी कोळी ह्मणून तेथें एक लुटारू लोकांचा नाईक राहत असे, त्याचे साहाय्यानें तो कच्छचे राज्यांत जाऊन पोहोंचला.

कन्या आमचे पुत्रास द्याल तर मी आपली सर्व फौज तुमचे मदतीस देईन," असें त्यानें त्यास वचन दिलें. परंतु औरंगजेबानें आंतून त्या राजाशीं कारस्थान सुरू केलें, व त्याच्या मोठमोठ्या देणग्यांस भुलून जाऊन तो राजा त्यास वश झाला, व दाराचा खून करण्याचा विचार करूं लागला. त्या राजाची ती फिरलेली चर्या दाराचे तेव्हांच लक्ष्यांत आली, व आपण यापुढें येथें राहिलों तर तो खातरीनें आपला घात करील, अशी त्यास भीति पडून तो ठठ्ठाबक्कर येथें जाण्याकरितां एकदम तें राज्य सोडून चालता झाला.

अद्यापि बंगाल्यांत सुजाबरोबरची लढाई मोठ्या ज्यारीनें सुरू होती. परंतु दिल्लीपासून तो बराच दूर असल्यामुळें व मीर जुमल्यासारखा शूर व इमानी सरदार त्याच्या सामन्यास असल्यामुळें औरंगजेबास तिकडची मुळींच काळजी नव्हती. दाराच्या काळजींतून तर तो बहुतेक मोकळा झालाच होता. फक्त त्याला आतां दाराचा पुत्र सुलेमान याचीच कायती मोठी भीति उरली होती. सुलेमान व श्रीनगरचा राजा बरोबर मोठी फौज घेऊन डोंगरांतून खालीं उतरणार, अशी त्या वेळीं दाट वदंता उठली होती. श्रीनगर येथून दिल्लीस येणें ह्मणजे फक्त ८ दिवसांचा रस्ता होता. औरंगजेबासारखा दूरदृष्टि मनुष्य अशा प्रबल शत्रूची उपेक्षा करील असें कधींच होणार नाहीं. तेव्हां तो सुलेमान याचा नाश कोणत्या रीतीनें होईल याचा विचार करूं लागला.

प्रथमत: श्रीनगरच्या राजास वश करून घेऊन आपला कार्यभाग उरकून घेण्याचा त्यानें विचार केला, व जयसिंगाच्या मध्यस्थीनें त्यानें त्या राजास पुष्कळ पत्रें पाठविलीं. त्यांत मुख्य मुद्दा इतकाच होता कीं, त्यानें सुलेमान यास औरं-

गजेबाचे स्वाधीन केलें तर त्याचा अतिशय फायदा होईल, व तसें न केलें तर त्याला मोठी कडक शिक्षा होईल. परंतु त्या राजानें त्यावर औरंगजेबास असें उत्तर पाठविलें कीं, "अशा प्रकारचें नीच काम करण्यापेक्षां माझें सर्व राज्य गेलें तरी हरकत नाहीं. आपण लिहितां अशा प्रकारचें निंद्य कृत्य माझे हातून होणार नाहीं." सामोपचारानें तो राजा आपणास वश होत नाहीं असें पाहून औरंगजेब मोठें सैन्य घेऊन श्रीनगरचे राज्याचे पायथ्याशीं गेला. परंतु तो प्रदेश बिकट व पहाडी असल्यामुळें त्याच्या फौजेस वर जातां येईना. तेव्हां त्यानें डोंगर फोडून सैन्य जाण्यास मोठा रस्ता करावा ह्मणून त्या कामावर पुष्कळ लोक लाविले. औरंगजेबाच्या या पोरकट कृतीचें त्या राजास हंसें मात्र आलें. कारण औरंगजेबासारखे चार बादशाहा तेथें आपल्या फौजांसह पाळथे पडले असते, तरी तें कृत्य पुरें झालें नसतें. शेवटीं हताश होऊन औरंगजेब तेथून परत आला.

इकडे दारा टठ्ठाबक्करच्याजवळ सुमारें तीन मजलांवर येऊन पोहोंचला, त्या वेळीं त्याला अशी बातमी समजली कीं, औरंगजेबाचा सरदार मीर बाबा किल्ल्यास वेढा घालून बसल्यामुळें व त्यानें बाहेरील दाणावैरण बंद केल्यामुळें आंतील लोकांची मोठी हैराणगत झाली आहे. त्या वेळीं किल्ल्यांत रुपयास पावशेरही धान्य मिळत नाहींसें झालें होतें. दाराच्या शूर किल्लेदारानें तो किल्ला पुष्कळ दिवसपर्यंत लढविला. पुढें त्यास जेव्हां दारा आल्याची बातमी समजली, तेव्हां त्यानें किल्ल्यांतील शिबंदीस उत्तेजन यावें म्हणून त्या लोकांचा पगार दुप्पट वाढविला; व दारा तसाच पुढें

गेला असता तर त्याला किल्ल्यांत नेण्याकरितां किल्ल्यांतील लोक मीर बाबावर तुटून पडले असते, व त्यांनीं त्यास किल्ल्यांत नेलें असतें. शिवाय त्या सुभेदारानें मीर बाबाच्या लष्करांतील कांहीं लोक फितूर केले होते, व त्यांच्याकडून सैन्यांत अशी कंडी उठविली होती कीं, दारा बरोबर मोठें सैन्य घेऊन किल्ल्याचा वेढा उठविण्याकरितां येत आहे. मीर बाबाच्या लोकांस ती खरी वाटून ते फार भिऊन गेले होते; व त्या वेळीं दारा पुढें जाता तर त्यांपैकीं पुष्कळ लोक त्याला येऊन मिळाले असते. परंतु त्याचें नशीव फिरलें होतें तेव्हां त्याला तशी बुद्धि कोठून होणार? असो.

ठठ्ठाबक्कर किल्ल्याची स्थिति दारास कळतांच त्यानें तिकडे जाण्याचा आपला बेत रहित केला व सिंधू नदी उतरून इराणास जावें असें त्याचे मनांत आलें. परंतु त्याच्या बायकोनें त्यास अशी भीति घातली कीं, "आपण इराणास गेलों तर तेथील राजा मला व माझ्या मुलीला गुलाम करून ठेवील, याकरितां आपण तिकडे जाऊं नये." तेव्हां दारानें तो बेत रहित केला. परंतु पूर्वीं हुमायून इराणांत पळून गेला होता, तेव्हां तेथील राजा शाहा तमस्प यानें त्याच्या बायकामुलांस फार चांगल्या रीतीनें वागविलें होतें, व त्याच्याच साहाय्यानें हुमायून यानें पुढें दिल्लीची गादी मिळविली, ही गोष्ट त्या वेळीं दाराचे लक्ष्यांत येऊं नये ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. परंतु "बुडत्याचा पाय खोलांत" ह्मणून म्हण आहे ती कांहीं खोटी नाहीं. शेवटीं बोलन बारीच्या पूर्वेस पांच मेलांवर दादर नामक प्रांताचा अधिकारी मालिक जीवनखान अयूब नांवाचा एक पठाण

जातीचा लुटारू सरदार रहात होता, त्याचेकडे जाण्याचा दारानें विचार केला. त्या सरदारानें पूर्वीं कांहीं वखेडे केल्यामुळें शहाजहान बादशाहानें त्याला दोन वेळां हत्तीच्या पायीं बांधून ठार मारण्याची शिक्षा दिली होती, व दोन्ही वेळ दारानें मध्यस्थी करून त्याचा प्राण वांचविला होता. तेव्हां असा मनुष्य आपणास प्रसंगीं खातरीनें मदत करील असें दारास वाटणें साहजिक होतें. त्याचे मनांत असें होतें कीं, त्या पठाणाच्या मदतीनें अगोदर ठ्ठाबक्करचा वेढा उठवावा, व नंतर आपला खजिना बरोबर घेऊन तेथून कंदाहार येथें जावें व तेथून काबुलास जावें. आपण एकदां काबूल येथें गेलों म्हणजे, ज्या अर्थीं तेथील सुभेदार महाबद्खान यास ती सुभेदारी आपले मदतीनें मिळाली आहे, त्या अर्थीं तो आपणास खातरीनें मदत करील. हें सर्व मनोराज्य बरोबर होतें. परंतु त्याचे बेत पुढें तडीस गेले किंवा नाहीं, येवेंढच आतां पहाणें राहिलें आहे.

जीवनखान याजकडे जाण्याचा दाराचा विचार जेव्हां त्याच्या कुटुंबास कळला, तेव्हां त्याची बायको, मुलगी व सिपर शेक नांवाचा त्याचा कनिष्ट पुत्र यांनीं डोळ्यांत अश्रु आणून त्यानें त्या पठाणाकडे जाऊं नये म्हणून त्याची प्रार्थना केली, व त्याच्या पायांवर लोटांगण घातलें. त्याची बायको त्याला असें म्हणाली कीं, "तो पठाण मोठा लुटारू असून बंडखोर आहे, त्याचेवर विश्वास ठेवणें ह्मणजे कसायाचे हातांत मान ठेवण्याप्रमाणेंच आहे. ठ्ठाबक्करचा वेढा उठविण्याचे नादास आतां लागूं नका. आपण परस्पर काबुलाचा रस्ता धरूं या. मीर बाबा ठ्ठाबक्करचा वेढा उठवून आपला पाठलाग कधींही करणार नाहीं.

परंतु दारा साडेसातीच्या फेऱ्यांत पक्का गुरफटून गेल्यामुळें त्याच्या बायकोचा शहाणपणाचा विचार त्यास पटेना. त्यास असें वाटलें कीं, आपण अशा स्थितींत काबूल येथें जाण्याकरितां निघालों तर आपणावर फार संकटें येतील, व आपण जीवनखान याचेवर पूर्वी उपकार केल्यामुळें तो आपला खचित दगा करणार नाहीं. सारांश आपला पूर्वींचा बेत कायम करून तो त्या पठाणाकडे जाण्याकरितां निघाला. दारासारख्या अनुभवी मनुष्यास नीच लोक आपला हेतु तडीस नेण्याकरितां प्रसंगविशेषीं निमकहराम बनून आपल्या उपकारकर्त्याचा गळा कापतात, ही गोष्ट कळूं नये ह्मणजे आक्काबाईच्या फेऱ्यानें त्याला पुरें ग्रासलें होतें असेंच ह्मटलें पाहिजे.

जीवनखान याजकडे दारा गेल्यावर प्रथमतः त्यानें त्याचा मोठा आदरसत्कार केला. परंतु त्याचे बरोबर पुरते तीनशेंही लोक नाहींत असें जेव्हां त्यास समजलें तेव्हां त्याची वृत्ति पालटली. पुढें एके दिवशीं रात्रीं त्यानें आपले कांहीं चोरटे लोक बोलाविले, व त्यांनीं प्रथमतः दाराचा खजिना पसार केला, नंतर त्यांनीं त्याच्या बायकांच्या अंगावरचे दागदागिने काढून घेतले, व शेवटीं दारा व त्याचा पुत्र सिपर शेक यांच्यावर छापा घालून त्यांना कैद केलें; नंतर जीवनखानानें त्यांना हत्तीच्या पाठीवर बांधून त्यांच्यामागें एका मांगास बसविलें, व त्याला त्यानें असा हुकूम केला कीं, "या दोघांनीं सुटून जाण्याचा किंवा यांच्या लोकांचा यांना सोडविण्याचा यत्किंचित् प्रयत्न तुझ्या नजरेस आला तर तूं यांना ठार मारून टाक." पुढें जीवनखान यानें दारास ठठ्ठाबक्कर येथें औरंगजेबाचा सरदार

मीरबाबा यांजकडे नेलें, व त्या सरदारानें त्याला प्रथमतः लाहोरास व तेथून दिल्लीस घेऊन जावें म्हणून जीवनखान यास हुकूम दिला. त्या पठाणानें हें निंद्य कृत्य औरंगजेबाचे सांगण्यावरून केलें किंवा आपण दारास कैद करून औरंगजेबाकडे घेऊन गेलों तर आपणास मोठें बक्षीस मिळेल या आशेनें केलें, तें खातरीनें कांहींएक सांगतां येत नाहीं[1].

बिचाऱ्या दारास दिल्लीच्या दरवाज्यापाशीं आणिलें त्या वेळीं औरंगजेबास असा विचार येऊन पडला कीं, दारास ग्वालेरच्या किल्ल्यांत न्यावयाचें तें शहरांतून न्यावें किंवा बाहेरून न्यावें. त्यानें आपले मुख्य मंत्री

---

१ ट्रॉव्हरनियर नामक ग्रंथकार या संबंधानें असें लिहितो कीं, दारा जीवनखान याजकडे जात असतां वाटेंत त्याची अतिशय आवडती बायको उन्हाच्या तापानें व वाटेच्या श्रमानें मरण पावली. दारास तिचा इतका शोक झाला कीं, त्याला कांहीं सुचेनासें झालें. तो तशाच स्थितींत जीवनखान याजकडे गेला व फार थकल्यामुळें विश्रांति घेण्याकरितां एका बिछान्यावर पडला व त्याला लगेच झोंप लागली. दारास झोंप लागलेली पाहून जविनखान यानें आपले कांहीं लोक गोळा केले, व ते दाराचा पुत्र सिपर शेक यास पकडण्याचा प्रयत्न करूं लागले. तो राजपुत्र लहान होता तरी त्या वेळीं त्यानें आपलें धनुष्य घेऊन त्यांपैकीं तिघांस ठार मारिलें. इतक्यांत बाकीचे येऊन त्याच्यावर पडले व त्याला पकडून त्यांनीं त्याचे पाठीमागें हात बांधिले. दारा जागा होऊन पहातो तों आपणापुढें आपल्या मुलाचे हात पाठीमागें बांधून उभें केलें आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. आपण ज्याच्या घरीं आश्रयाकरितां आलों त्यानें आपला अशा रीतीनें घात केला असें पाहून तो जीवनखान यास म्हणाला "अरे हे अधमा! नीचा! चांडाळा! तूं जें दुष्ट कृत्य आरंभिलें आहेस तें बंद कर, बंद कर. आम्ही दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलों आहों व औरंगजेबानें आमचा नाहक्क

बोलावून त्यांस तो प्रश्न विचारला. तेव्हां कांहींनीं असें सांगितलें कीं, " दारास अशा दुःखद स्थितींत शहरांतून नेलें तर त्याच्यायोगानें राजकुलास कलंक लागेल इतकेंच नव्हे, तर दाराची ती दीनावस्था पाहून लोक कदाचित् बंडही करतील व त्याला सोडवितील; " व कांहींचें मत असें पडलें कीं, " त्याला आहे याच स्थितींत शहरांतून न्यावें, कारण त्याची ती स्थिति लोकांनीं पाहिली म्हणजे त्यांचे मनांत आपणाविषयीं मोठी जरब बसेल व बादशाही अधिकार केवढा मोठा आहे, याचीही त्यांस कल्पना होईल. " औरंगजेबाचेंही तसेंच मत पडल्यामुळें शेवटीं दारास शहरांतून न्यावें असें ठरलें.

नंतर दारास एका हत्तीवर बांधून त्याचेजवळ त्याचा मुलगा सिपर यासही बांधलें. फक्त त्याचे मागें मांगास न बसवितां बहादुरखान नांवाचे एका सरदारास बसविलें. पूर्वी जो दारा ज्याच्यावर भरजरी चित्रविचित्र वेलबुटी काढलेली झूल घातलेली आहे, ज्याचें सामान सोनेरी मुलाम्याचें आहे, ज्याच्यावर उत्कृष्ट रंगीत भव्य हौदा ठेविला आहे, ज्या हौद्यावर सोनेरी व रत्नखचित काम केलेलें आहे, ज्यावर उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून एक विस्तीर्ण छत्री बांधलेली आहे, अशा लंका किंवा पेगू येथील उंची जातीच्या उमद्या हत्तीवर बसत असे, त्याच दारास त्या दिवशीं जो

---

छल मांडिला आहे. अरे नीचा ! मीं तुझा जीव दोनदां वांचविला त्या उपकाराची ही अशी फेड केलीस काय ? धिक्कार असो तुला. मोंगलाच्या थोर राजघराण्यांत उत्पन्न झालेल्या पुरुषाचे आजपर्यंत असे हात कोणींही बांधिले नाहींत. " जीवनखान यास हे शब्द ऐकून थोडीशी लाज उत्पन्न झाली व त्यानें सिपरचे हात सोडिले व त्या पितापुत्रांवर सक्त पहारा ठेविला.

नादान व ज्याचा अस्थिपंजर मात्र अवशेष राहिला आहे, ज्याचें सर्वांग चिखलानें लिडबिडून गेलें आहे, अशा उवड्या हत्तीवर बांधिलें होतें. दाराच्या गळ्यांत पूर्वीप्रमाणें मोठमोठ्या पाणीदार मोत्यांचा हार, किंवा डोकीस उंची पागोटें किंवा अंगांत भरजरी पोषाख नसून त्याच्या ऐवजीं अंगांत एक जाडाभरडा मळकट कपडा, डोक्यास त्याच मासल्याचें एक पागोटें, व त्याच्या सभोंवार एखादा कंगाल मनुष्यही वापरणार नाहीं असा एक जुन्यापुराण्या शालीचा फाटका तुकडा गुंडाळला होता. हायरे बिचाऱ्या दारा! तुझी ती स्थिति ऐकून एखाद्या मांगाचेंही हृदय फाटून जाईल, मग ज्यांनीं ती प्रत्यक्ष पाहिली असेल त्यांची काय अवस्था झाली असेल? आपल्या वडील बंधूची इतकी विटंबना करूनही जेव्हां औरंगजेबाची मनीषा तृप्त झाली नाहीं, तेव्हां तो मांगाहूनही मांग असला पाहिजे. असो.

दाराची वर सांगितलेल्या स्थितींत दिल्लीच्या प्रत्येक रस्त्यांतून धिंड काढूं लागले, त्या वेळीं सर्व दिल्लीशहर शोकसागरांत बुडून गेलें. बरनीर साहेब त्या वेळीं दिल्ली येथें होते ते असें लिहितात कीं, "दाराची धिंड काढिली त्या वेळीं मी माझे दोन नोकर व कांहीं स्नेही यांसह एका मोठ्या चौकांत घोड्यावर बसलेला होतों. रस्त्यांत लोकांची विलक्षण गर्दी उसळून गेली होती, व जो तो दाराची शोचनीय स्थिति पाहून दुःखाश्रु गाळीत होता. प्रत्येक घरांतून पुरुष, बायका, व मुलें दुःखाचे हंबरडे फोडीत होतीं, व त्यांच्या आक्रोशानें सर्व शहर गडबडून गेलें होतें. दुष्ट जीवनखान हा दाराचे बाजूनें घोड्यावर बसून चालला होता. लोक त्याला एवढ्या मोठ्यानें शिव्या देत होते कीं,

त्यांच्या आरोळ्यांनीं कांटाळे वसत होते. कांहीं फकीर व इतर लोक यांनीं त्याला खरोखरीच दगडांनीं मारिलें. इतकें झालें तरी दारास मुक्त करण्याची कोणाची छाती झाली नाहीं." असो. दाराची वर सांगितल्याप्रमाणें धिंड काढल्यावर त्याला त्याच्याच हैदराबाद नांवाच्या बागेंत नेऊन कोंडून ठेविलें.

वरील कृत्यामुळें लोकांच्या मनावर झालेला परिणाम, जीवनखान याचे संबंधानें त्यांनीं व्यक्त केलेला राग, त्यास दगडांनीं मारण्याचा त्यांचा प्रयत्न इत्यादि गोष्टी औरंगजेबास कळल्या, तेव्हां दिल्लींतील लोक दारास सोडविण्याकरितां कदाचित् बंड वगैरे करतील, अशी त्यास मोठी भीति पडली. तेव्हां त्यानें ताबडतोब दुसरा दरबार भरविला, व त्यांत दारास ग्वालेरच्या किल्ल्यावर पाठवावें, किंवा त्यास ताबडतोब मारून टाकावें, या गोष्टीची चर्चा सुरू झाली. कांहींचें मत असें पडलें कीं, इतक्या शेवटच्या उपायापर्यंत जाण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यास ग्वालेरीस नेलें तरी कांहींएक बखेडा होणार नाहीं, फक्त त्याला चांगल्या बंदोबस्तानें पाठविलें म्हणजे पुरे आहे. दानिषमन्खान याचें व दाराचें पूर्वीपासून जरी वैमनस्य होतें, तरी त्यानें दारास ठार मारणें या गोष्टीचीं निरनिराळीं कारणें दाखवून निषेध केला. परंतु शेवटीं 'दारास ठार मारावें व त्याचा पुत्र सिपर शेक यास मात्र ग्वालेरच्या किल्ल्यावर पाठवावें' असेंच ठरलें. या वेळीं रोषनार बेगम हिनें तिचा दारावर पूर्वीपासून जो राग होता त्याचा खरा कुसूर काढून घेतला. तिनें दानिषमन्खान याचें बोलणें निरनिराळीं कारणें दाखवून मोडून काढिलें, व दारास ठार

मारणें हीच गोष्ट या वेळीं रास्त आहे असें औरंगजेबाचे मनांत भरवून दिलें. शाबास तिच्या बंधुप्रीतीची. भावास ठार मारून तिनें इतिहासांत आपलें नांव अजरामर करून टाकिलें. कलीलुल्लाखान, शाहिस्तेखान व तकरीबखान यांनींही आपलें मत रोषनार बेगमेच्या मताप्रमाणेंच दिलें. हा तकरीबखान मूळचा इराणांतला असून तेथें तो वैद्यकीचा धंदा करीत असे. कांहीं कारणामुळें इराणच्या शाहानें त्याला हद्दपार केलें होतें. त्याला हकीम दाउदखान असेंही म्हणत असत. तो शहाजहान याचे वेळीं कोनाकोंपऱ्यांतच पडलेला होता; परंतु औरंगजेबानें त्याला उमराव केलें होतें. तो दरबारांत उभा राहून मोठ्यानें बोलला कीं, " दारा अशा वेळीं जिवंत राहून उपयोगी नाहीं. त्याला ठार मारलें तरच राज्यांत आबादानी राहील. राजकुलांतील पुरुषाचा वध केल्यामुळें जर कदाचित् पाप लागत असेल तर तें दुसऱ्या कोणास न लागतां माझे माथीं पडो. " दारास ठार मारल्यावर थोडकेच दिवसांत त्याला त्याच्या वर उच्चारलेल्या शब्दांबद्दल चांगलेंच प्रायश्चित्त मिळालें. एका कामांत त्याच्यावर तोहोमत येऊन औरंगजेबानें त्याची सर्व शहरभर धिंड काढिली, व त्यास ठार मारून टाकिलें. असो. शेवटीं वर सांगितल्याप्रमाणें दारास ठार मारावें असा त्या दरबारांत कायमचा बेत ठरला.

औरंगजेबानें दाराचा वध करण्याचें काम नाझीर नांवाच्या एका खोजास सांगितलें होतें. त्या खोजास शहाजहान यानें विद्याभ्यास शिकवून विद्वान केलें होतें; व त्या विद्वत्तेचा त्यानें दारास ठार मारून चांगला उपयोग करून घेतला. विद्या शिकून ज्यांचीं मनें संस्कृत झालीं आहेत

त्यांमध्यें अशा प्रकारचे नरापसद असतील काय ? असें सांगतात कीं, दारानें कांहीं कारणावरून नाझीर यास वाईट रीतीनें वागविलें होतें, व त्याचें उट्टें काढण्याकरितां त्यानें हें मांगाचें कृत्य करण्याचें कबूल केलें होतें. आपणास विषप्रयोग करतील कीं काय, अशी दारास मोठी भीति पडली होती. त्यामुळें तो आपलें अन्न फार चिकित्सेनें खात असे. एके दिवशीं तो आपल्या मुलासह विस्तवावर शेंगा भाजीत बसला होता, इतक्यांत नाझीर व आणखी चार मारेकरी त्याच्या खोलींत शिरले. त्यांना पहातांच दारा आपल्या मुलास गहिंवरून म्हणाला " बाळा ! हे कोण आले आहेत हें समजलास काय ? हे मांग आपणांस ठार मारण्याकरितां आले आहेत. " असें म्हणून तेथें जवळच एक लहानशी सुरी पडली होती, ती त्यानें हातांत घेतली. इतक्यांत एकानें त्याच्या मुलास त्याच्याजवळून ओढून घेतलें, व बाकीचे तिघे त्या एकटयावर येऊन पडले, व त्यांनीं त्यास जमिनीवर उताणें पाडून दाबून धरिलें, व नाझीर यानें येऊन दाराचें डोकें कापिलें.[1] नंतर त्यानें तें लगेच औरंगजेबाकडे नेलें. औरंगजेबानें तें एका ताटांत ठेवून पाण्यानें स्वच्छ धुतलें. व तें दाराचेंच आहे अशी त्याची खातरी झाली, तेव्हां त्याला रडें कोसळलें. तो दाराला उद्देशून ह्मणाला " हा दुर्दैवी मनुष्या ! तुझ्या नशीबींच असें होतें. असा प्रकार पाहण्याचा प्रसंग मला पुनः न येवो. " नंतर त्यानें तें हुमायून याच्या कबरींत नेऊन पुरावें म्हणून आज्ञा केली.[2]

१ तारीख २२ आक्टोबर इ० स० १६५९ रोजीं दाराचा वध केला.

२ काटू यानें या संबधानें असें लिहिलें आहे कीं, दाराचें

दाराच्या मुलीस त्याच दिवशीं जनानखान्यांत पाठवून दिलें. परंतु शहाजहान व बेगम साहेब यांनीं तिला आपणाकडे पाठवून द्यावें अशी औरंगजेबाची प्रार्थना केल्यामुळें त्यानें पुढें तिला त्यांचेकडे पाठवून दिलें. दाराची पत्नी व सुलेमान व सिपर शेक यांची मातुश्री नादिरा बेगम हिचें अंतःकरण निरनिराळ्या विपत्ति भोगाव्या लागल्यामुळें अगोदरच होरपळून गेलें होतें. दारास कैद करून दिल्लीस चालविलें, त्या वेळीं ती त्याचे बरोबर लाहोरापर्यंत होती. आपल्या प्रिय भर्त्याचें व पुत्राचें पुढें काय होणार तें अगोदरच तिला समजलें होतें. शेवटीं जिवाचा वैताग येऊन तिनें लाहोर येथें असतां विष खाऊन आत्महत्या करून घेतली. दारास मारल्यावर सिपर शेक यास ग्वाले-

---

डोकें औरंगजेबाकडे आणिलें त्या वेळीं तो मोठा खुश झाला. त्यानें प्रथमतः आपल्या तरवारीच्या टोकानें तें हालविलें व तें दाराचेंच आहे अशी आपली खातरी करून घेण्याकरितां त्यानें त्याचे डोळे उघडविले. नंतर रोषनार बेगम हिचे सांगण्यावरून त्यानें तें एका पेटींत बंद करून ती पेटी भेटीदाखल शहाजहान याजकडे आग्र्याचे किल्ल्यांत पाठवून दिली. पुढें ती पेटी उघडण्याचे पूर्वीं शहाजहान असें म्हणाला कीं, " माझें राज्य हिरावून घेणाऱ्या त्या औरंगजेबास त्याच्या दुर्दैवी पित्याची अद्यापि आठवण आहे हें त्याचें महत्भाग्यच समजलें पाहिजे. " परंतु पेटी उघडून आंत दाराचें शिर त्याच्या नजरेस पडतांच तो जमिनीवर धाडकर निचेष्टित पडला, व बेगम साहेब हिनें तर आपल्या आवडत्या बंधूच्या शोकानें सर्व किल्ला दणाणवून टाकिला. "

१ काफीखान या संबंधानें असें लिहितो कीं, " नादिरा बेगम इच्यावर दुःखाचे पर्वत कोसळल्यामुळें ती अगोदरच अतिशय हैराण झाली होती. तशांत जीवनखान याचे मुलखांत गेल्यावर तिला अमांशाचा आजार होऊन ती मरण पावली, व तिला लाहोर येथें आणून मूठमाती दिली.

ऱ्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. जीवनखान यास बोलावून त्यास औरंगजेबानें कांहीं बक्षीस व बक्त्यारखान असा किताब देऊन घालवून दिलें. परंतु त्याच्या दगाबाजी-बद्दल त्यालाही वाटेंतच प्रायश्चित्त मिळालें. तो आपलें बक्षीस घेऊन आपल्या मुलुखांत जात असतां वाटेंत त्याच्या-वर कांहीं लोकांनीं छापा घालून त्यास ठार मारून टाकिलें. त्या नीच मनुष्याला असें समजलें नाहीं कीं, जुलमी राजे जरी प्रसंगविशेषीं आपला कार्यभाग साध्य करून घेण्याकरितां दुसऱ्या लोकांकडून पाहिजे तो गुन्हा करवितात, तरी त्या गुन्हे-गारांचा ते नेहमीं तिरस्कार करीत असतात, व त्यांचें काम संपलें म्हणजे त्याच लोकांस ते राजे ठार मारून टाकतात. कारण प्रसंग पडल्यावर ते आपणावरही उलटून पडण्यास मागें पुढें पहाणार नाहींत अशी त्यांची खातरी असते. असो.

ठठ्ठाबक्कर येथील सुभेदारानें पुष्कळ दिवसपर्यंत तो किल्ला लढविला, व मीर बाबाचें कांहींएक चालू दिलें नाहीं. परंतु मदत येण्याचे सर्व मार्ग खुंटल्यामुळें तो अगदीं जेरीस आला होता. दारा यास कैद करून ठठ्ठाबक्कर येथें आणिलें त्या वेळीं त्याच्याकडून जबरदस्तीनें मीर बाबा यानें, त्या किल्लेदारानें किल्ला खालीं करून द्यावा, अशा अर्थाचा हुकूम घेतला होता. पुढें त्या शूर किल्लेदाराच्या सर्व अटी कबूल केल्यावर त्यानें तो किल्ला मीर बाबा याचे स्वाधीन केला. अशा शूर पुरुषास एकदां आपण पहावें, अशा उद्देशानें पुढें त्यास औरंगजेबानें दिल्लीस बोलाविलें, व तो आपल्या बाकी राहिलेल्या शूर शिपायांसह लाहोर येथें आला. परंतु त्या ठिकाणीं औरंगजेबाचा सरदार कलीलुल्लाखान यानें त्याच्यावर अकस्मात् हल्ला करून त्या सर्वांची कत्तल

केली. त्या शूर पुरुषास अशा दगाबाजीनें ठार मारण्याचें कारण असें दिलें आहे कीं औरंगजेबास भेटल्यावर त्याचे मनांत श्रीनगर येथें सुलेमान यास जाऊन मिळावें असें होतें, त्यामुळें औरंगजेबानें त्यास अशा कपटानें ठार मारून टाकलें.

आतां दाराच्या कुलापैकीं फक्त सुलेमान काय तो शिलक राहिला होता. श्रीनगरचा राजा धैर्याचा पुरा व वचनाचा धड असता, तर सुलेमान औरंगजेबाचे हातीं कधींच लागला नसता. परंतु जयसिंगाचें त्या राजाबरोबर चाललेलें कारस्थान, त्यास औरंगजेबाचीं वारंवार जाणारीं धमकीचीं पत्रें, दाराच्या वधाचें दुःखदायक वर्तमान, व औरंगजेबाच्या चिथावणीवरून त्याच्याशीं लढाई करावी ह्मणून त्याच्या आसपासच्या राजांनीं केलेली उचल, इत्यादि कारणांमुळें त्याचा पूर्वींचा निश्चय डळमळला, व त्याच्या वृत्तींत फरक पडला. सुलेमान याचे लक्ष्यांत ती गोष्ट येतांच तो तिबेटांत जाण्याकरितां तेथून निघाला. परंतु वाटेंत श्रीनगरच्या राजाच्या मुलानें त्याच्यावर अकस्मात् छापा घालून त्याला मोठा वार केला, व त्यास कैद करून दिल्लीस औरंगजेबाकडे पाठवून दिलें. औरंगजेबानें त्यास प्रथमतः मुराद याच्याप्रमाणेंच सेलीमगड येथें कैदेंत ठेविलें.

पूर्वीं दाराचा वध करून त्या वेळीं आपली खातरी करून घेण्याकरितां ज्याप्रमाणें औरंगजेबानें दाराचें डोकें आपणासमोर आणविलें, होतें, त्याचप्रमाणें त्यानें ह्या वेळीं सुलेमान यासही भरदरबारांत आणविलें बरनीर साहेब असें लिहितात कीं, "त्या दिवशीं मी स्वतः तो प्रसंग पाहण्याकरितां गेलों होतों. ज्या दिवाणखान्यांत उमराव लोक

बसले होते तेथें त्या राजपुत्रास आणण्यापूर्वी त्याच्या पायां-
तील शृंखला काढल्या होत्या. त्याचे हातांत मात्र रुप्याच्या
बेड्या होत्या. त्या शूर व सुंदर राजपुत्रास पाहून दरबारांतील
पुष्कळ लोकांचे नेत्र अश्रूंनीं भरून आले. त्या वेळीं पुष्कळ
उमराव लोकांच्या स्त्रियाही तो दुःखप्रद प्रसंग पहाण्या-
करितां चिकाचे पडद्यांत येऊन बसल्या होत्या. राजपुत्रास
पहातांच त्याही रडूं लागल्या. आपणालाही त्या गोष्टीचें
अतिशय दुःख झालें आहे असें औरंगजेबानें त्या वेळीं
दाखविलें. तो मोठ्या गहिंवरानें सुलेमान यास म्हणाला,
"मुला! तूं आपलें मन शांत कर, भिऊं नको, तुला
माझ्याकडून कांडी इतकीही इजा पोहोंचणार नाहीं. मी
तुला फार ममतेनें वागवीन. परमेश्वर फार थोर आहे;
त्याच्यावर हवाला ठेव म्हणजे झालें. तुझ्या पित्यास मार-
ण्याचें कारण मुसलमानी धर्माचा त्याग करून तो पाखंडी
बनला होता." नंतर त्यानें लवून औरंगजेबास सलाम केला,
व मोठ्या धीमेपणानें तो त्यास म्हणाला, "काका!
मला विष देऊन ठार मारण्याचा जर आपला बेत असेल
तर मी आपली विनंति करितों कीं, मला आतांचे आतां ठार
मारून टाकावें असा आपण हुकूम कराल तर मी आपला फार
आभारी होईन." त्यावर औरंगजेबानें त्यास असें सांगि-
तलें कीं, "तुला कोणीही विष देणार नाहीं; तूं अगदीं
निर्धास्त रहा." नंतर सुलेमान यानें त्यास पुनः लवून सलाम
केला. पुढें औरंगजेबानें तो पूर्वी श्रीनगर येथें जात असतां
दिलावरखान याच्या लोकांनीं त्याचा एक मोहोरांनीं भर-
लेला हत्ती त्याच्यावर छापा घालून परत आणला होता,
या संबंधानें कांहीं प्रश्न करून त्याला दरबारांतून घेऊन

जावें म्हणून आज्ञा केली. दुसरे दिवशीं औरंगजेबानें त्याला ग्वालेरीस पाठवून दिलें. नंतर कांहीं दिवसांनीं औरंगजेबानें सुलेमान व सिपर शेक यांस विषप्रयोग करून ठार मारून टाकिलें. (इ० स० १६६०). अशा रीतीनें दाराच्या कुलाचा संहार झाल्यावर औरंगजेब शनीमहाराजांची दृष्टि मुराद याजकडे गेली. त्यानें मुराद याचा वध फारच चमत्कारिक रीतीनें करविला. जरी तो कैदेंत होता तरी त्याचेवर लोकांची फारच प्रीति होती, व ते त्याच्या धैर्य, शौर्य, साहस, इत्यादि गुणांवर वारंवार कवनें करून तीं मोठ्या प्रेमानें गात बसत. तेव्हां लोक कदाचित् त्याला सोडविण्याकरितां बंड करितील कीं काय, अशी औरंगजेबास मोठी भीति बसली. त्याला असें वाटलें कीं, विषप्रयोग करून त्याला गुपचिप ठार मारून टाकिलें, तर तो मेला अशी लोकांची खातरी होणार नाहीं; तेव्हां कांहीं तरी व्यूह रचून सर्व लोकांसमक्ष त्याला देहांतप्रायश्चित्त द्यावें हें बरें. त्याचा प्रकार असा:—

पूर्वी मुराद गुजराथेंत लढाईची जंगी तयारी करीत असतां त्यानें अमदाबाद येथील अली नाकी नांवाच्या एका श्रीमान सय्यदास ठार मारून त्याची संपत्ति लुटली होती. त्याच्या मुलांस औरंगजेबानें भर देऊन त्यांच्याकडून दरबारांत अशी फिर्याद आणविली कीं, "मुराद यानें आमचे पित्यास विनाकारण ठार मारिलें आहे, याकरितां त्याच्या मोबदला आम्हांस मुराद याचें शीर मिळालें पाहिजे." दरबारांतील एकाही उमरावास या फिर्यादीच्या

विरुद्ध चकार शब्दही काढतां येईना. एक तर तो सय्यद[1] होता, दुसरें मुराद यानें त्याला विनाकारण ठार मारिलें होतें, व तिसरें औरंगजेबाच्या चिथावणीवरून ती फिर्याद दरबारांत आली आहे, ही गोष्ट त्यांस माहीत होती; चौकशीच्या अंतीं औरंगजेबानें फिर्यादीचें मागणें कबूल करून "मुराद याचा वध करून त्याचें डोकें हा हुकूम नेणारांचे स्वाधीन करावें." असा हुकूम देऊन त्यांना ग्वालेरच्या किल्लेदाराकडे पाठवून दिलें; व अशा निंद्य रीतीनें मुराद याचा वध केल्यावर त्यानें त्याच्या एकुलत्या एक पुत्रासही विषप्रयोग करून आपल्या वाटेंतून काढून टाकिलें[2].

आतां औरंगजेबाचे बंधूंपैकीं फक्त सुजा काय तो शिलक राहिला होता. परंतु मीर जुमला यास औरंगजेब वारंवार कुमक पाठवीत असल्यामुळें थोडकेच वेळांत सुजाचे सभोंवार औरंगजेबाच्या सैन्याचा गराडा पडला.

---

१ सय्यद हे महंमदाचे वंशज असल्यामुळें त्यांना इतर मुसलमान लोक फार पवित्र समजतात.

२ कापीखान यानें मुराद याच्यावर केलेल्या फिर्यादीचा वृत्तांत अगदीं निराळा दिला आहे. तो म्हणतो कीं, अल्ली नाकी याच्या दोन पुत्रांपैकीं वडील पुत्रानें मुराद याचे विरुद्ध वर सांगितलेल्या प्रकारची फिर्याद आणण्याचें नाकारिलें; धाकटा मात्र औरंगजेबाच्या स्नेही मंडळीच्या शिकवणीवरून तशी फिर्याद आणण्यास कबूल झाला, व तेवढ्या मुद्द्यावरून औरंगजेबानें मुराद याचा वध केला. मुराद यास मारल्यावर औरंगजेबानें अल्ली नाकीच्या थोरल्या पुत्रानें तशा प्रकारची फिर्याद करण्याचें नाकबूल केलें होतें ह्मणून त्यास मोठें बक्षीस दिलें. कातू नामक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, औरंगजेबानें आपले खासगीचे कांहीं शिपाई लोक पाठवून दिले व त्यांच्याकडून मुराद यास सर्पदंश करवून मारून टाकिलें. (इ० स० १६६२).

शेवटीं अशा अवाढव्य सैन्याशीं टक्कर देण्याची त्याची शक्ति नसल्यामुळें तो ढाका येथें पळून गेला. आतां सुजाचा शेवट व त्याच्याबरोबर आमच्या शोकपर्यवसायी कथानकाचाही शेवट फार जवळ आला आहे.

सुजा याचेजवळ गलबतें नसल्यामुळें व कोणाचा आश्रय घ्यावा तें माहीत नसल्यामुळें त्यानें आपला वडील मुलगा सुलतान बंकी यास आराकानच्या राजाकडे पाठविलें, व "आम्हांस तुम्हीं थोडा वेळ आश्रय देऊन मोखा[1] येथें जाण्यास गलबतें द्याल काय?" म्हणून विचारिलें. त्याचे मनांत मोखा येथें गेल्यावर तेथून मक्केस जाऊन नंतर तुर्कस्थान अगर इराण या दोहोंपैकीं कोणत्यातरी देशांत जावें असें होतें. त्या राजानें मोठ्या आनंदानें सुजास आश्रय देण्याचें कबूल केलें, व बंकी याच्याबरोबर त्यानें आपलीं कांहीं गलबतें पाठवून दिलीं. नंतर सुजा आपले कुटुंबासह आराकान येथें आला. परंतु त्यास तेथें येऊन बरेच महिने झाले तरी तो राजा त्यास मोखा येथें जाण्याकरितां गलबतें देईना. सुजाजवळ अद्यापि पुष्कळ संपत्ति होती, तेव्हां तिचा लोभ सुटून त्या राजानें त्यास गलबतें दिलीं नसावीं असें वाटतें. सुजा त्यास भेटावयास गेला नाहीं, या गोष्टीमुळेंही त्याला सुजाचा फार राग आला होता. पुढें सुजानें आपला पुत्र सुलतान बंकी याच्याबरोबर मोठा नजराणा देऊन त्यास राजवाड्यांत पाठवून दिलें, व मोखा येथें जाण्याकरितां जीं गलबतें देण्याचें राजानें सुजास वचन दिलें होतें. तीं कधीं देणार, म्हणून त्यास बंकीनें विचारिलें.

---

१ हें शहर आरबस्तानचे नैऋत्य कोंपऱ्यावर आहे.

परंतु त्या राजानें त्या वेळीं त्यास कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुढें पांच सहा दिवसांनीं त्या राजानें, "तुमच्या मुलीशीं मला लग्न कर्तव्य आहे, तर तुम्ही ती मला देण्यास कबूल आहां किंवा नाहीं ?" म्हणून **सुजास** विचारिलें. परंतु **सुजानें** ती गोष्ट नाकबूल केली. त्यामुळें त्या राजास **सुजाचा** फार राग आला, व त्याच्यावर मोठा प्रसंग गुजरला. शेवटीं मरतां मरतां तरी हातपाय हालवावे, असा विचार करून त्यानें एक भयंकर धाडसाचें कृत्य करण्याचा निश्चय केला. **आराकानच्या** राजाच्या पदरीं वरेच मुसलमान लोक होते, त्यांना वश करून घेऊन त्यांच्या मदतीनें राजवाड्यावर हल्ला करून सर्व राजकुलाचा संहार करावा, व **आराकानची** गादी आपण बळकावावी, असें त्याचे मनांत आलें. **सुजाचें** मन शांत असतें, तर त्यानें अशा प्रकारचा वाऱ्याची मोट बांधण्याचा प्रयत्न केला नसता. परंतु त्याच्यावर ओढवलेल्या संकटांमुळें तो इतका गोंधळून गेला होता कीं, आपण काय करितों याचें त्यास भान उरलें नव्हतें. पुढें वर सांगितलेला बार उडविण्याकरितां त्यानें जो दिवस नेमिला होता, त्याचे आदले दिवशींच त्याचा बेत बाहेर फुटला, व त्यामुळें त्याच्या सर्व कुटुंबाच्या प्राणावर येऊन बेतली. नंतर **पेगू** येथें पळून जावें असा बेत करून तो रातोरात आपलें कुटुंब घेऊन निघाला. परंतु चोवीस तासांचे आंतच त्यास **आराकानच्या** राजाच्या लोकांनीं गांठलें, व दोघांमध्यें भयंकर मारामारी सुरू झाली. **सुजा** जिवावर उदार होऊन लढला व त्यानें आपलेपुढें **आराकानी** लोकांच्या प्रेतांचा ढीग पाडला. परंतु ते लोक

पुष्कळ असल्यामुळें शेवटीं सुजास तेथून पळून जावें लागलें. सुलतान बंकी सुजाचे मागें बरेच अंतरावर होता; तोही एखाद्या सिंहकिशोराप्रमाणें लढला. त्यानेंही पांचपन्नास आराकानी लोकांस ठार मारिलें. परंतु त्याच्या अंगावर चोहोंकडून दगडांचा एकसारखा वर्षाव होत होता. त्यामुळें त्याचें सर्वांग रक्तबंबाळ होऊन गेलें, व शेवटीं हतवीर्य होऊन तो खालीं पडला. पुढें आराकानी लोकांनीं तो, त्याचे दोघे बंधु, त्याची आई व त्याच्या बहिणी या सर्वांस कैद केलें, व त्यांस परत आणून राजाचे स्वाधीन केलें. सुजाचे संबंधानें असें म्हणतात कीं, तो पळून गेला तो एका टेंकडीवर जाऊन पोहोंचला. इतक्यांत त्याच्या डोक्यांत एक दगड येऊन बसला, त्यामुळें तो धाडकन् खालीं पडला. त्या वेळीं त्याचे बरोबर एक खोजा, एक बाई, व दुसरे दोन इसम इतकी मंडळी होती. सुजा दगड लागून खालीं पडल्यावर त्याच्या खोजानें त्याची जखम बांधली, व तो सावध झाल्यावर तीं सर्व माणसें दाट जंगलांत पळून गेलीं. [इ० स० १६६०.]

सुजाचे शेवटचे प्रयाणाचे संबंधानें तीन चार निरनिराळे लेख सांपडतात. कोणीं असें म्हणतात कीं, सुजाची व आराकानी लोकांची मारामारी झाली तींत तो मरून पडला; कोणीं म्हणतात कीं, पेगूच्या राजानें त्यास दोन गलबतें दिलीं, व त्यांत बसून तो सुरतेवरून मक्केस गेला; कोणीं म्हणतात कीं, तो प्रथमतः इराणास गेला, व तेथून कंदाहार येथें येऊन त्यानें काबुलावर स्वारी करण्याकरितां मोठी जंगी तयारी केली होती; व कोणीं असें म्हणतात कीं, आराकानच्या रानांत पळून गेल्यानंतर अरण्यांत तो

व्याघ्रसिंहादि हिंस्र पशूंच्या भक्ष्यस्थानीं पडला. परंतु बर्नीर साहेब यांस त्या वेळीं आराकान येथून एका डच मनुष्याचें पत्र आलें होतें, त्यांत ‘ सुजा पळून जात असतां मारला गेला ’ असें लिहिलें होतें असें ते लिहितात. शिवाय सुजाचे कांहीं खोजे बर्नीर साहेबांस भेटले त्यांनींही त्यांस तो मारामारींत पडला असेंच सांगितलें. या कारणांवरून वरील गोष्टींपैकीं पहिलीच गोष्ट विशेष संभवनीय दिसते.

सुजाचे कुटुंबांतील मनुष्यांस कैद करून परत आणल्यावर कांहीं दिवस आराकानच्या राजानें त्यांस फार क्रूरतेनें वागविलें. पुढें सुजाचे वडील मुलीशीं त्या राजानें लग्न केलें, व तेव्हांपासून त्यांना तो चांगल्या रीतीनें वागवूं लागला. परंतु पूर्वी सुजानें ज्या मुसलमान लोकांस वश केलें होतें, त्यांच्या मनांत आराकानचे राजास ठार मारण्याचा बेत अद्यापि घोळतच होता; व त्यांना सुलतान बंकीचे कांहीं लोक अनुकूल झाले होते. पुढें ज्या दिवशीं तें कृत्य करण्याचा त्यांनीं निश्चय केला होता, त्याच दिवशीं त्यांच्यांतील एकानें दारूच्या तारेंत तें गुप्त कारस्थान फोडून टाकलें. राजास ती बातमी समजली तेव्हां सुजाच्या कुटुंबाचा त्यास इतका राग आला कीं, त्यानें त्या सर्व माणसांस ठार मारून टाकावें असा हुकूम केला. सुजाच्या ज्या मुलीशीं त्या राजानें लग्न केलें होतें, ती गरोदर होती तरी तिलाही त्या नराधमानें ठार मारून टाकलें; सुलतान बंकी व त्याचे दोन भाऊ यांचीं कुऱ्हाडीनें डोकीं तोडून टाकिलीं; व इतर बायामाणसांस निरनिराळ्या खोल्यांत कोंडून व त्यांचें अन्नपाणी बंद करून त्यांचे जीव घेतले.

अशा रीतीनें शहाजहान याचे मुलांत राज्यप्राप्तीच्या अनावर लोभामुळें जें युद्ध सुरू झालें होतें, त्याचा शेवट झाला. हें युद्ध इ० स० १६५६ पासून इ० स० १६६१ पर्यंत चाललें होतें. व त्यांत औरंगजेबानें, ज्यांचा ज्यांचा म्हणून गादीवर हक्क पोहोंचण्यासारखा होता, त्या सर्वांस ठार मारून व आपला बाप शहाजहान यास कैदेंत टाकून दिल्लीची गादी बळकाविली. वरील पांच वर्षांच्या हकीकतीवरून आमच्या मानभावी फकिराची ऊर्फ औरंगजेबाची व आमच्या वाचकांची चांगलीच ओळख झाली असेल असें आम्हांस वाटतें; तेव्हां त्याच्या कृत्यांवर विशेष चर्चा करण्याचें काम वाचकांवरच सोंपवून तूर्त आम्ही त्यांची रजा घेतों.